# मुंबई विद्यापीठातील भाषा विभागात सादर केलेल्या प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या विद्यापीठात तात्त्विक व सामाजिक शास्त्रे या विद्याशाखांतर्गत ग्रंथालय आणि माहिती शास्त्र या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच डी) पदवीसाठी

## सादर केलेला शोधप्रबंध


**संशोधक विद्यार्थी**

**श्री. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये**

(कायम नोंदणी क्र. १६११३००७८०७)

**मार्गदर्शक**

**डॉ. मधुकर निंबा शेवाळे**

प्रमुख, ग्रंथालय आणि माहिती स्त्रोत

य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक


**नोव्हेंबर २०१८**

# प्रतिज्ञापत्र

मी, श्री. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये, प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की 'मुंबई विद्यापिठातील भाषा विभागात सादर केलेल्या प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण' या विषयावरील शोधप्रबंध मी 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे' याच्या ग्रंथालय आणि माहिती शास्त्र विभागांतर्गत विद्यावाचस्पती (पीएच डी) पदवीकरीता सादर करीत आहे. हे संशोधन स्वतंत्र आणि नवे असून आवश्यक तिथे संदर्भांची यथायोग्य नोंद केली आहे.

हा शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठातील पदवीकरीता अगर परीक्षेकरीता सादर केलेला नाही.

स्थळ : पुणे

दिनांक : २० नोव्हेंबर २०१८

(श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये)

संशोधक विद्यार्थी

# मार्गदर्शकांचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की 'मुंबई विद्यापीठातील भाषा विभागात सादर केलेल्या प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण' हा शोधप्रबंध विद्यावाचस्पती (पीएच डी) पदवीकरीता ग्रंथालय आणि माहिती शास्त्र विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे सादर करण्यात आला आहे.

हा शोधप्रबंध श्री. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये यांनी माझ्या पर्यवेक्षण व मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले संशोधन कार्य आहे.

माझ्या माहिती व विश्वासानुसार संबंधित संशोधन कार्य हे त्यांनी इतर कोणत्याही विद्यापीठाच्या पदवीकरीता किंवा परीक्षेकरीता वापरले नाही.

स्थळ : पुणे

दिनांक : २० नोंव्हेंबर २०१८

मार्गदर्शक

डॉ. मधुकर शेवाळे

प्रमुख,

ग्रंथालय आणि माहिती स्त्रोत केंद्र,

य. च. म. मुक्त विद्यापीठ,

नाशिक

# ऋणनिर्देश

गुरुबिन कौन बतावे वाट? असे म्हणतात. खरोखर ही पीएच डी सारखी उच्च शैक्षणिक उपलब्धी गुरूंच्या मार्गदर्शनाशिवाय कशी प्राप्त होणार? माझे हे महत् भाग्य की मला डॉ. मधुकर शेवाळे हे मार्गदर्शक म्हणून लाभले. मला वेळोवेळी सल्ला दिला. सूचना केल्या. माझ्या लिखाणाचे निरपेक्षपणे, कर्तव्यबुद्धीने व चिकित्सकपणे अवलोकन करून सुधारणा सुचवल्या. त्यामुळेच माझ्या हातून हे थोडंबहुत लिखाणकाम होऊ शकले. त्यांनी माझ्याबद्दल जी आपुलकी दाखवली, जो विश्वास दाखवला तो माझ्यासाठी आयुष्यभराचा आनंदठेवाच आहे. त्यांचे या प्रसंगी मी नम्रपणे ऋण व्यक्त करतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा डोलारा समर्थपणे सांभाळणारे कुलगुरू डॉ. दीपक टिळक यांनी हा अभ्यासक्रम उपलब्ध करून विद्यार्थ्यांना त्यांचे स्वप्न साकारण्याची संधी प्राप्त करून दिली, त्याबद्दल व्यक्तिशः मी त्यांचे आभार मानतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने पीएच डी चा उपक्रम राबवून ही पदवी प्राप्त करण्याची संधी मिळवून दिली. त्याबद्दल एक श्रेष्ठ शैक्षणिक संस्था म्हणून मी या संस्थेचाही आभारी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या मनमिळावू व कर्तव्यदक्ष ग्रंथपाल डॉ. धनिष्ठा खंदारे यांचा मी खरोखरच ऋणी आहे. तसेच सहकार्याला सदैव तत्पर असलेला त्यांचा ग्रंथालयीन कर्मचारीवर्ग निश्चितच कौतुकास पात्र आहे. त्यांना मी मनापासून धन्यवाद देतो.

स्वामी विवेकानंद कला व वाणिज्य रात्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनुजा पळसुलेदेसाई यांनी मला वेळोवेळी प्रोत्साहन दिले. नेहमी माझ्या कामाविषयी चौकशी केली. सांभाळून घेतले. त्यांच्याविषयी मी या ठिकाणी कृतज्ञता व्यक्त करत आहे. तसेच या आमच्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व माझे ग्रंथालय सहकारी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

माझे या क्षेत्रातील गुरू डॉ. प्रकाश गणेश करमरकर (निवृत्त ग्रंथपाल, केळकर–वझे कॉलेज, मुलुंड, मुंबई), श्री. भरतकुमार शुक्ल (निवृत्त ग्रंथपाल, आदर्श महाविद्यालय, बदलापूर), श्री. अशोक सरदेसाई (निवृत्त ग्रंथपाल, बिर्ला महाविद्यालय, कल्याण), श्री. सतीश डोंगरे (निवृत्त सहायक ग्रंथपाल, बिर्ला महाविद्यालय, कल्याण), श्री. नारायण संपत बारसे (ग्रंथपाल, जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे), सौ. सुषमा पौडवाल (निवृत्त ग्रंथपाल, एस. एन. डी. टी महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई) या सर्वांचा मी खरोखरच ऋणी आहे. या सर्वांनी विविध प्रसंगी निरपेक्षपणे व आपुलकीने केलेल्या मार्गदर्शनातून, चर्चेतून व सहवासातून मी घडत गेलो आहे. त्यांचे ऋण व्यक्त करण्याची संधी मिळाली हे मोठंच भाग्य आहे.

माणूस हा आयुष्यभर शिकतच असतो आणि त्याची सुरवात करून देतात त्याचे आई–वडील. मी खूप खूप शिकावं ही आईची इच्छा. आज ती असती तर तिला काय वाटले असते, याची फक्त मी कल्पनाच करू शकतो. माझी आई कै. सौ. उषा मेघःश्याम आठल्ये आणि माझ्या बुद्धिमत्तेचा अभिमान बाळगणारे माझे वडील श्री. मेघःश्याम रघुनाथ आठल्ये यांना मी वंदन करून ऋण व्यक्त करतो.

‘शब्देवीण संवादु’ साधणारी आणि ‘चिंता क्रोध मागे सारा’ म्हणत प्रोत्साहन देणारी माझी पत्नी! तिच्याबद्दल बोलण्यासाठी शब्द अपुरे आहेत. नैराश्याच्या कड्यावरून मागे आणून मुख्य मार्गावर मला आणण्याचं काम तिनं अनेकदा केलेलं आहे. तिचे ते श्रम आज साकार झाल्यासारखे वाटतात. जिच्याशिवाय हे कार्य पूर्णत्वास गेलं नसतं ती माझी पत्नी सौ. श्रुती श्रीनिवास आठल्ये हिच्याविषयी मी प्रगट आभार मानतो.

संशोधनात्मक कार्य हा जगन्नाथाचा रथ आहे. त्याला सगळ्यांचे हात लागलेले असतात. अशा सर्व ज्ञात आणि अज्ञात मित्र–मैत्रिणींचे, नातेवाईकांचे व हितचिंतकांचे मी इथेच जाहीर आभार मानतो. खरोखर त्यांचं सहकार्य हे माझ्यासाठी फारच बहुमोल आहे.

याशिवाय कुणाचे आभार मानायचे राहून गेले असल्यास त्यांचेही आभार मानतो. त्यांचे माझ्या आयुष्यात खरोखरच मानाचे स्थान आहे. शब्द हे जाणत नाही, पण मन जाणते.

आणि अंतीमत: जगाचा नियंता, तो परमेश्वर, ती अज्ञात शक्ती जिने मला बुद्धी दिली, शक्ती दिली, प्रेरणा दिली त्या शक्तीला शिरसाष्टांग दंडवत!

————————————

संशोधक विद्यार्थी

## अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रतिज्ञापत्र | ii |
| | मार्गदर्शकांचे प्रमाणपत्र | iii |
| | ऋणनिर्देश | iv |
| | अनुक्रमणिका | vii |
| | तक्त्यांची सूची | xiv |
| | आलेख सूची | xvi |
| | | |
| **एक** | **प्रस्तावना** | **१—२६** |
| १.१ | प्रस्तावना | २ |
| १.२ | संशोधनाची व्याख्या | ३ |
| १.३ | संशोधन समस्या | ५ |
| १.३.१ | प्रस्तुत संशोधनातील संशोधन समस्या | ६ |
| १.४ | समस्या सूत्रण | ६ |
| १.४.१ | प्रस्तुत संशोधनातील समस्या सूत्रण | ७ |
| १.५ | संशोधन आराखडा | ७ |
| १.६ | संशोधनाचा हेतू | ८ |
| १.६.१ | प्रस्तुत संशोधनातील संशोधनाचा हेतू | ८ |
| १.७ | संशोधनाची उद्दिष्टे | ९ |
| १.७.१ | प्रस्तुत संशोधनासाठीची उद्दिष्टे | ९ |
| १.८ | गृहितक | १० |

| | | |
|---|---|---|
| १.८.१ | प्रस्तुत संशोधनासाठीची गृहितके | ११ |
| १.९ | संयाेधनाची पार्श्वभूमी / गरज | ११ |
| १.१० | अभ्यासाची निवड | १२ |
| १.११ | संशोधनाची व्याप्ती | १२ |
| १.११.१ | प्रस्तुत संशोधनासाठी भाषांची निवड | १२ |
| १.१२ | संशोधन लक्ष्य आणि नमुना निवड | १३ |
| १.१३ | स्त्री—पुरुष लेखक प्रमाण | १४ |
| १.१४ | प्रस्तुत संशोधनाचा कालावधी | १५ |
| १.१५ | संशोधनाची मर्यादा व उल्लेख संख्या | १६ |
| १.१६ | प्रस्तुत संशोधनातील संज्ञांचे स्पष्टीकरण | १६ |
| १.१७ | प्रस्तुत संशोधनाची कार्यपद्धती | १९ |
| १.१८ | प्रस्तुत संशोधनाचे योगदान | २० |
| १.१९ | प्रस्तुत संशोधनातील प्रकरणांची रूपरेषा | २० |
| १.२० | प्रस्तुत संशोधनाची मार्गदर्शक तत्त्वे | २२ |
| १.२१ | सारांश | २४ |
| | संदर्भ | २५ |
| | | |
| **दोन** | **वाचनसाहित्याचा आढावा** | **२७—५९** |
| २.१ | प्रस्तावना | २८ |
| २.२ | वाचनसाहित्याच्या आढाव्याचे हेतू | २८ |
| २.३ | प्रस्तुत संशोधनासाठीचा वाचनसाहित्याचा आढावा | ३० |
| २.३.१ | उल्लेख विश्लेषण | ३० |
| २.३.२ | बिब्लिओमेट्रिक्स अभ्यास | ४३ |

| | | |
|---|---|---|
| २.३.३ | सायंटोमेट्रिक्स अभ्यास | ४७ |
| २.३.४ | वेबोमेटिक्स अभ्यास | ४९ |
| २.४ | सारांश | ५० |
| | संदर्भ | ५१ |
| | | |
| **तीन** | **उल्लेख आणि उल्लेख विश्लेषण** | **६०—७८** |
| ३.१ | प्रस्तावना | ६१ |
| ३.२ | उल्लेख म्हणजे काय? | ६१ |
| ३.२.१ | उल्लेखांचे प्रयोजन | ६२ |
| ३.२.२ | उल्लेखांचे प्रस्तुतीकरण | ६३ |
| ३.३ | उल्लेख विश्लेषण म्हणजे काय? | ६४ |
| ३.३.१ | ऐतिहासिक आढावा | ६६ |
| ३.३.२ | उल्लेख विश्लेषणाची उपयुक्तता | ६६ |
| ३.३.३ | उल्लेख विश्लेषणाची गरज | ६७ |
| ३.३.४ | उल्लेख विश्लेषणाची सोपी मोजणी पद्धती | ६८ |
| ३.३.५ | उल्लेख विश्लेषणाचा हेतू | ६८ |
| ३.४ | उल्लेख विश्लेषणाचे पैलू | ६९ |
| ३.४.१ | उपयुक्तता मापन | ६९ |
| ३.४.२ | वाचनसाहित्याचा विकास | ६९ |
| ३.४.३ | उपयुक्त साधन | ६९ |
| ३.४.४ | मापन मार्ग | ७० |
| ३.४.५ | मुख्य नियतकालिकांची निवड | ७० |
| ३.४.६ | माहिती स्त्रोताचा दर्जा | ७० |

| | | |
|---|---|---|
| ३.४.७ | नातेसंबंध शोध | ७० |
| ३.४.८ | विद्वत् क्षेत्रातील लेखांची प्राप्ती | ७१ |
| ३.५ | उल्लेख विश्लेषणाचे उपयोजन | ७१ |
| ३.६ | उल्लेख विश्लेषणाच्या मर्यादा | ७२ |
| ३.७ | उल्लेख विश्लेषणाशी संबंधित संज्ञा | ७२ |
| ३.७.१ | ग्रंथमिती | ७२ |
| ३.७.२ | ग्रंथालयमिती | ७३ |
| ३.७.३ | विज्ञानमिती | ७३ |
| ३.७.४ | वेबोमेट्रिक्स | ७४ |
| ३.७.५ | आशय विश्लेषण | ७४ |
| ३.८ | सारांश | ७५ |
| | संदर्भ | ७६ |
| | | |
| **चार** | **तथ्य संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण** | **७९—११४** |
| ४.१ | प्रस्तावना | ८० |
| ४.१.१ | तथ्यांचे विश्लेषण आणि सादरीकरणाची आवश्यकता | ८० |
| ४.१.२ | भाषानिहाय प्रबंध संख्या | ८१ |
| ४.१.३ | वर्ष—कालखंडनिहाय प्रबंध संख्या | ८२ |
| ४.१.४ | प्रबंध—पृष्ठे सरासरी | ८४ |
| ४.२ | तथ्य संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण : इंग्रजी भाषा | ८५ |
| ४.२.१ | लेखक—प्रकार : इंग्रजी | ८५ |
| ४.२.२ | भौगोलिक स्थान संदर्भ : इंग्रजी | ८६ |

| | | |
|---|---|---|
| ४.२.३ | माध्यम पद्धतीचा वापर : इंग्रजी | ८८ |
| ४.२.४ | प्रलेख—प्रकार : इंग्रजी | ८९ |
| ४.२.५ | प्रकाशन वर्ष संदर्भ :इंग्रजी | ९१ |
| ४.३ | तथ्य संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण : हिंदी भाषा | ९२ |
| ४.३.१ | लेखक—प्रकार : हिंदी | ९२ |
| ४.३.२ | भौगोलिक स्थान संदर्भ : हिंदी | ९४ |
| ४.३.३ | माध्यम पद्धतीचा वापर : हिंदी | ९५ |
| ४.३.४ | प्रलेख—प्रकार : हिंदी | ९६ |
| ४.३.५ | प्रकाशन वर्ष संदर्भ : हिंदी | ९८ |
| ४.४ | तथ्य संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण : मराठी भाषा | १०० |
| ४.४.१ | लेखक—प्रकार : मराठी | १०० |
| ४.४.२ | भौगोलिक स्थान संदर्भ : मराठी | १०१ |
| ४.४.३ | माध्यम पद्धतीचा वापर : मराठी | १०२ |
| ४.४.४ | प्रलेख—प्रकार : मराठी | १०४ |
| ४.४.५ | प्रकाशन वर्ष संदर्भ : मराठी | १०५ |
| ४.५ | तथ्य संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण : एकत्रित | १०७ |
| ४.५.१ | लेखक—प्रकार : एकत्रित | १०७ |
| ४.५.२ | भौगोलिक स्थान संदर्भ : एकत्रित | १०८ |
| ४.५.३ | माध्यम पद्धतीचा वापर : एकत्रित | १०९ |
| ४.५.४ | प्रलेख—प्रकार : एकत्रित | १११ |
| ४.५.५ | प्रकाशन वर्ष संदर्भ : एकत्रित | ११२ |

| | | |
|---|---|---|
| ४.६ | सारांश | ११४ |
| | संदर्भ | ११४ |
| | | |
| **पाच** | **निरीक्षण, निष्कर्ष आणि शिफारसी** | ११५—१४० |
| ५.१ | प्रस्तावना | ११६ |
| ५.२ | निरीक्षण | ११६ |
| ५.३ | निष्कर्ष | ११८ |
| ५.३.१ | प्रकाशित वाचनसाहित्यावरून निष्कर्ष | ११८ |
| ५.३.२ | इंग्रजी भाषा निष्कर्ष | ११८ |
| ५.३.३ | हिंदी भाषा निष्कर्ष | १२० |
| ५.३.४ | मराठी भाषा निष्कर्ष | १२१ |
| ५.३.५ | उद्दिष्ट आधारित निष्कर्ष | १२३ |
| ५.४ | गृहितक चाचणी | १३१ |
| ५.५ | शिफारसी | १३५ |
| ५.५.१ | संशोधकांसाठी शिफारसी | १३५ |
| ५.५.२ | विद्यापीठासाठी शिफारसी | १३६ |
| ५.६ | पुढील संशोधनासाठी दिशा | १३७ |
| ५.७ | सारांश | १३७ |
| | संदर्भ | १३७ |
| | | |
| | **परिशिष्टे** | **१४२—१८१** |
| ०१ | भाषानिहाय मुख्य नियतकालिकांची यादी | १४२ |
| | अ) मुख्य नियतकालिकांची यादी : इंग्रजी | १४२ |

| | | |
|---|---|---|
| | आ) मुख्य नियतकालिकांची यादी : हिंदी | १४४ |
| | इ) मुख्य नियतकालिकांची यादी : मराठी | १४५ |
| ०२ | भाषानिहाय प्रबंधांची यादी | १४७ |
| | अ) भाषानिहाय प्रबंधांची यादी : इंग्रजी | १४७ |
| | आ) भाषानिहाय प्रबंधांची यादी : हिंदी | १५३ |
| | इ) भाषानिहाय प्रबंधांची यादी : मराठी | १६३ |
| ०३ | इंग्रजी—मराठी शब्दार्थ सूची | १६८ |
| ०४ | मुंबई विद्यापीठ फोटो | १७० |
| | अ) मुंबई विद्यापीठ फोटो : इमारत | १७० |
| | आ) मुंबई विद्यापीठ फोटो : बोधचिन्ह | १७० |
| | संदर्भ ग्रंथसूची | १७१ |


००० 

# तक्त्यांची सूची


| क्रमांक | तक्ता क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | १.१ | संशोधन लक्ष्य व निवड | १४ |
| २ | १.२ | स्त्री—पुरुष लेखक प्रमाण | १५ |
| ३ | १.३ | प्रबंध उल्लेख संख्या | १६ |
| ४ | १.४ | मुंबई विद्यापीठ ग्रंथालय : एक दृष्टिक्षेप | १७ |
| ५ | ४.१ | भाषानिहाय प्रबंध संख्या | ८२ |
| ६ | ४.२ | वर्ष—कालखंडनिहाय प्रबंध संख्या | ८३ |
| ७ | ४.३ | प्रबंध—पृष्ठे सरासरी | ८४ |
| ८ | ४.४ | लेखक—प्रकार : इंग्रजी | ८५ |
| ९ | ४.५ | भौगोलिक स्थान संदर्भ : इंग्रजी | ८७ |
| १० | ४.६ | माध्यम पद्धतीचा वापर : इंग्रजी | ८८ |
| ११ | ४.७ | प्रलेख—प्रकार : इंग्रजी | ९० |
| १२ | ४.८ | प्रकाशन वर्ष संदर्भ : इंग्रजी | ९१ |
| १३ | ४.९ | लेखक—प्रकार : हिंदी | ९३ |
| १४ | ४.१० | भौगोलिक स्थान संदर्भ : हिंदी | ९४ |
| १५ | ४.११ | माध्यम पद्धतीचा वापर : हिंदी | ९६ |
| १६ | ४.१२ | प्रलेख—प्रकार : हिंदी | ९७ |
| १७ | ४.१३ | प्रकाशन वर्ष संदर्भ : हिंदी | ९८ |
| १८ | ४.१४ | लेखक—प्रकार : मराठी | १०० |
| १९ | ४.१५ | भौगोलिक स्थान संदर्भ : मराठी | १०१ |
| २० | ४.१६ | माध्यम पद्धतीचा वापर : मराठी | १०३ |
| २१ | ४.१७ | प्रलेख—प्रकार : मराठी | १०४ |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | ४.१८ | प्रकाशन वर्ष संदर्भ : मराठी | १०५ |
| २३ | ४.१९ | लेखक—प्रकार : एकत्रित | १०७ |
| २४ | ४.२० | भौगोलिक स्थान संदर्भ : एकत्रित | १०८ |
| २५ | ४.२१ | माध्यम पद्धतीचा वापर : एकत्रित | ११० |
| २६ | ४.२२ | प्रलेख—प्रकार : एकत्रित | १११ |
| २७ | ४.२३ | प्रकाशन वर्ष संदर्भ : एकत्रित | ११२ |
| २८ | ५.१ | ग्रंथ—नियतकालिक वापर | १३२ |
| २९ | ५.२ | मुद्रित साहित्य व अंकित साहित्य वापर | १३४ |


००० 

# आलेख सूची



| क्रमांक | आलेख क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | ४.१ | भाषानिहाय प्रबंध संख्या | ८२ |
| २ | ४.२ | वर्ष—कालखंडनिहाय प्रबंध संख्या | ८३ |
| ३ | ४.३ | प्रबंध—पृष्ठे : सरासरी | ८४ |
| ४ | ४.४ | लेखक — प्रकार : इंग्रजी | ८६ |
| ५ | ४.५ | भौगोलिक स्थान संदर्भ : इंग्रजी | ८८ |
| ६ | ४.६ | माध्यम पद्धतीचा वापर : इंग्रजी | ८९ |
| ७ | ४.७ | प्रलेख—प्रकार : इंग्रजी | ९० |
| ८ | ४.८ | प्रकाशन वर्ष संदर्भ : इंग्रजी | ९२ |
| ९ | ४.९ | लेखक — प्रकार : हिंदी | ९४ |
| १० | ४.१० | भौगोलिक स्थान संदर्भ : हिंदी | ९५ |
| ११ | ४.११ | माध्यम पद्धतीचा वापर : हिंदी | ९६ |
| १२ | ४.१२ | प्रलेख—प्रकार : हिंदी | ९८ |
| १३ | ४.१३ | प्रकाशन वर्ष संदर्भ : हिंदी | ९९ |
| १४ | ४.१४ | लेखक — प्रकार : मराठी | १०१ |
| १५ | ४.१५ | भौगोलिक स्थान संदर्भ : मराठी | १०२ |
| १६ | ४.१६ | माध्यम पद्धतीचा वापर : मराठी | १०३ |
| १७ | ४.१७ | प्रलेख—प्रकार : मराठी | १०५ |
| १८ | ४.१८ | प्रकाशन वर्ष संदर्भ : मराठी | १०६ |
| १९ | ४.१९ | लेखक — प्रकार : एकत्रित | १०८ |
| २० | ४.२० | भौगोलिक स्थान संदर्भ : एकत्रित | १०९ |
| २१ | ४.२१ | माध्यम पद्धतीचा वापर : एकत्रित | ११० |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | ४.२२ | प्रलेख—प्रकार : एकत्रित | ११२ |
| २३ | ४.२३ | प्रकाशन वर्ष संदर्भ : एकत्रित | ११३ |


०००

# प्रकरण एक

# प्रस्तावना

# प्रकरण एक

# प्रस्तावना

## १.१ प्रस्तावना

संशोधन ही प्रगतीची जननी आहे. शंका ही संशोधनाची प्रेरणा आहे आणि शंकासमाधान हे संशोधनाचे कार्य आहे (बेहेरे, २०११). संशोधनाचे फलित प्रकाशित करणे, हे महत्त्वाचे काम आहे व त्यामुळे प्रस्तुत संशोधन जगापुढे येते. संशोधकाने कोणत्या विषयात कोणत्या टप्प्यापर्यंत कार्य केले आहे ते कळते. संशोधनाला त्याच्या संशोधनात्मक कार्याचे श्रेय प्रकाशनामुळे मिळते. इंग्रजीत Research ही संज्ञा Re आणि Search या दोन संज्ञांच्या एकत्रीकरणातून तयार झाली आहे. Re म्हणजे पुन्हा आणि Search म्हणजे शोध घेणे, याचाच अर्थ Research म्हणजे पुन्हा शोध घेणे. एखाद्या घटनेचे, संकल्पनेचे, कृतीचे पुन्हा पुन्हा निरीक्षण करणे किंवा पुन्हा पुन्हा परीक्षण करणे व त्याद्वारे सत्य शोधणे म्हणजे संशोधन होय. एखाद्या बाबीचा पुन्हा अभ्यास करून किंवा पुन्हा शोध घेऊन नवीन सत्य शोधणे किंवा पुनर्शोधाद्वारे प्रचलित तत्त्वे, सिद्धांत यामध्ये बदल वा सुधारणा करणे म्हणजे संशोधन होय.

ताटके (२००८) यांच्या मते, एखाद्या विषयाची समर्पक माहिती गोळा करण्यासाठी जी पद्धतशीर किंवा शास्त्रशुद्ध पाहणी केली जाते, अन्वेषण किंवा शोध घेतला जातो, त्याला संशोधन असे म्हणतात.

नवीन घटना शोधून काढताना त्यांचा अभ्यास, परीक्षा, टीकात्मक शोध, प्रयोगशीलता या गोष्टी महत्त्वाच्या असतात. त्या नवीन घटनांचे स्पष्टीकरण, त्यातून उद्‌भवलेले निर्णय, सिद्धांत म्हणजे संशोधन होय, असे वेबस्टर शब्दकोशात संशोधनाबाबत म्हटले आहे. (कोण्णूर, कोण्णूर आणि माणगांवकर, २००८)

## १.२ संशोधनाची व्याख्या

वेगवेगळ्या विचारवंतांनी संशोधनाच्या वेगवेगळ्या व्याख्या केलेल्या आहेत. (आठल्ये, २०१५) त्या व्याख्या संशोधनाचे वेगवेगळे पैलू दर्शवतात. यापैकी काही महत्त्वाच्या अभ्यासकांच्या व्याख्या आहेत :

(१) जॉर्ज मौली : नियोजनपूर्वक आणि पद्धतशीरपणे माहिती संकलित करून त्या माहितीच्या विश्लेषणाद्वारे अर्थनिवर्चन करणे म्हणजे संशोधन होय. दुसऱ्या शब्दांत असेही म्हणता येईल की माहितीचे विश्लेषण आणि विशिष्ट समस्येचे निवारण करण्यासाठी अर्थनिवर्चनाद्वारे उपाय शोधण्याची प्रक्रिया म्हणजे संशोधन होय.

(२) चार्लस बुशा आणि स्टिफन हार्टर : विशिष्ट हेतूने नियोजनपूर्वक व साचेबद्धतेने घेतलेल्या सत्याचा शोध म्हणजे संशोधन. तसेच, सत्याचा पद्धतशीरपणे घेतलेला शोध म्हणजे संशोधन.

(३) गोपाल : चलांतील परस्परसंबंध शोधणे आणि त्याआधारे व्यापक सिद्धांत व तत्त्वे मांडण्यासाठी वस्तुनिष्ठ आणि फेरतपासणीयोग्य पद्धतीने केलेली चौकशी म्हणजे संशोधन.

(४) विकिपीडिया (मराठी) : संशोधन म्हणजे ज्ञानाची पातळी वाढवण्यासाठी एखाद्या विषयाचा पद्धतशीरपणे केलेला अभ्यास होय. यामध्ये सत्याची तपासणी, आधी सापडलेल्या तत्त्वांची पुष्टी, नवीन विषयांचा अभ्यास आदी प्रकार असतात (https://mr.m.wikipedia.org)

(५) Dr. S. R. Ranganathan : Research is a critical and exhaustive investigation to discover new facts, to interpret them

in the light of known ideas, theories and laws, to receive the current laws and theories in the light of the newly discovered facts to apply the conclusion to practical purpose.

या व्याख्यांचा अभ्यास केला तर आपल्या असे लक्षात येते की संशोधनात ज्ञानाचा शोध घेतला जातो. जुन्या संकल्पना तपासून पाहिल्या जातात. संशोधन ठाम निष्कर्षांबाबत आग्रही असते. संशोधनाला शास्त्रीय पद्धती लागते आणि संशोधन हे विशिष्ट हेतूच्या पूर्तीसाठी केले जाते.

जे अज्ञात आहे ते ज्ञात करून देणे, एखादे नवे तत्त्व शोधून काढणे, नवा सिद्धांत मांडणे अथवा एखादे रहस्य उलगडणे, असा संशोधनाचा अर्थ घेतला जातो. जिज्ञासा, सत्यशोधन अथवा तथ्यनिर्णय ही एक प्रवृत्ती आहे. ही प्रवृत्ती म्हणजेच संशोधनाच्या बौद्धिक प्रक्रियेचा प्रारंभ होय. जिज्ञासू वृत्तीमुळे मनुष्याला एखादा प्रश्न पडतो. त्या प्रश्नाची चिकित्सा करून त्याचे उत्तर शोधण्याचा मनुष्य प्रयत्न करतो. त्या प्रयत्नाला शास्त्रीय तत्त्वांचा आणि शोध पद्धतीचा आधार घ्यावा लागतो. तेव्हाच त्याला शास्त्रीय संशोधनाची प्रतिष्ठा लाभते. दैनंदिन व्यवहारातही मनुष्याला प्रश्न पडतात व त्यांची उत्तरे प्राप्त केली जातात. परंतु हे लौकिक संशोधन शास्त्रीय संशोधनाच्या कक्षेत येत नाही. सृष्टिविज्ञान, समाजविज्ञान किंवा मानव्यविज्ञान यात जे संशोधन आपल्याला अभिप्रेत असते, त्यात हे लौकिक व्यवहारातले संशोधन समाविष्ट करता येत नाही.

जिज्ञासा, सत्यनिष्ठा, निर्भयता, परिश्रमशीलता, चिकाटी हे सर्वच प्रकारच्या संशोधनासाठी आवश्यक असलेले गुण आहेत. संशोधकाची भूमिका ही वस्तुनिष्ठ व नि:पक्षपाती असावी. ज्ञानोपासकाच्या भूमिकेतूनच संशोधन झाले पाहिजे. जिज्ञासू वृत्तीने निर्माण झालेल्या प्रश्नापासून संशोधनाला प्रारंभ होतो आणि त्या प्रश्नाचे विश्वसनीय व प्रमाणभूत उत्तर मिळाले की संशोधन

प्रक्रियेचा शेवट होतो. संशोधनाची कार्यपद्धती, व्याप्ती, कालमर्यादा यावरून संशोधनाचे अनेक प्रकार पडतात. उदा. वर्णनात्मक संशोधन, तुलनात्मक संशोधन, ऐतिहासिक संशोधन, व्यष्टी अध्ययन, सांख्यिकी अभ्यास इत्यादी. उल्लेख विश्लेषण हा असाच एक सांख्यिकी अभ्यास आहे.

## १.३ संशोधन समस्या

मानवी समाजाला विविध गरजा असतात. जेव्हा यातील एखादी गरज उपलब्ध साधनांद्वारे भागवता येत नाही तेव्हा ती समस्या बनते. म्हणजेच, समाजाच्या गरजा सोडवण्यात येणारी अडचण किंवा अडथळा म्हणजे समस्या होय. संशोधन कार्याला प्रारंभ करण्यापूर्वी संबंधित समस्येचे पूर्ण स्वरूप समजून घ्यावे लागते. ते फारच व्यापक असेल तर सीमित करावे लागते. कारण, अमर्यादित समस्येवर संशोधन करणे शक्य नसते. म्हणून समस्येला मर्यादित केले पाहिजे. (घाटोळे, १९९०) संशोधन समस्या ही संशोधनीय असली पाहिजे. नवीन असली पाहिजे. संशोधन समस्येसंबंधीची माहिती उपलब्ध तरी असली पाहिजे किंवा आवश्यक ती माहिती मिळवणे तरी शक्य असले पाहिजे. (कुंभार, २०१३)

कोणत्याही संशोधनाच्या सुरवातीला संशोधक काही वस्तुस्थितीदर्शक माहिती गोळा करतो. परंतु त्या माहितीच्या मागे काही गोष्टी दडलेल्या असतात ज्या संशोाकाला माहीत नसतात. अशावेळी समस्येची निर्मिती होते. (बर्वे, २०१०) संशोधन समस्या कमीत कमी तीन गोष्टींद्वारे व्यक्त करता येते.

१) एकाच संशोधन क्षेत्रात झालेल्या अनेक संशोधकांच्या संशोधनामध्ये स्पष्टरीत्या पोकळी असेल तर त्या ठिकाणी समस्येची निर्मिती होते.

२) जेव्हा अनेक संशोधकांचे संशोधन परस्परविरोधी असेल त्यावेळी संशोधन समस्या आढळून येते.

३) ज्यावेळी एखादी वस्तस्थिती अस्पष्टरीत्या मांडली जाते त्यावेळी समस्या निर्माण होते.

संशोधनासाठी समस्या विधानाची निवड करणे आव्हानात्मक काम आहे. त्यासाठी समस्येची निवड करण्यापूर्वी व ती मांडण्यापूर्वी संशोधकाला समस्या म्हणजे काय, ते माहीत असणे आवश्यक आहे. समस्येची व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येईल. संशोधन समस्या म्हणजे एक प्रश्नार्थक व तपासून पाहण्यायोग्य विधान असते; ज्याद्वारे दोन किंवा दोनपेक्षा अधिक परिवर्तकांमधील संबंध व्यक्त होतात.

### १.३.१ प्रस्तुत संशोधनातील संशोधन समस्या

प्रस्तुत संशोधनासाठी पुढीलप्रमाणे संशोधन समस्या विचारात घेण्यात आल्या आहेत.

१) संशोधनाच्या प्रवाहाची स्थिती काय आहे?

२) नियतकालिक निवडीसाठी उपयुक्त साधन म्हणून उल्लेख विश्लेषणाचा वापर होतो का?

## १.४ समस्या सूत्रण

कोणत्या विषयावर संशोधन करायचे आहे, ते संशोधकाला सर्वप्रथम निश्चित करावे लागते. ज्या विषयावर संशोधन करायचे आहे त्या विषयावरील संशोधनाची दिशा स्पष्ट होण्यासाठी समस्या सूत्रण महत्त्वाचे आहे. समस्या सूत्रण हे संशोधकास माहिती संकलित करण्यासाठी, तसेच कार्यक्षेत्राची निवड करण्यासाठी उपयुक्त ठरते. संशोधन समस्येशी संबंधित वेगवेगळ्या संदर्भग्रंथांचे वाचन, पूर्वसंशोधन, प्रत्यक्ष निरीक्षण, माहितीचे संकलन इ. बाबींच्या संदर्भात हे समस्या सूत्रण महत्त्वाचे ठरते. समस्या सूत्रण न करता संशोधनाच्या मार्गावर वाटचाल करणे म्हणजे होकायंत्राशिवाय समुद्रात जहाज चालवण्यासारखे आहे. (कायंदे—पाटील, २००९)

प्रस्तावित संशोधनाची उद्दिष्टे, व्याप्ती, गृहितके, समस्या विधान, विविध संज्ञांचया कार्यात्मक व्याख्या इ. घटकांच्या मदतीने संशोधन समस्या सविस्तरपणे स्पष्ट करणे या प्रक्रियेचा समस्या सूत्रणमध्ये समावेश होतो. असेही म्हणता येईल की प्रस्तावित संशोधन समस्येबाबत सखोल माहिती देणे म्हणजे समस्या सूत्रण होय. (कुंभार, २०१३)

### १.४.१ प्रस्तुत संशोधनातील समस्या सूत्रण

१) उल्लेख विश्लेषणामुळे भाषा विभागातील संशोधनाचे प्रवाह कळतात का?

२) उल्लेख विश्लेषण हे नियतकालिक निवडीसाठी ग्रंथालयात उपयुक्त ठरते का?

## १.५ संशोधन आराखडा

आराखडा म्हणजे एखाद्या कार्याचे पद्धतशीर नियोजन, त्याची रचना किंवा मांडणी; जेणेकरून त्या कार्याला सुसूत्रपणा किंवा व्यवस्थितपणा येतो. संशोधनाचेही असेच आहे. (कऱ्हाडे, २०११) संशोधकाला आपल्या संशोधनात पद्धतशीर नियोजन करावे लागते. त्याची रूपरेषा ठरवावी लागते. संशोधनाचे स्वरूप निश्चित व स्पष्ट करावे लागते. या पूर्वतयारीलाच संशोधनाचा आराखडा म्हणतात. (कुलकर्णी आणि ढमढेरे, २००७)

संशोधन आराखड्याशिवाय वस्तुनिष्ठ संशोधन करणे कठीण आहे. संशोधकाला कशा प्रकारे संशोधन करायचे आहे? नमुना कोणता असेल? तथ्ये कशी संकलित केली जातील? या बाबतचे निर्णय संशोधन करण्यापूर्वीच संशोधन आराखड्यात निश्चित केले जातात.

संशोधनाचा उद्देश, कालावधी, नमुना निवड, माहिती गोळा करणे, संभाव्य अडचणी यांचा विचार संशोधन आराखड्यात केलेला असतो. म्हणून संशोधन आराखड्याला संशोधनात फार महत्त्व आहे.

म्हणजेच, संशोधन आराखडा ही एक योजना किंवा रूपरेषा आहे. ती समस्येच्या निर्धारणेपासून निराकरणापर्यंत नियंत्रण ठेवते. त्यामुळे संशोधकाचा श्रम, वेळ व पैसा वाचतो. आगलावे (२०००) यांच्या मते संशोधन आराखड्यात समस्येच्या निर्धारणापासून निराकरणापर्यंत योग्य प्रकारे विचार केला जातो. उपलब्ध पर्यायांवर लक्ष दिले जाते व निर्णय घेतले जातात. त्यामुळे जास्तीत जास्त उद्दिष्टे साध्य केली जातात.

## १.६ संशोधनाचा हेतू

संशोधन करताना संशोधक कोणता तरी हेतू मनात बाळगून असतो. त्या हेतूच्या अनुषंगाने त्याचे संशोधन चालते. कुंभार (२०१३) यांच्या मतानुसार, विविध व्यक्ती विविध हेतूंनी संशोधन करीत असतात. उत्सुकता, शैक्षणिक अनिवार्यता, कार्यालयीन जबाबदारी, समस्येची सोडवणूक, सामाजिक हित अशा अनेक हेतूंसाठी संशोधन केले जाऊ शकते. संशोधनाच्या सर्व हेतूंची पुढील तीन प्रकारे वर्गवारी करता येते.

(१) नवीन विषयाचा शोध घेणे
(२) घडलेल्या घटनांचे वर्णन करणे
(३) कारणमीमांसा करणे

### १.६.१ प्रस्तुत संशोधनातील संशोधनाचा हेतू

भाषा हे विचारांची देवाणघेवाण करण्याचे प्रमुख साधन आहे. भाषेतील साहित्यनिर्मिती ही त्याची समृद्धी दर्शवते. त्यातील वैचारिक व संशोधनात्मक लेखन हे त्या विषयाची खोली व विचारांचा प्रवाह दर्शवते. या विषयात

केलेला अभ्यास हा अनेक कारणांसाठी उपयुक्त आहे. समाजाचा अभ्यास करणारे, साहित्याचा विचार करणारे, भाषेची स्थितीगती न्याहाळणारे, ग्रंथसंग्रह करून ज्ञानाची जपणूक करणारे अशा सर्वांनाच या अभ्यासाचा चांगला उपयोग होणार आहे. हाच प्रस्तुत संशोधनातील संशोधनाचा हेतू आहे.

संशोधकाने ''मुंबई विद्यापीठातील भाषा विभागात सादर केलेल्या प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण'' या विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे.

## १.७ संशोधनाची उद्दिष्टे

कोणत्याही विषयाचा शास्त्रोक्त अभ्यास करताना त्या अभ्यासाची गरज लक्षात घ्यावी लागते. ही गरज म्हणजेच उद्दिष्टे होत. ही कार्यदर्शक विधाने असतात. संशोधन समस्या सोडवण्यासाठी संशोधक काय करणार आहे त्या तर्कशुद्ध विधानांना उद्दिष्टे म्हणतात. ही स्पष्ट शब्दांत लिहिलेली असतात. संख्या खूप कमी किंवा खूप जास्त नसावी. संशोधन समस्येची सोडवणूक करता येईल एव्हढी उद्दिष्टे असावीत. ही उद्दिष्टे म्हणजे अभ्यासाच्या प्रवासाचे गन्तव्यस्थानच समजायला हवीत.

### १.७.१ प्रस्तुत संशोधनासाठीची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१) मुंबई विद्यापीठातील भाषा विभागातील प्रबंधांमध्ये उल्लेखासाठी वापरलेला लेखक—प्रकार अभ्यासणे

२) मुंबई विद्यापीठातील भाषा विभागातील प्रबंधांतील उल्लेखांचे भौगोलिक स्थान तपासणे

३) मुंबई विद्यापीठातील भाषा विभागातील प्रबंधांमध्ये उल्लेखांसाठी वापरलेली माध्यम पद्धती अभ्यासणे

४) मुंबई विद्यापीठातील भाषा विभागातील प्रबंधांमध्ये उल्लेखासाठी वापरलेला प्रलेख—प्रकार अभ्यासणे

५) मुंबई विद्यापीठातील भाषा विभागातील प्रबंधांमधील उल्लेखांचा प्रकाशन काळ अभ्यासणे.

६) उपलब्ध माहितीच्या विश्लेषणातून प्राप्त झालेल्या नियतकालिकांची क्रमवार यादी तयार करणे

७) सर्वसाधारण संशोधनाचा प्रवाह शोधणे

## १.८ गृहितक

संशोधनामध्ये समस्या सूत्रण केल्यावर संशोधन यशस्वी रीतीने पूर्ण करण्याासाठी संशोधनात योग्य विधान मांडावे लागते. अशा विधानालाच गृहितक असे म्हणतात. याच्या आधारे संशोधनास योग्य दिशा मिळते. संभाव्य उत्तरांचा शोध घेता येतो. ज्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी संशोधन कार्य सुरू होते, त्या प्रश्नाचे संभाव्य उत्तर म्हणजे गृहितक होय. हे दोन किंवा अधिक घटकांतील परस्परसंबंध स्पष्ट करते. गृहितकालाच अभ्युपगम, पूर्वानुमान, परिकल्पना, उपकल्पना, गृहित कृत्य अशीही नावे आहेत (कायंदे—पाटील, २००९). पाटील (२००८) यांच्या मतानुसार, संशोधकास आपला प्रश्न किंवा समस्या चांगल्या प्रकारे ओळखता आली म्हणजे त्याची संभाव्य उत्तरे काय असू शकतील याचा तो तर्क किंवा अंदाज करू शकतो. या संभाव्य उत्तरालाच गृहितक असे म्हणतात. ही गृहितके संशोधकास समस्या सोडवण्यास मदत करतात. तसेच समस्या सोडवण्यासाठी हाती घ्याव्या लागणाऱ्या चौकशीत त्याला मार्गदर्शन करतात.

गृहितक किंवा परिकल्पना तार्किक रूपाने सुसंगत असल्यास त्या गृहितकाची परिणाम करणारी विधाने तयार करून तिचा उपलब्ध माहितीशी समन्वय साधावा. समन्वय साधणे शक्य असल्यास ते गृहितक स्वीकृत करण्यात येते. समन्वय साधणे शक्य नसल्यास ते अस्वीकृत करण्यात येते. (घोरपडे आणि घोरपडे,२००८). गृहितक किंवा अभ्युपगम प्रयोगाने सिद्ध झाले तर त्याला सिद्धांताचे स्वरूप प्राप्त होते (संत,२००७).

वरील विवेचनावरून आपल्या असे लक्षात येईल की गृहितक म्हणजे असे विधान की ज्याची सप्रमाणता ठरवण्यासाठी परीक्षण केले जाते व ते पुढील संशोधनासाठी उपयुक्त ठरते. उपयुक्त गृहितक सिद्धांताची निर्मिती करू शकते. परीक्षित, सिद्ध केलेल्या व उपयुक्त गृहितकांचा समूह हा तर्काच्या आधारावर अस्तित्वात आणला जातो. नंतर, तर्काचा उपयोग करून तथ्यांच्या माध्यमातून गृहितकाला किंवा गृतिकांच्या समूहाला सिद्धांत स्वरूपात प्रस्थापित करण्यासाठी त्यावर प्रक्रिया केली जाते.

### १.८.१ प्रस्तुत संशोधनासाठीची गृहितके

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहितके निश्चित केली आहेत.

१) संशोधक आपल्या संशोधनासाठी नियतकालिकांचा जास्त वापर करतात.

२) संशोधक आपल्या संशोधनात अंकीय उल्लेखांचा (E-Citation) वापर जास्त प्रमाणात करत नाहीत.

### १.९ संशोधनाची पार्श्वभूमी / गरज

मुंबई विद्यापीठातील भाषा विभाग अतिशय समृद्ध आहे. या विभागात संशोधनीय कार्य देखील उत्तम केले आहे. परंतु त्याच्या वाढीची, बदलत्या प्रवाहाची तसेच त्यात अभ्यासल्या गेलेल्या विविध पैलूंची नोंद घेण्यात आलेली नाही. अशी नोंद घेणे क्रमप्राप्त होते. या नोंदीमुळे भावी अभ्यसकांना दिशा मिळू शकते. नव्या संशोधनासाठी प्रोत्साहन मिळते. तसेच एकत्रित असे दस्तावेजीकरण होते. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनाचा विषय निवडण्यात आला आहे. या विषयावर गेल्या ३२ वर्षांत कोणतेही संशोधनात्मक कार्य करण्यात आलेले दिसून येत नाही. यातूनच प्रस्तुत संशोधनाचे कार्य संशोधकाने हाती घेतले आहे.

## १.१० अभ्यासाची निवड

संशोधनात्मक साहित्य निर्मितीचा मागोवा घेतला असता असे आढळून येते की विविध विद्याशाखांतून विविध विषयात उल्लेख विश्लेषणाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. (संदर्भ : प्रकरण दोन मधील वाचनसाहित्याचा आढावा.) परंतु भाषेचा अभ्यास एखादा अपवाद वगळता करण्यात आल्याचे दिसून येत नाही. भाषा हे मानवी जीवनाचे प्रमुख अंग आहे. त्यामुळे भाषेचा अभ्यास करणे हे गरजेचे झाले आहे. हे लक्षात घेऊन प्रस्तुत संशोधनाद्वारे या अभ्यासाची निवड करण्यात आली आहे.

## १.११ संशोधनाची व्याप्ती

संशोधनाच्या व्याप्तीवरून संशोधनाची ढोबळमानाने कल्पना येते, व संशोधन आराखड्यामध्ये व्याप्ती दिलेली असते. व्याप्तीमध्ये प्रस्तावित संशोधनाची विषय व्याप्ती, भौगोलिक तसेच कालात्मक व्याप्ती स्पष्टपणे नमूद असावी. तसेच, विशिष्ट एक व्याप्ती निश्चित करण्याची कारणेही नमूद करावीत. प्रस्तुत संशोधनात मुंबई विद्यापीठातील भाषा विभागात सादर केलेले 'पीएच डी' चे प्रबंध अभ्यासले जाणार आहेत. त्यामुळे प्रस्तुत संशोधनातील अभ्यास विषयाची व्याप्ती मुंबई विद्यापीठापुरतीच आहे. मुंबई विद्यापीठात एकूण पंधरा भाषा शिकवल्या जातात. त्या अशा : अरेबिक, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, गुजराती, हिंदी, कन्नड, मराठी, पाली, पर्शियन, रशियन, संस्कृत, सिंधी, उर्दू व चिनी.

( mu.ac.in/portal/language_linguistics_and_literature/ )

### १.११.१ प्रस्तुत संशोधनासाठी भाषांची निवड

त्यापैकी चिनी भाषा वगळता इतर सर्व भाषांमध्ये पीएच डी पदवीची सोय आहे. परंतु प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्रातील जास्तीत जास्त वापरल्या जाणाऱ्या इंग्रजी, हिंदी व मराठी या तीन भाषांची निवड केली आहे. त्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. एकूण पंधरा भाषा जरी मुंबई विद्यापीठात शिकवल्या जात असल्या व त्यातील चौदा भाषांतील प्रबंध अभ्यासाला उपलब्ध असले तरी संशोधक विद्यार्थी सर्व भाषा समजू व अभ्यासू शकत नाही. सर्व भाषांच्या आकलनासाठी काही मानवी मर्यादा पडतात. त्यामुळे न समजणाऱ्या इतर भाषा वर्ज्य कराव्या लागल्या.
२. सर्व भाषांतील तथ्य संकलन केल्यास ते मर्यादेच्या बाहेर जात होते. संशोधन विषय विशिष्ट मर्यादेत असल्यास संशोधन जास्त अचूकतेने होते. त्यामुळे इतर भाषांचा विचार बाजूला ठेवावा लागला.
३. प्रस्तुत संशोधन करताना संशोधक विद्यार्थ्याला इंग्रजी, हिंदी व मराठी या भाषा व्यवस्थितपणे लिहिता, वाचता येत असल्याने तथ्य संकलन करण्यात विशेष अडचण नव्हती. तसेच या तीन भाषा महाराष्ट्रत प्रामुख्याने वापरल्या जातात.

यामुळे संशोधकास अभ्यासता येणाऱ्या मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील प्रबंधांचा संशोधनासाठी विचार करण्यात आला आहे.

## १.१२ संशोधन लक्ष्य आणि नमुना निवड

मुंबई विद्यापीठात इंग्रजी ६०, हिंदी ११४ व मराठी ५३ म्हणजे एकूण २२७ प्रबंध अभ्यासासाठी उपलब्ध झाले.

त्यातील काही प्रबंध हे जुने व उपयोगात आणता येण्याच्या स्थितीत नव्हते. ते जीर्ण झाले होते. कसर लागलेले व कागद पिवळे पडलेले असे होते. त्यांची छायाप्रत सुद्धा नीट वाचता येत नव्हती. अशी माहिती संशोधनासाठी उपयोगात आणणे शक्य नव्हते. त्यामुळे ते बाद करावे लागले. उरलेल्या इंग्रजी– ५२, हिंदी– १०५ व मराठी– ४८ अशा एकूण २०५ प्रबंधांची संशोधनासाठी निवड करण्यात आली. हे प्रमाण ९०% इतके आहे. ते संशोधनासाठी पुरेसे व योग्य आहे. तक्ता क्र. १.१ पहा.

तक्ता क्र. १.१ : संशोधन लक्ष्य व निवड

| | **संशोधन लक्ष्य (एकूण प्रबंध)** | **प्रबंध निवड** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| **इंग्रजी** | ६० | ५२ | ८६% |
| **हिंदी** | ११४ | १०५ | ९२% |
| **मराठी** | ५३ | ४८ | ९०% |
| **एकत्रित** | २२७ | २०५ | ९०% |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

तक्त्यावरून लक्षात येते की इंग्रजी भाषेतील उपलब्ध ६० प्रबंधांपैकी एकूण ५२ प्रबंध अभ्यासासाठी चांगल्या स्थितीत उपलब्ध झाले. हे प्रमाण ८६% असून संशोधनासाठी योग्य आहे. तसेच, हिंदी भाषेतील उपलब्ध ११४ प्रबंधांपैकी एकूण १०५ प्रबंध अभ्यासासाठी चांगल्या स्थितीत उपलब्ध झाले. हे प्रमाण ९२% असून संशोधनासाठी योग्य आहे. तसेच, मराठी भाषेतील उपलब्ध ५३ प्रबंधांपैकी एकूण ४८ प्रबंध अभ्यासासाठी चांगल्या स्थितीत उपलब्ध झाले. हे प्रमाण ९०% असून संशोधनासाठी योग्य आहे. भाषांचा एकत्रित विचार केला असता एकूण उपलब्ध २२७ प्रबंधांपैकी २०५ प्रबंध अभ्यासासाठी चांगल्या स्थितीत उपलब्ध झाले. हे प्रमाण ९०% असून संशोधनासाठी योग्य आहे.

## १.१३ स्त्री — पुरुष लेखक प्रमाण

संशोधनात्मक लेखनाचा अभ्यास करताना त्याची निर्मिती स्त्री—लेखकाने किंवा पुरुष—लेखकाने केली आहे, हे पाहणे औत्सुक्याचे ठरते. संशोधनासाठी उपलब्ध प्रबंधांतील तथ्यांचे संकलन केले असता त्यातील स्त्री—पुरुष लेखकांच्या संशोधनात्मक लेखनाचे प्रमाण खालीलप्रमाणे उपलब्ध झाले. तक्ता क्र. १.२ पहा.

तक्ता क्र. १.२ : स्त्री—पुरुष लेखक प्रमाण

| | **इंग्रजी** | **हिंदी** | **मराठी** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| **स्त्री—लेखक** | ३० (५७%) | ३८ (३६%) | ३३ (६८%) | **१०१ (४९%)** |
| **पुरुष—लेखक** | २२ (४३%) | ६७ (६४%) | १५ (३२%) | **१०४ (५१%)** |
| **एकूण** | **५२** | **१०५** | **४८** | **२०५ (१००%)** |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

भाषा विभागाचा एकत्रित विचार केला असता असे आढळते की भाषा विषयात स्त्री—लेखकांचे प्रमाण ४९% असून पुरुष—लेखकांचे प्रमाण ५१% इतके आहे. याचाच अर्थ असा की स्त्री—लेखकाचे प्रमाण पुरुष—लेखकाच्या प्रमाणापेक्षा थोडे कमी आहे व हा फरक अगदीच दुर्लक्ष करण्यासारखा पण आहे.

## १.१४ प्रस्तुत संशोधनाचा कालावधी

प्रस्तुत संशोधनासाठी निवड केलेला कालावधी हा १९८० ते २०१२ इतका आहे. मागील ३२ वर्षांचा हा कालावधी अभ्यासासाठी विचारात घेतला आहे. या अभ्यासासाठी तिन्ही भाषांतील इ.स. १९८० पासून इ.स. २०१२ पर्यंतच्या उपलब्ध सर्व प्रबंधांचा अभ्यास करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनासाठीची संशोधक विद्यार्थ्याची नावनोंदणी इ.स. २०१३ मधील असल्याने ह्या कालावधीची निवड केली. प्रस्तुत संशोधनासाठी प्रबधांतील लेखक—प्रकार, भोगोलिक स्थान, माध्यम पद्धती, प्रलेख—प्रकार व प्रकाशन कालावधी असे अभ्यासाचे परिप्रेक्ष्य निश्चित करण्यात आले आहे.

## १.१५ संशोधनाची मर्यादा व उल्लेख संख्या

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या प्रबंधांतील उल्लेख संख्या ही इंग्रजी ६७७२, हिंदी ९९९१, मराठी ४४६३ इतकी असून एकत्रित २१२२६ इतकी आहे. (तक्ता क्र. १.३)

तक्ता क्र. १.३ : प्रबंध उल्लेख संख्या

| अनुक्रम | भाषा | प्रबंध संख्या | एकूण पृष्ठे | एकूण उल्लेख |
|---|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | ०५२ | ६३५ | ६७७२ |
| २ | हिंदी | १०५ | ६४५ | ९९९१ |
| ३ | मराठी | ०४८ | ३०४ | ४४६३ |
| | **एकूण** | **२०५** | **१५८४** | **२१२२६** |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

## १.१६ प्रस्तुत संशोधनातील संज्ञांचे स्पष्टीकरण

### मुंबई विद्यापीठ

मुंबई विद्यापीठ हे भारततातील सर्वोच्च तीन विद्यापीठांपैकी एक आहे. याची स्थापना इ.स. १८५७ मध्ये झाली. युजीसी द्वारे Potential of Excellence हा दर्जा प्राप्त झालेला आहे. याची इमारत ही जागतिक वारसा (World Heritage) म्हणून ओळखली जाते. मुंबई येथे सिथत असलेले हे विद्यापीठ एक उत्कृष्ट शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जाते. येथे प्रेमचंद रायचंद यांनी आपली आई श्रीमती राजाबाई यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिलेल्या

देणगीतून एक घड्याळ मनोरा उभारण्यात आलेला आहे. हा राजाबाई टॉवर पाहण्यास ठिकठिकाणचे लोक येत असतात.

मुंबई विद्यापीठ हे भारतातील विद्यापीठांपैकी एक जुने आणि प्रमुख विद्यापीठ आहे. 'वुडस् शैक्षणिक योजने'अंतर्गत मुंबई विद्यापीठाची स्थापना सन १८५७ मध्ये झाली. म्हणजेच दीडशेहून अधिक वर्षे ते ज्ञानदानाचे कार्य करीत आहे. 'नॅक' ने त्याला सातत्याने अ दर्जा दिलेला आहे. आय. एस. ओ. प्रमाणित असे हे विद्यापीठ आहे. जागतिक विद्यापीठ यादीमध्ये पहिल्या २०० विद्यापीठांमध्ये याने क्रमांक पटकवला आहे. तसेच, भारतातील प्रथम तीन विद्यापीठांपैकी एक असा मान मिळवला आहे. (संदर्भ : *http:/mu.ac/portal/about-us/*) 'बाँबे' शहराचे 'मुंबई' असे नामकरण झाल्यामुळे विद्यापीठाचे नाव 'बाँबे विद्यापीठ' ऐवजी 'मुंबई विद्यापीठ' असे झाले. सदर अधिसूचना ४ सप्टेंबर १९९६ रोजी महाराष्ट्र सरकारद्वारा लागू केलेल्या राजपत्रात प्रकाशित झाली. विद्यापीठाचे सध्याचे कुलपती मा. श्री. विद्यासागर राव हे आहेत, व कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर हे आहेत. (संदर्भ : *http:/mu.ac/portal/about-us/*)

येथील ग्रंथालयही समृद्ध असे ज्ञानभांडार आहे. याची उभारणी इ.स. १८६४ मध्ये झाली. सर्वसामान्य वाचकांसाठी ते इ.स. १८८० मध्ये खुले झाले. यासाठी सर्वश्री अ. का. प्रियोळकर, श्री. पाटकर, पी. वाय. काणे इत्यादींचा दुर्मिळ ग्रंथसंग्रह सप्रेम भेट म्हणून मिळाला आहे. या ग्रंथालयाची सर्वसाधारण ग्रंथसंपदा तक्ता क्र. १.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहे.

तक्ता क्र. १.४ : मुंबई विद्यापीठ ग्रंथालय: एक दृष्टिक्षेप

| **क्रमांक** | **तपशील** | **संख्या** |
|---|---|---|
| १ | सर्वसाधारण ग्रंथ | ७५१८३७ |
| २ | पाठ्यपुस्तके | १४९०४ |
| ३ | संदर्भ ग्रंथ | १११६८ |

| | | |
|---|---|---|
| ४ | नियतकालिके | ६३१ |
| ५ | C Ds | २०७४ |
| ६ | Database | ५ |
| ७ | ऑनलाईन नियतकालिके | ४४५३ |
| ८ | प्रबंध | २०२२८ |
| ९ | हस्तलिखिते | ९९०० |
| १० | World Bank Repository | ३०१०४ |

(स्त्रोत : https://university.careers360.com/articles/mumbai-university-courses )

याशिवायही अंध वाचकांसाठी ब्रेल लिपीतील साहित्य येथे उपलब्ध आहे. संशोधकांसाठी दुर्मिळ ग्रंथ (Rare Books) येथे जतन करून ठेवण्यात आले आहेत.

**भाषा विभाग**

भाषा ही त्या त्या देशाचा सांस्कृतिक इतिहास कथन करते. त्यामुळे भाषेचा अभ्यास म्हणजे देशवर्तमान जाणून घेणे होय. देश, देशातील माणसे, देशाचा सामाजिक, सांस्कृतिक, तसेच शैक्षणिक प्रगतीचा आलेख भाषेच्या अभ्यासातून प्रगट होत असतो. भाषा ही आपल्या अनुभवाला दिलेला प्रतिसाद असतो. ती केवळ सूचना किंवा माहिती पुरवण्याचे साधन नसते. तर भावना व्यक्त करण्याचे माध्यमही असते. ज्ञान आणि संस्कृती जतन आणि संवर्धन करण्याचा ती एक महत्त्वाचा स्त्रोत असते. शैक्षणिक क्षेत्रात तर माहिती पुरवण्याच्या बाबतीत भाषा ही महत्त्वाची भूमिका बजावत असते. भाषेतील संशोधन हे समाज, संस्कृती आणि दिव्य परंपरांचा वारसा जाणून घेण्यासाठी उायुक्त ठरते. भारतासारख्या देशात तिथे २२ हून अधिक भाषा राजपत्रित

म्हणून मिरवतात व हजारो अराजपत्रित बोलीभाषा समाजाचे प्रतिनिधित्व करतात, तिथे भाषांचा अभ्यास हे संशोधनातील महत्त्वपूर्ण कार्य ठरते.

**प्रबंध**

विशिष्ट विषयातील सर्वोच्च पदवी प्राप्त करून देणारे साधन म्हणजे प्रबंध होय. संशोधक विशिष्ट विषय निवडतो. मार्गदर्शकाच्या सल्ल्यानुसार संशोधन करतो. त्याचे निष्कर्ष शेवटी विद्यापीठाला सादर करतो. या संशोधन साहित्यालाच प्रबंध असे म्हणतात. यात विशिष्ट विषयावरील अद्यायावत व संशोधित अशी माहिती असते. पुढील संशोधकांना ते अभ्यासासाठी उपयुक्त ठरतात. संशोधन कुठल्या स्तरापर्यंत झालेले आहे, याचे ते पुरावे असतात. विद्यापीठासाठी असे प्रबंध हे आभूषण असतात.

**उल्लेख विश्लेषण**

विशिष्ट विषयात संशोधनात्मक लेखन करीत असताना लेखक काही आधार, काही पुरावे देत असतात. त्यांची योग्य प्रकारे नोंद केली जाते. या नोंदी म्हणजेच उल्लेख होत. यांचे विश्लेषण करून त्या विषयाचा प्रवाह, मुख्य नियतकालिक यादी, लेखक—प्रकार अशा अनेक बाबी कळतात.

## १.१७ प्रस्तुत संशोधनाची कार्यपद्धती

मुंबई विद्यापीठातील भाषा विभागात सादर केलेले इंग्रजी, हिंदी व मराठी भाषांत सादर झालेले २०५ प्रबंध हे माहितीचा एकमेव स्त्रोत आहेत. त्यातून लेखक—प्रकार, भौगोलिक स्थान संदर्भ, माध्यम पद्धती, प्रलेख—प्रकार व प्रकाशन वर्ष संदर्भ या निकषांवर आधारित माहिती संकलित केलेली आहे. सर्वात आधी तालिकेच्या साहाय्याने प्रबंधांची सूची मिळवली. उपलब्ध सर्व प्रबंधांतील संदर्भ ग्रंथसूचींच्या छायाप्रती प्राप्त करून घेतल्या. ज्या छायाप्रती अस्पष्ट होत्या किंवा पुरेसे प्रयत्न करूनही नीट समजत नव्हत्या त्यांना बाजूला काढण्यात आले. अशा छायाप्रती फारच कमी होत्या हे विशेष. छायाप्रतींच्या

आधारे उपलब्ध सर्व उल्लेखांचा वर दिलेल्या निकषांद्वारे अभ्यास केला जाणार आहे. त्यांचे वर्गीकरण, विश्लेषण करून निष्कर्ष मांडले जाणार आहेत. MS-Excel वापरून संख्यात्मक विश्लेषण केले जाणार आहे. योग्य ठिकाणी तक्ते व आलेखांचा वापर केला जाणार आहे. जेणेकरून माहितीची विश्लेषण करणे सोपे होईल.

## १.१८ प्रस्तुत संशोधनाचे योगदान

प्रस्तुत संशोधन प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या कोणाला उपयुक्त ठरणार आहे, याची इथे नोंद घेण्यात आली आहे. त्यावरून प्रस्तुत संशोधनाचे योगदान कळण्यास मदत होईल.

१) मुबई विभागातील भाषा विभागात सादर केलेल्या उपलब्ध प्रबंधांची सूची अभ्यासकांना उपलब्ध होईल.

२) भाषेच्या विकासाच्या संदर्भात कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना भाषेच्या विकासाच्या प्रवाहाचे प्रचनित ज्ञान प्राप्त होईल.

३) मुंबई विद्यापीठाव्यतिरिक्त अन्य विद्यापीठातील भाषा विभागातील प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण करणाऱ्या अभ्यासकांना हा प्रबंध आधारभूत होईल.

४) भाषावार मुख्य नियतकालिक यादीमुळे ग्रंथपालांना नियतकालिक निवडीसाठी आधार मिळेल. तसेच वाचनसाहित्य विकासासाठी मदत होईल.

## १.१९ प्रस्तुत संशोधनातील प्रकरणांची रूपरेषा

प्रस्तुत प्रबंधाची मांडणी एकूण पाच प्रकरणांत करण्यात आली आहे.

**प्रकरण एक : प्रस्तावना**

या प्रकरणात संशोधन पद्धती व संशोधनाचा आराखडा देण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनासाठीची उद्दिष्टे, गृहितके, व्याप्ती, प्रस्तुत संशोधन विषयासंबंधित इतर संज्ञा इत्यादी माहिती देण्यात आली आहे.

**प्रकरण दोन : वाचनसाहित्याचा आढावा**

प्रस्तुत प्रकरणात वाचनसाहित्याचा आढावा, त्याचे महत्त्व, इत्यादी विषयी चर्चा केली आहे. तसेच प्रस्तुत संशोधनाशी संबंधित अशा वाचनसाहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित अन्य संशोधकांनी काय अभ्यास केला आहे व कोणत्या विषयांवर अभ्यास केला आहे त्याची कल्पना येते व वाचनसाहित्याचा आढावा प्रबंध लिहिण्यास उपयुक्त ठरतो.

**प्रकरण तीन : उल्लेख आणि उल्लेख विश्लेषण**

प्रस्तुत प्रकरणात उल्लेख, त्याची आवश्यकता, तसेच उल्लेख विश्लेषण, त्याची गरज, त्याची उपयुक्तता याचे विवेचन केले आहे. प्रस्तुत संशोधनाचा विषय समजण्यासाठी त्याचा चांगला उपयोग झाला.

**प्रकरण चार : तथ्य संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण**

प्रस्तुत प्रकरणात जमा केलेल्या तथ्यांचे संकलन नोंदवले आहे. हे संकलन भाषानिहाय तसेच एकत्रित अशा स्वरूपात नोंदवले आहे. त्याचे संख्यात्मक स्वरूपात विश्लेषण केले आहे. त्यामुळे जमा झालेली माहिती अर्थपूर्ण झाली आहे. या माहितीचे तक्ते, तसेच आलेखांच्या साहाय्याने सादरीकरण केले आहे.

**प्रकरण पाच : निरीक्षण, निष्कर्ष आणि शिफारसी**

प्रस्तुत प्रकरणात जमा झालेल्या माहितीबाबत एकंदरीने सर्वसाधारण निरीक्षण नोंदवले आहे. त्यावरून भाषानिहाय व एकत्रित असे निष्कर्ष नोंदवून शिफारसी केलेल्या आहेत. तसेच पुढील अभ्यासासाठी विषयही दिलेले आहेत.

**परिशिष्टे**

यात संदर्भ ग्रंथसूची दिलेली आहे. भाषानिहाय मुख्य नियतकालिकांची यादी दिलेली आहे. तसेच सर्वात शेवटी शब्दार्थसूची सुद्धा समाविष्ट केली आहे.

## १.२० प्रस्तुत संशोधनासाठीची मार्गदर्शक तत्त्वे

या संशोधनासाठी मुंबई विद्यापीठातील भाषा विभागात सादर झालेल्या प्रबंधांचा उल्लेख विश्लेषणासाठी विचार करण्यात आला आहे. त्यासाठी इंग्रजी, हिंदी व मराठी यांचा विचार करण्यात आला आहे. या संशोधनासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे आधारासाठी उपयोगात आणली आहेत.

(१) एकाच नोंदीमध्ये एखाद्या नियतकालिकाच्या अनेक अंकांच्या नोंदी केल्या असतील तर त्या सर्वांची मिळून एकच नोंद घेतली आहे. उदा—

नवयुग : जानेवारी २०१४, एप्रिल २०१४, ऑक्टोबर २०१५

इथे नवयुग ही एकच नोंद समजण्यात आली आहे. परंतु जिथे अशा नोंदी स्वतंत्र दिलेल्या आहेत तिथे प्रत्येकाची स्वतंत्र नोंद घेतलेली आहे. उदा—

नवयुग : मे २०१४

नवयुग : जून २०१५

नवयुग : ऑक्टोबर २०१५

(२) इथे केवळ संदर्भ ग्रंथांचाच विचार केलेला आहे. म्हणजे ज्या ग्रंथांचा संदर्भ म्हणून उल्लेख झालेला आहे असेच ग्रंथ विचारात घेतले आहेत. त्यामुळे व्यक्तीचा अभ्यास करताना त्याने लिहिलेले साहित्य हे मूळ ग्रंथ असल्याने विचारात घेतलेले नाही. उदा— प्रेमचंद यांची गोदान ही कादंबरी.

(३) ज्या प्रबंधांमध्ये निव्वळ मूळ ग्रंथ लिहिलेले आहेत त्यांना प्रस्तुत संशोधनातून वगळलेले आहे.

(४) काही प्रबंधांतून व्यक्ती उल्लेख दिलेला आहे. म्हणजे नुसते व्यक्तीचे नाव देऊन त्याच उल्लेख त्या प्रबंधात कुठल्या पृष्ठावर आलेला आहे तो पृष्ठक्रमांक दिलेला आहे. अशा नोंदी प्रस्तुत संशोधनातून वगळल्या आहेत. उदा—

रॉय : ३४

गुप्ता : २५६, २८८

ग्रंथनाम उल्लेख निर्देशाचा मात्र संदर्भ म्हणून विचार करण्यात आला आहे. उदा—

नवयुग : २३

London Times: ९८

(५) ज्या प्रकाशित साहित्याचे प्रकाशन वर्ष इसवी सनाव्यतिरिक्त दिलेले आहे त्याची नोंद 'वर्ष दिलेले नाही (No Year)' या सदराखाली केलेली आहे. उदा—

शालीवाहन शक

विक्रम संवत् इ.

(६)ज्या ग्रंथांना/ लेखांना/ कोशांना संपादक असतील त्यांची नोंद लेखक या नावाने केली आहे.

(७) मुख्य नियतकालिकांची यादी बनवताना ज्यांची निव्वळ संक्षेपाक्षरे दिलेली आहेत त्यांची नोंद करण्यात आलेली नाही.

(८) मुख्य नियतकालिकांत समाविष्ट होण्यासाठी किमान दोन वेळा तरी त्या नियतकालिकाचा उल्लेख केलेला असल्याची खात्री करून घेतलेली आहे.

(९) शब्दकोश, ज्ञानकोश, हस्तलिखिते, वार्षिके, स्मरणिका, दृक्–श्राव्य साध्ने इत्यादींची नोंद ‘इतर (Other)’ या सदरात करण्यात आली आहे.

(१०) इंग्रजी नावाचे भाषांतर करताना शक्यतो अचूक करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु उच्चारात फरक पडू शकतो.

(११) एखाद्या लेखकाने संदर्भ देताना दुसऱ्या लेखकाचा उल्लेख केलेला असल्यास फक्त पहिल्या लेखकाच्याच नावाने नोंद घेण्यात आली आहे. उदा–

‘‘क्ष (२००१) यांच्या मतानुसार ‘य’ यांनी असे म्हटले आहे की...’’ इथे नोंद फक्त क्ष यांचीच घेण्यात आली आहे.

(१२) इंग्रजी मजकुराचा आशय देताना भाषांतर करून तो भाग देण्यात आला आहे. हे भाषांतर स्वत: संशोधकाने संदर्भ ग्रंथांच्या आधारे केलेले आहे. तो भाग कुठून घेतला आहे याचा संदर्भ शेवटी देण्यात आला आहे.

## १.२१ सारांश

संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. मानवी जीवनातील समस्या, कुतुहल, बौद्धिक आनंद इ. घटक हे संशोधनाला चालना देणारे ठरतात. संशोधनाचे अनेक प्रकार आहेत. उल्लेख विश्लेषण हा संशोधनाचा सांख्यिकीय प्रकार आहे. याद्वारे विशिष्ट विषयातील साहित्यनिर्मितीचा प्रवाह कळून येतो. त्यासाठी विशिष्ट निकष निश्चित केले जातात. तथ्य संकलन करून त्याचे विश्लेषण केले जाते. मिळालेल्या निष्कर्षावरून शिफारसी केल्या जातात. ग्रंथपाल, अभ्यासक, तसेच विशिष्ट हेतू बाळगून वाचन करणाऱ्या वाचकांसाठी असे संशोधन फारच उपयुक्त ठरते. प्रस्तुत संशोधनात भाषा या विषयांतर्गत इंग्रजी, हिंदी व मराठी या भाषांचे उल्लेख विश्लेषण करण्यात आले आहे.

## संदर्भ


01. आगलावे, प्रदीप (२०००), संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर : विद्या, पृ.५०४

02. आठल्ये, श्रीनिवास मेघ:श्याम (२०१५), संशोधनशास्त्र परिचय, पुणे : युनिव्हर्सल, पृ.९६

03. कऱ्हाडे, बी. एम. (२०११), शास्त्रीय संशोधन पद्धती, आ.३, नागपूर : पिंपळापुरे, पृ. ७००

04. कायंदे—पाटील, गंगाधर (२००९), संशोधन पद्धती, आ. ५, नाशिक : चेतन्य, पृ. ५१०

05. कुंभार, राजेंद्र (२०१३), ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन, पुणे : युनिव्हर्सल, पृ.२७२

06. कुलकर्णी, बी. डी. आणि ढमढेरे, एस. व्ही. (२००७), अर्थशास्त्रीय संशोधनपद्धती, पुणे : डायमंड, पृ. १४४

07. कोण्णूर, एम. बी., कोण्णूर, सुजाता आणि माणगांवकर, उष:प्रभा (संपा.) (२००८), ग्रंथालय व माहितीशास्त्रकोश, पुणे : डायमंड, पृ. ४१०

08. घाटोळे, रा. ना. (१९९०), समाजशास्त्रीय संशोधन — तत्त्वे व पद्धती, नागपूर : श्री मंगेश, पृ. २७६

09. घोरपडे, के. यू. आणि घोरपडे, कला (२००८), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, नागपूर : विद्या, पृ. ५३२

10. ताटके, नीलम (२००८), संशोधन करताना..., पुणे : डायमंड, पृ.८८

11. पाटील, बी. एन. (२००८), साहित्य संशोधन मार्गदर्शन, जळगांव : प्रशांत, पृ. १४४

12. बर्वे, बी. एन. (२०१०), मानसशास्त्रातील संशोधन पद्धती, नागपूर : विद्या, पृ.२२४

13. बेहेरे, सुमन (२०११), सामाजिक संशोधन पद्धती, नागपूर :विद्या, पृ. १५४

14. संत, दु. का. (२००७), संशोधन : पद्धती, प्रक्रिया, अंतरंग, आ. ३, पुणे : पुणे विद्यार्थी गृह, पृ. २४०

15. http://mu.ac/portal/about_us/ accessed on 22/7/2018

16. mu.ac.in/portal/language_linguistics_and_literature/ accessed on 3/9/2018

17. https://mr.m.wikipedia.org accessed on 22/7/2018

18. https://university.careers360.com/articles/mumbai-university-courses accessed on 30/10/2018

○○○

# प्रकरण दोन

# वाचनसाहित्याचा आढावा

# प्रकरण दोन
# वाचनसाहित्याचा आढावा

## २.१ प्रस्तावना

कोणत्याही विषयाच्या अभ्यासाला सुरवात करण्यापूर्वी त्या विषयावर पूर्वी काय अभ्यास झाला आहे, याचा मागोवा घेणे म्हणजे वाचनसाहित्याचा आढावा घेणे होय. वाचनसाहित्याचा आढावा घेताना संशोधकाला अभ्यास—विषयावरील विविध प्रकारचे प्रकाशित झालेले वाचनसाहित्य जमा करावे लागते. समस्या सूत्रण झाल्यावर या वाचनाला सुरवात होते. विशिष्ट हेतू मनाशी बाळगून हे वाचन करायचे असते. अर्थातच ते चोखंदळपणे विषयावर आधारित निवडायचे असते.

## २.२ वाचनसाहित्याच्या आढाव्याचे हेतू

संशोधनाच्या क्षेत्रात ज्या अभ्यासकांनी, लेखकांनी, शास्त्रज्ञांनी योगदान केले आहे त्याच्या संशोधनाचे संकलन म्हणजे संशोधन साहित्य आढावा होय. कोणतेही शास्त्रीय संशोधन हे संशोधन साहित्याच्या आढाव्यापासून सुरू होते. तार्किक आणि व्यवस्थितरीत्या पूर्वसंशोधनाच्या वाचनसाहित्याचा आढावा घेतल्यास त्या आधारे संशोधन प्रकल्प व्यवस्थितरीत्या पूर्ण करता येतो. संशोधन समस्येच्या संदर्भात अगोदरच्या संशोधकांनी काय केले आहे व संशोधकाने काय करायला पाहिजे, तसेच संशोधन प्रकल्पाची मांडणी, लिखाणाची शैली आणि नियोजन या बाबतचे ज्ञान प्राप्त करून घेणे हा वाचनसाहित्याच्या आढाव्याचा प्रमुख हेतू असतो. (बर्वे, २०१०)

कुंभार (२०१३) यांच्या मते, पूर्व—संग्रहित ज्ञानाचा संशोधनासाठी उपयोग होतो. प्रस्तुत संशोधन ही पूर्व—संशोधनापासून अलग ठेवता येणारी कृती नाही. ती एक संयुक्त कृती आहे. म्हणून पूर्व—संशोधन व प्रस्तुत

संशोधन यांचा एकत्रित विचार करावा लागतो. म्हणून पूर्व—संशोधनाच्या वाचनसाहित्याचा आढावा घेतला जातो.

या अभ्यासाचे Krishnaswami & Ranganatham (2005) यांनी पुढील प्रमाणे हेतू सांगितले आहेत.

(१) संशोधन पद्धती, संशोधन आराखडा, संकल्पना पडताळणीच्या पद्धती, विश्लेषणाची तंत्रे यांची ओळख व्हावी.

(२) इतर संशोधकांनी वापरलेले माहितीचे स्त्रोत लक्षात यावेत.

(३) इतरांनी त्यांच्या संशोधन अहवालाचे कसे आरेखन केले आहे, ते लक्षात यावे.

यावरून आपल्या लक्षात येते की वाचनसाहित्याच्या आढाव्याला संशोधनात फार महत्त्व आहे. त्यामुळे संशोधनाला एक बैठक प्राप्त होते. या शिवायही अशी अनेक कारणे आहेत की ज्यामुळे वाचनसाहित्याचा आढावा फार महत्त्वाचा ठरतो. ती कारणे अशी आहेत—

वाचनसाहित्याच्या आढाव्यामुळे —

(१) विशिष्ट विषयावर किती अभ्यास झाला आहे ते कळण्यास मदत होते.

(२) विशिष्ट विषयाच्या अभ्यासात किती काळापर्यंतचा विचार करण्यात आला आहे ते कळते.

(३) विशिष्ट विषयावरील किती पैलू अभ्यासले गेले आहेत ते कळते.

(४) विशिष्ट विषयाच्या कोणकोणत्या पैलूंची दखल घेणे राहून गेले आहे ते कळते.

(५) विशिष्ट विषयाचा अभ्यास कोणत्या पद्धतीने करण्यात आला आहे ते कळते.

(६) कोणत्या उद्दिष्टांसाठी विशिष्ट विषयाचा अभ्यास करण्यात आला आहे ते कळते.

## २.३ प्रस्तुत संशोधनासाठीचा वाचनसाहित्याचा आढावा

प्रस्तुत संशोधनासाठी खालीलप्रमाणे आढावा घेण्यात आला आहे.

### २.३.१ उल्लेख विश्लेषण

Ashraf & Jindal (2012) यांनी दिल्ली विद्यापीठातील संशोधन निर्मितीचे उल्लेख विश्लेषण केले आहे. त्यासाठी त्यांनी वेब ऑफ सायन्स या डेटाबेसमधून माहिती डाऊनलोड केली आहे. २००० ते २०१२ या कालावधीतील ८४७६ लेखांचा अभ्यास केला आहे. भौतिक शास्त्र हा सर्वाधिक (२१.८१%) अभ्यासला गेलेला विषय आहे. नियतकालिक लेख सर्वाधिक (८६.२७%) तर परिषद वृत्तांत (४.२८%), बैठक सार (३.३३%) हे प्रकार त्या खालोखाल असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

अंकीय उल्लेखांचा वापर लक्षणीय असला तरी अजून मुद्रित उल्लेखांचाच वापर जास्त प्रमाणात होत आहे, असे मत Bhat & Sampathkumar (2008) यांनी व्यक्त केले आहे. विद्वत् ई—नियतकालिकांतील वेब आधारित स्त्रोत यावर त्यांनी उल्लेख विश्लेषण केले आहे. त्यासाठी ग्रंथालय आणि माहिती शास्त्र या विषयातील १२७७ पैकी १०३५ लेखांचा त्यांनी उपयोग केला. हे प्रमाण ८१% इतके आहे. २००१ पासून अंकीय उल्लेखांचे प्रमाण हळूहळू वाढत आहे, असे त्यांनी मत मांडले आहे.

Chikate & Patil (2008) यांनी आपल्या नमुना अभ्यासात पुणे विद्यापीठात सादर झालेल्या ग्रंथालय आणि माहिती शास्त्र या विषयातील १९८२ ते २००५ या कालावधीतील प्रबधांचे उल्ेख विश्लेषण केले आहे. त्यांनी एकूण २७ प्रबधांतील ६२५७ उल्लेखांचा वापर केला आहे. त्यांना असे आढळून आले की अभ्यासक नियतकालिकांचा सर्वाधिक (४२.२%) वापर करतात. त्या

खालोखाल ग्रंथ (३१.२%) वेब माहिती (५.७%) व संदर्भ ग्रंथ (५.६%) यांचा क्रम लागतो. मुख्य नियतकालिक यादीत 'कॉलेज अॅण्ड रिसर्च लायब्ररीज' यांचा पहिला क्रमांक (५.३%) लागतो. तर त्या खालोखाल सायंटोमेट्रिक्स (४.९%) व जर्नल ऑफ अमेरिकन सोसायटी फॉर इन्फर्मेशन सायन्स (४.३%) यांचा क्रम लागतो. ब्रॅडफर्डचा नियम इथे लागू होतो, असे त्यांनी नमूद केले आहे. उल्लेखांचे भौगोलिक स्थान सर्वाधिक विदेशी (युएसए — ३७%) असून त्या खालोखाल भारतीय (भारत — २५%) आहे. एक—लेखक उल्लेखाचे प्रमाण सर्वाधिक (७२.४%) आहे. इंग्रजी भाषेतील उल्लेखांचे प्रमाण सर्वाधिक (९४.२%) असून त्या खालोखाल मराठी (४.५%) व फ्रेंच (०.५%) आहे. उल्लेखांचे विषयानुसार विखरण हे सर्वाधिक (७२. २%) ग्रंथालय आणि माहिती शास्त्र असून त्या खालोखाल विज्ञान (७.२%) व वैद्यक शास्त्र (२.८%) आहे. प्रकाशन उल्लेखांमध्ये व्यावसायिक प्रकाशने सर्वाधिक (३८.८%) असून त्या खालोखाल शैक्षणिक प्रकाशने (२८.४%) व संस्था प्रकाशने (२०.१७%) आहेत.

Dash & Parida (2013) यांनी वैद्यक शास्त्र या विषयातील नियतकालिकाचा माहितीचा विस्तार या दृष्टीने अभ्यास केला आहे. त्यासाटी इंडियन जर्नल ऑफ कॅन्सर व जर्नल ऑफ कम्युनिकेबल डिसिजेस या दोन सायन्स सायटेशन इंडेक्समध्ये नोंद नसलेल्या नियतकालिकांचा त्यांनी अभ्यास केला आहे. त्यांच्या मतानुसार नियतकालिके ही संशोधन कार्यास चांगलाच हातभार लावतात. अभ्यासविषय असलेल्या दोन्ही नियतकालिकांतून माहितीचा विस्तार समाधानकारक असल्याचा निष्कर्ष त्यांनी नमूद केला आहे.

Deshmukh (1998) यांनी पंजाबराव कृषी विद्यापीठ, अमरावती येथे १९९० ते १९९४ या कालावधीत सादर झालेल्या पीएच डी प्रबंधांचा अभ्यास केला

आहे. एकूण ८९ पीएच डी प्रबंधांतील ११६९८ उल्लेख त्यांना अभ्यासासाठी उपलब्ध झाले. साहित्य उपार्जन धोरणासाठी उल्लेख विश्लेषणाची मदत होते, असे त्यांनी नमूद केले आहे. उल्लेखित प्रलेखांची या विद्यापीठात चांगली उपलब्धता आहे व ब्रॅडफर्डच्या नियमाचे चांगले पालन होते, असे त्यांनी मत मांडले आहे.

ॲनल्स ऑफ लायब्ररी ॲण्ड इन्फर्मेशन स्टडीज या नियतकालिकाचे १९९७ ते २०१० या कालावधीतील उल्लेखांचे Deshmukh (2011) यांनी उल्लेख विश्लेषण केले आहे. त्यासाठी त्यांना १४ खंडांतील ५६ अंक प्राप्त झाले. त्यातील ३२६ लेखांतील ४१४१ उल्लेखांचा त्यांनी अभ्यास केला. त्यांना असे आढळले की नियतकालिकांचा उल्लेख सर्वाधिक (५४.५२%) असून त्या खालोखाल ग्रंथ (१७.५३%), ई–सायटेशन्स (१२.०५%) व परिषद वृत्तांत (६.८१%) असा क्रम लागतो. मुख्य नियतकालिक यादीमध्ये ॲनल्स ऑफ लायब्ररी ॲण्ड इन्फर्मेशन स्टडीज याचा प्रथम क्रमांक (११.१२%) तर सायंटोमेट्रिक्स (८.४१%), जर्नल ऑफ अमेरिकन सोसायटी ऑफ इन्फर्मेशन सायन्स (३.८५%) व इयास्लिक बुलेटिन (३.५९%) यांचा त्या खालोखाल क्रम लागतो. एक–लेखक उल्लेख सर्वाधिक (५२.७०%) आहेत.

संशोधनात्मक लेखनासाठी नियतकालिक हे महत्त्वाचे माहिती साधन आहे; त्यासाठी त्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे, हे जाणून Garg & Kumar (2010) यांनी सायन्स सायटेशन इंडेक्स एक्सपांडेड या मधील विज्ञान या विषयातील नियतकालिकांचा उल्लेख विश्लेषण प्रकाराचा अभ्यास केला आहे. त्यासाठी त्यांनी २००६ ते २००९ या कालावधीतील ४६ नियतकालिकांतील ५३१७ लेखांचा उपयोग केला आहे. त्यापैकी ३९४३ (७४%) लेख हे भारतीय; ११८३ (२२%) लेख हे विदेशी व १९१ (४%) लेख हे भारतीय–विदेशी अशा एकत्रित लेखकांचे होते. वैद्यक शास्त्रातील लेखांचा

सर्वाधिक (७२%) उल्लेख करण्यात आला होता. त्या खालोखाल बायोलॉजी, बायोकेमिस्ट्री व बायोफिजिक्स (२१%) व पर्यावरण शास्त्र (७%) यांनी स्थान पटकावले होते.

नियतकालिकांचा संशोधनात सर्वाधिक (७८.८३%) वापर होतो. ग्रंथांचा त्या खालोखाल (१५.५७%) क्रम लागतो, असे निरिक्षण Gohain & Saikia (2014) यांनी नोंदले आहे. तेजपूर विद्यापीठ, आसाम येथे रसायन शास्त्र विषयात २००८ ते २०१२ या कालावधीत सादर झालेल्या पीएच डी प्रब्रंधांचे त्यांनी उल्लेख विश्लेषण केले आहे. त्यासाठी त्यांनी ३० पीएच डी प्रबंधांतील १०९८३ उल्लेखांचा अभ्यास केला. तीनपेक्षा अधिक लेखकांचा सर्वाधिक (३९.८९%) उल्लेख झाल्याचे त्यांना आढळून आले. जर्नल ऑफ अमेरिकन केमिकल सोसायटी हे मुख्य नियतकालिक यादीतील सर्वाधिक (७.१३%) उल्लेख असलेले प्रथम क्रमांकाचे नियतकालिक आहे, असे त्यांनी नमूद केले आहे.

Gupta & Khare (2013) यांनी बुंदेलखंड विद्यापीठ, झाशी व डॉ. हरिसिंग गौर विद्यापीठ, सागर या दोन विद्यापीठांत ग्रंथालय आणि माहिती शास्त्र या विषयात सादर झालेल्या पीएच डी प्रबंधांचा अभ्यास केला. त्यासाठी त्यांना अनुक्रमे ३५ प्रबंध (६१९८ उल्लेख) व २८ प्रबंध (७२८४ उल्लेख) उपलब्ध झाले. त्यांच्या निरीक्षणानुसार बुंदेलखंड विद्यापीठातील प्रबंधांतील उल्लेखांचे प्रमाण प्रति प्रबंध १७७, तर डॉ. हरिसिंग गौर विद्यापीठातील प्रमाण २६० होते. सर्वाधिक प्रलेख वापराचे प्रमाण बुंदेलखंड विद्यापीठात ग्रंथ (४४.७%) होते, तर डॉ. हरिसिंग गौर विद्यापीठात नियतकालिक (४०.५०%) होते. सर्वाधिक उल्लेख वापराचे भौगोलिक स्थान दोन्ही विद्यापीठात अनुक्रमे युएसए (४३.४०%) व युएसए (४४.७०%) इतके होते. आय एल ए बुलेटिन हे

दोन्ही विद्यापीठात मुख्य नियतकालिक यादीतील सर्वाधिक वापराचे नियतकालिक असल्याचे त्यांना आढळून आले.

Haque (2012) यांनी द जर्नल ऑफ पोल्ट्री सायन्स या नियतकालिकाचे २००१ ते २०१० या कालावधीतील ४२५ लेखांतील १३०१२ उल्लेखांचे उल्लेख विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते प्रस्तुत अभ्यासविषयात तीन—लेखक प्रकाराचा सर्वाधिक (२३.५३%) उल्लेख झाला असून त्या खालोखाल चार—लेखक (१९.७%) व पाचपेक्षा अधिक लेखक (१९.०६%) यांचा क्रम लागतो. नियतकालिक उल्लेख हे सर्वाधिक (८४.३२%) असून ग्रंथ (८.०६%) व परिषद वृत्तांत (२.६१%) यांचा क्रम त्या नंतर येतो. स्व—लेखक उल्लेखांची संख्या ८०९ (६.२१%) इतकी दिसून आली. याचे एकूण उल्लेखांशी गुणोत्तर १ : १६ इतके आहे.

अभ्यासक करीत असलेल्या उल्लेख नोंदींतील अचूकता किती आहे, याचा अभ्यास Harinarayana, Chikkamanju & Vasantha (2011) यांनी केला आहे. त्यासाठी त्यांनी म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर येथील मानसशास्त्र विषयात सादर झालेल्या ५ पीएच डी प्रबंधांतील ९२३ उल्लेखांचा उपयोग केला आहे. त्यात त्यांना जास्तीत जास्त (७७%) उल्लेखांमध्ये नोंदीतील चुका आढळल्या. या चुका साधारणपणे, लेखकाच्या नावातील शब्द चुकीचे लिहिणे (२१.७७%), खंड क्रमांक भलताच लिहिणे (५.७६%), अंक क्रमांक चुकणे (१.१५%), वर्ष भलतेच लिहिणे (३७.६६%), पृष्ठ क्रमांक चुकणे (६२. ३३%) अशा स्वरूपाच्या होत्या. उल्लेख करण्याच्या तंत्राबाबतचे अज्ञान आणि संदर्भसूची तयार करण्यातील बेफिकीरी या गोष्टी अशा चुकाना जन्म देण्यास कारणीभूत आहेत, असे मत त्यांनी मांडले आहे. अभ्यासकांना उल्लेख करण्याबाबतचे तांत्रिक ज्ञान देणे, तसेच योग्य उल्लेख पद्धतीचा अवलंब करण्यास भाग पाडणे, हे उपाय त्यांनी सुचवले आहेत. अमेरिकन

सायकॉलॉजीकल असोसिएशनने प्रसिद्ध केलेली शैली पुस्तिकेची ६वी आवृत्ती या दृष्टीने अभ्यासनीय आहे, असे त्यांनी मत मांडले आहे. चुकीचे उल्लेख चुकीची माहिती पुरवतात व दिशाभूल करतात. म्हणून उल्लेख नोंदींत अचूकता असावी, असे त्यांचे म्हणणे आहे.

Jan (2009) यांनी लायब्ररी ट्रेण्ड या नियतकालिकातील लेखांचे उल्लेख विश्लेषण केले आहे. १९९४ ते २००७ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या ५९३ लेखांतील १५६६२ उल्लेखांचा त्यांनी वापर केला. मुद्रित उल्लेखांचे प्रमाण सर्वाधिक (८८%) असून अंकीय उल्लेखांचे प्रमाण त्या खालोखाल (१२%) आहे. स्त्री—लेखकांचे प्रमाण जास्त (५२.३४%) असून पुरुष—लेखकाचे प्रमाण कमी (४७.६६%) असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

Jayprakash & Kannappanavar (2015) यांनी गोवा विद्यापीठ, गोवा येथे कॉमर्स विषयात १९९८ ते २०१२ या कालावधीत सादर झालेल्या पीएच डी प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण केले आहे. एकूण १९ पीएच डी प्रबंधांतील २४३१ उल्लेख त्यांनी अभ्यासले. एक—लेखक प्रकारातील उल्लेख सर्वाधिक (४२.२८%) असल्याचे त्यांना आढळून आले. नियतकालिकांतील उल्लेखांचा सर्वाधिक (६१.९०%) वापर झाला असून त्या खालोखाल ग्रंथ (२०.१५%) व अहवाल (४.७३%) यांचा क्रम लागतो. पी—सायटेशनचे प्रमाण जास्त आहे. तरी ई—सायटेशनचा वापरही लक्षणीय आहे. तसेच ब्रॅडफर्डचा नियम लागू होतो, असे त्यांनी नमूद केले आहे.

Kalbande & Sonawane (2012) यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, औरंगाबाद येथे अर्थशास्त्र विषयात २००० ते २०१० या कालावधीत सादर केलेल्या ३४ प्रबंधांतील २८७६ उल्लेखांचे उल्लेख विश्लेषण केले आहे. त्यांच्या निरीक्षणानुसार, त्यात ग्रंथ या प्रलेख प्रकाराचा

सर्वाधिक (५७.८६%) वापर झाला असून त्या खालोखाल अहवाल (१९.१९%) व नियतकालिके (१३.७०%) यांचा क्रम लागतो. एक–लेखक प्रकाराचे सर्वाधिक (७२.८१%) उल्लेख आहेत. मुख्य नियतकालिक यादीतील प्रथम क्रमांकाचे नियतकालिक महाराष्ट्र सिंचन विकास (१०.१५%) हे असून त्या खालोखाल अर्थबोध (६.३५%) व शेतकरी (३.०५%) यांना स्थान मिळाले आहे. भाषा प्रकारात इंग्रजी भाषेला प्रथम स्थान (५२.३३%) मिळाले असून त्या नंतर मराठी (४५.७६%) व हिंदी (१.९१%) यांचा क्रम लागतो. सर्वाधिक उल्लेख (६८.७५%) हे भारतीय आहेत. मुद्रित उल्लेखांचा वापर सर्वाधिक (९९.१०%) असून अंकीय उल्लेखांचा वापर अगदीच नगण्य (०.१०%) आहे.

श्री व्यंकटेश्वर विद्यापीठ, तिरुपती येथील ग्रंथालय आणि माहिती शास्त्र या विषयात निष्णात पदवीच्या विद्यार्थ्यांच्या प्रबंधिकांचे उल्लेख विश्लेषण Kumar & Reddy (2013) यांनी केले आहे. त्यासाठी त्यांनी २००० ते २००७ हा कालावधी निवडला आहे. एकूण ९१ एम लिब अँण्ड आय सी–प्रबंधिकांतील ९९१ उल्लेखांचा त्यांनी अभ्यास केला आहे. त्याना असे आढळून आले की विद्यार्थ्यांनी नियतकालिकांचा वापर सर्वाधिक (४०.०६%) केला आहे. साधारणत: लायब्ररी सायन्स या क्षेत्रातील उल्लेख सर्वाधिक (३२.१९%) आहेत. एक–लेखक प्रकारचे उल्लेख सर्वाधिक (८०.३२%) आहेत. इंग्रजी भाषा सर्वाधिक (९९.३९%) वापरली आहे. भारतीय उल्लेख हे सर्वाधिक (३३.६०%)आहेत. मुख्य नियतकालिक यादीमध्ये अ‍ॅनल्स ऑफ लायब्ररी सायन्स अ‍ॅण्ड डॉक्युमेटेशन या नियतकालिकाचे नाव प्रथम क्रमांकावर (११.५९%) असून हेरॉल्ड ऑफ लायब्ररी सायन्स व इयास्लिक बुलेटिन अनुक्रमे दुसऱ्या (८.५६%) व तिसऱ्या (७.८१%) क्रमांकावर आहेत.

Lokhanda (2007) यांनी पुणे विद्यापीठ, पुणे येथे ग्रंथालय व माहिती शास्त्र विषयात सादर केलेल्या पीएच डी प्रबंधांचा अभ्यास केला आहे. एकूण २० प्रबंधांतील ५२५२ उल्लेख त्यांना उपलब्ध झाले. त्यांना असे आढळून आले की सायंटोमेट्रिक्स हे सर्वाधिक (४.१३%) वापरले जाणारे नियतकालिक आहे. नियतकालिक हा प्रलेख—प्रकार अभ्यासकांकडून सर्वाधिक (४५.१६%) वापरला जाणारा प्रकार असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

Madasamy & Alwarammal (2009) यांनी ग्रंथालय आणि माहिती शास्त्र या विषयातील संशोधनाच्या प्रगतीचा आढावा घेतला आहे. तसेच संशोधनाचा कल काय आहे याचा त्यांनी आढावा घेतला आहे. त्यासाठी त्यांनी २००३ ते २००८ या कालावधीत ग्रंथालय आणि माहिती शास्त्र या विषयात वेगवेगळ्या विद्यापीठांनी दिलेल्या पीएच डी पदवीचा युनिव्हर्सिटी न्यूज या नियतकालिकेच्या आधारे विचार केलेला आहे. एकूण १७१ पीएच डी प्रबंध त्यांना अभ्यासासाठी उपलब्ध झाले. त्यांच्या निरीक्षणानुसार सर्वाधिक (२५. २०%) प्रबंध २००६ मध्ये सादर केले गेले. आंध्र प्रदेशाने सर्वाधिक (१५. ९०%) प्रबंधांना मान्यता दिली. त्या खालोखाल कर्नाटकचा (१४.१०%) क्रमांक लागतो. माहिती स्त्रोत आणि सेवा या उपविषयात सर्वाधिक (१६. ९०%) प्रबंध असून त्या खालोखाल उपभोक्ता अभ्यास (१४.६०%), ग्रंथालय आणि माहिती व्यवस्थापन (१४.%) यांचा क्रम लागतो.

उल्लेख विश्लेषण हे ग्रंथ उपार्जन धोरण ठरवण्यासाठी अत्यंत उपयुक्त असते असे मत Olatokun & Makinde (2009) यांनी मांडले आहे. इबादन विद्यापीठ, नायजेरिया येथील प्राणी शास्त्र विषयात २००० ते २००७ या कालावधीत सादर केलेल्या निष्णात पदवी प्रबंधिकांचे उल्लेख विश्लेषण करून त्यांनी हे मत मांडले आहे. त्यासाठी त्यांनी १२६ निष्णात पदवी प्रबंधिकांतील १२३७४ उल्लेखांचा अभ्यास केला. अभ्यासावरून त्यांच्या असे लक्षात आले

की नियतकालिक उल्लेखांचे प्रमाण सर्वाधिक (५५%) असून त्या नंतर ग्रंथ (२२%), परिषद वृत्तांत (८% ) यांचा क्रम लागतो. मुख्य नियतकालिक यादीत प्रथम क्रमांक पोल्ट्री सायन्स (८%) तर ॲनिमल फीड सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी (६%) व जर्नल ऑफ न्यूट्रिशन (४%) यांचा त्या नंतर क्रमांक लागतो.

पश्चिम भारतातील विद्यापीठांमध्ये ग्रंथालय आणि माहिती शास्त्र या विषयात सादर केलेल्या पीएच डी प्रबंधांचे Phugnar (2012) यांनी उल्लेख विश्लेषण केले आहे. एकूण १२४ पीएच डी प्रबंधांतील १६३१३ उल्लेख त्यांनी अभ्यासले. त्यात महाराष्ट्रातील पीएच डी प्रबंध संख्या सर्वाधिक (८९.४७%) तर त्या खालोखाल गुजरात (१०.५३%) व गोवा (०%) या राज्यांची होती. त्यातील शैक्षणिक ग्रंथालये हा उपविषय सर्वाधिक (२५.६६%) तर संदर्भ व माहिती सेवा (९.२१%) व विशेष ग्रंथालये (८.५५%) त्या खालोखाल वापरलेले होते. उल्लेख विश्लेषणाच्या अभ्यासाचे प्रमाण किरकोळ (५.९२%) होते.

ग्रंथालय आणि माहिती शास्त्र या विषयाच्या अभ्यासात परिषद वृत्तांत हा माहितीचा महत्त्वाचा स्त्रोत आहे, असे मत Rajgoli (2011) यांनी मांडले आहे. त्यासाठी त्यांनी भारतातील चार मुख्य नियतकालिकांतील १०१२ लेखांतील १२५३६ उल्लेखांचा अभ्यास केला. त्यांत त्यांना ९९९ उल्लेख हे परिषद वृत्तांताचे आढळले. हे प्रमाण ०.९९% प्रति प्रलेख इतके आहे. सर्वाधिक उल्लेख (३३.४६%) हे जर्नल ऑफ इन्फर्मेशन मॅनेजमेंट या नियतकालिकात दिसून आले. त्या खालोखाल डेसिडॉक जर्नल ऑफ लायब्ररी ॲण्ड इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (२५.९६) आणि इन्फर्मेशन स्टडीज (१०.६४%) यांचा क्रमांक लागतो.

Ramesh & Nagaraju (2000) यांनी द इंडियन जर्नल ऑफ इन्फर्मेशन, लायब्ररी ॲण्ड सोसायटी या नियतकालिकाचे उल्लेख विश्लेषण केले आहे. त्यासाठी त्यांनी ८ ते १२ या ५ खंडांतील १३८ लेखांतील ९०१ उल्लेखांचा अभ्यास केला आहे. त्यांना असे आढळले की १३८ प्रलेखांमध्ये ९०१ उल्लेख म्हणजे प्रति प्रलेख ७ उल्लेख केले गेले आहेत. ग्रंथांचा वापर सर्वाधिक (४७.५०%) झाला असून त्या खालोखाल नियतकालिकांचा (४१.०७%) क्रमांक लागतो. सर्वाधिक उल्लेख (६०%) हे भारतातील असून उर्वरित (४०%) हे पाश्चात्य देशांतील आहेत. सर्वाधिक (१००%) वापरलेली भाषा इंग्रजी आहे. १४% लेखकांनी स्व–उल्लेख केला आहे. मुख्य नियतकालिकांच्या यादीत इंटरनॅशनल लायब्ररी रिव्ह्यू, लायब्ररी ट्रेण्डस्, लायब्ररी हेरॉल्ड ही नियतकालिके अग्रस्थानी आहेत.

Sahu, Goswami & Choudhary (2011) यांनी २००१ ते २०१० या कालावधीतील नॅशनल मेटालार्जिकल लॅबोरेटरीमधील संशोधन प्रकाशनांचा अभ्यास केला आहे. त्यासाठी वेब ऑफ सायन्सच्या प्लॅटफॉर्मवर उपलब्ध झालेल्या सायन्स सायटेशन इंडेक्सचा त्यांनी उपयोग केला आहे. त्यांच्या असे लक्षात आले की एनएमएल ने प्रस्तुत कालावधीत ८८१ संशोधन प्रलेख प्रकाशित केले आहेत. त्यात ४४३१ उल्लेखांची नोंद आहे. सर्वाधिक अभ्यासक (९६.४८%) एकत्रित प्रलेख निर्मितीवर भर देतात. विदेशी लेखकांचे सर्वाधिक (७२.९५%) उल्लेख आहेत. तसेच संशोधक भारतापेक्षा विदेशी नियतकालिकांतून आपले लेखन प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न करतात.

उल्लेख विश्लेषणाद्वारे Singh & Bebi (2013) यांनी दिल्ली विद्यापीठातील समाज शास्त्र विषयात सादर केलेल्या १९९५ ते २०१० या कालावधीतील पीएच डी प्रबंधांचा अभ्यास केला आहे. त्यासाठी त्यांनी २५ पीएच डी प्रबंधांतील ५७६६ उल्लेखांचा वापर केला आहे. सर्वाधिक (८३.९४%)

उल्लेख हे एक–लेखक प्रकारचे आहेत. ग्रंथ हा प्रलेख प्रकार सर्वाधिक (६७.२३%) वापरला गेला आहे. नियतकालिक वापरामध्ये भारतीय नियतकालिकांचा वापर सर्वाधिक (४५.५२%) झाला आहे. इकॉनॉमिक ॲण्ड पॉलिटिकल विकली हे मुख्य नियतकालिक यादीतील सर्वाधिक (१०.७०%) उल्लेख झालेले नियतकालिक आहे.

ब्रॅडफर्डच्या नियमाच्या उपयोजनाचा अभ्यास Singh & Bebi (2014) यांनी केला आहे. त्यासाठी त्यांनी दिल्ली विद्यापीठातील सामाजिक शास्त्र विषयात सादर केलेल्या पीएच डी प्रबंधांची निवड केली. एकूण २६० पीएच डी प्रबंध व त्यातील ५२३७८ उल्लेख त्यांना अभ्यासासाठी उपलब्ध झाले. त्यांच्या निरीक्षणानुसार, ग्रंथांचे उल्लेख हे सर्वाधिक (५५.७०%) असून त्या खालोखाल नियतकालिकांचे (१९%) स्थान आहे. इकॉनॉमिक ॲण्ड पॉलिटिकल विकली हे भारतीय नियतकालिक सर्वाधिक (२२.७०%) उल्लेखांचे मुख्य नियतकालिक आहे. निवडलेल्या नियतकालिकांमध्ये ब्रॅडफर्डच्या नियमाचे उपयोजन होते, असा निष्कर्ष त्यांनी मांडला आहे.

पीएच डी प्रबंधांतील वाचनसाहित्याच्या पूर्वाभ्यासात अभ्यासक कसे उल्लेख करतात, याचा इंग्रजी व स्पनिश भाषेतील प्रबंधांद्वारे Soler-Monreal & Gil-Salom (2011) यांनी अभ्यासले आहे. इंग्रजी प्रबंधांत त्यांना असे आढळले की लेखकाच्या मूळ शब्दांमध्ये बदल करून उल्लेख केले जातात. तर स्पॅनिश लेखक हे लेखकाचे मूळ उल्लेख जसेच्या तसे उद्धृत करतात. त्यांनी यात इंग्रजी व स्पॅनिश भाषेतील प्रबंधांची उल्लेख करण्याच्या पद्धतीवरून तुलना केली आहे.

Sudhier (2007) यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळूर या संस्थेकडे १९९९ ते २००३ या कालावधीत सादर झालेल्या भौतिक शास्त्र या

विषयातील पीएच डी प्रबंधांतील नियतकालिकांच्या उल्लेखांचा अभ्यास केला आहे. त्यासाठी त्यांना ७१ पीएच डी प्रबंधांतील ६९० नियतकालिकांतील ११४१२ उल्लेख अभ्यासासाठी उपलब्ध झाले. त्यासाठी त्यांना उल्रिच पिरिऑडिकल डिरेक्टरी व जर्नल सायटेशन रिपोर्ट – सायन्स यांचा उपयोग झाला. यात नियतकालिकांच्या उल्लेखांचा सर्वाधिक (८४.६७%) वापर झालेला त्यांना आढळला. फिजिक्स रेव्ह्यू – बी हे अमेरिकेहून प्रसिद्ध होणारे सर्वाधिक (९.५३%) उल्लेख असणारे नियतकालिक आहे. भारतातील नियतकालिकांत प्रेरणा – जर्नल ऑफ फिजिक्स हे सर्वाधिक (३७.०४%) उल्लेख झालेले नियतकालिक आहे. इंग्रजी ही सर्वाधिक (७२.१७%) वापरली जाणारी भाषा आहे.

Thoidingjam (1994) यांनी गौहाती विद्यापीठातील सामाजिक शास्त्र विषयात १९७० ते १९८० या कालावधीत सादर झालेल्या पीएच डी प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण केले आहे. त्यासाठी त्यांनी एकूण १३६८२ उल्लेखांचा अभ्यास केला. त्यांना असे आढळून आले की उल्लेख करण्यात सर्व अभ्यासकांमध्ये अचूकता व एकवाक्यता नाही. ग्रंथ प्रकारातील उल्लेखांचे प्रमाण सर्वाधिक (६४.९५%) असून त्या खालोखाल नियतकालिकांचे (१५.४२%) प्रमाण आहे. इंग्रजी भाषेचा सर्वाधिक (९६.७८%) वापर झाला असून भौगोलिक स्थानामध्ये भारतातली उल्लेखांचे प्रमाण सर्वाधिक (७६.६०%) आहे. सर्व उपविषयाच्या नियतकालिकांचा ब्रॅडफर्डचा नियम लागू होतो, अपवाद फक्त अॅन्थ्रॉपोलॉजी, असे त्यांनी नमूद केले आहे.

Wilson (2012) यांनी पदवीचा अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रबंधिकांचे उल्लेख विश्लेषण केले आहे. त्यासाठी त्यांनी साऊथ अॅलाबमा विद्यापीठातील ग्रंथालयात २००२ ते २००९ या कालावधीत सादर झालेल्या ८८ प्रबंधिकांतील २३०१ उल्लेखांचा वापर केला आहे. त्यांच्या असे

निरिक्षणास आले की विद्यार्थ्यांनी नियतकालिकांचा वापर सर्वाधिक (४५.०७%) केला असून त्या खालोखाल ग्रंथ (२८.८१%), वृत्तपत्रे (१२.४७%) व सर्वसाधारण मासिके (३.३५%) यांचा क्रम लागतो.

बहु—लेखक असलेल्या साहित्याची निर्मिती ही एक—लेखक असलेल्या साहित्याच्या निर्मितीपेक्षा जास्त असते, असे निरीक्षण Zafrunnisha & Pullareddy (2009) यांनी नोंदवले आहे. लेखक प्रकार आणि एकत्रित लेखनाची पातळी यांचा त्यांनी अभ्यास केला आहे. त्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या तीन विद्यापीठांतील १९६३ ते २००३ या कालावधीतील मानसशास्त्र या विषयात सादर झालेल्या १४१ पीएच डी प्रबंधांतील २२५६५ उल्लेखांचा आधार घेतला आहे. त्यातील फक्त १४३७४ इतक्या नियतकालिक उल्लेखांचीत्यांनी अभ्यासविषय म्हणून निवड केली आहे. बहु—लेखक उल्लेख हा सर्वाधिक (५२.८७%) असून एक—लेखक उल्लेख हा त्या खालोखाल (४८.१३%) इतका आहे. बहु—लेखक प्रकारातील लेखन वाढत आहे. विदेशी उल्लेख जास्त (युएसए — ४२.२८%) आहे. इंग्रजी भाषेचा वापर सर्वाधिक (९४.५४%) आढळतो.

Zaveri (2013) यांनी उल्लेख प्रकाराचा अभ्यास केला आहे. त्यासाठी त्यांनी एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई येथील ग्रंथालय आणि माहिती शास्त्र विषयात सादर केलेल्या ९ पीएच डी प्रबंधांतील १७८९ उल्लेखांचा अभ्यास केला. त्यांना असे आढळून आले की अभ्यासकांनी १७ प्रकारचे प्रलेख वापरले आहेत. त्यात नियतकालिक सर्वाधिक (३६.६१%) वापरले असून त्या नंतर ई—स्त्रोत (३०.४०%) व ग्रंथ (२३.९७%) यांचा क्रम लागतो. भौगोलिक स्थानानुसार विदेशी उल्लेख सर्वाधिक (७१%) व त्या खालोखाल भारतातील (१८%) व विना—स्थान उल्लेख (११%) आढळले.

एक–लेखक प्रकार सर्वाधिक (५९%) वापरलेला प्रकार असून त्या खालोखाल विना–लेखक नाम (१०.५०%) प्रकार आढळून आला. ग्रंथालय आणि माहिती शास्त्र (७३.७२%) या विषयाच्या खालोखाल व्यवस्थापन (७.८८%), शिक्षण (५.३१%), विज्ञान (४.७५%), संगणक शास्त्र (४.३५%) अशा इतर विषयातील उल्लेखही अभ्यासकांनी वापरले असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

### २.३.२ बिब्लिओमेट्रिक्स अभ्यास

Bajad & Deshmukh (2014) यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे १९९३–९४ ते २००९–१० या कालावधीत सिव्हिल इंजिनियरींग या विषयात सादर केलेल्या पीएच डी प्रबंधांचा बिब्लिओमेट्रिक्स अभ्यास केला आहे. त्यासाठी त्यांना ९ पीएच डी प्रबंधांतील ६२४ उल्लेख उपलब्ध झाले. नियतकालिक हा सर्वाधिक (५४.०१%) वापराचा प्रलेख प्रकार त्यांना आढळला असून ग्रंथ (२१.९६%), परिषद वृत्तांत (८.६५%) यांचा क्रम त्या खालोखाल लागतो. एक–लेखक प्रकाराचा सर्वाधिक (५४.७४%) वापर झाला आहे. तसेच ब्रॅडफर्डचा नियम लागू होतो, असे त्यांनी नमूद केले आहे.

Choudhary & Sinha (2010) यांनी बिहार विद्यापीठ, मुजफ्फरनगर आणि टी. एम. भागलपूर विद्यापीठ, भागलपूर येथे प्रसिद्ध झालेल्या व सायन्स सायटेशन इंडेक्सवर उपलब्ध असलेल्या १९९८ ते २००९ या कालावधीतील लेखांचा बिब्लिओमेट्रिक्स अभ्यास केला आहे. त्यांच्या असे लक्षात आले की साहित्य निर्मितीच्या वाढीचा वेग भागलपूर विद्यापीठात सर्वाधिक (४३%) असून बिहार विद्यापीठात (२६%) त्या खालोखाल आहे. त्यांच्या मते, साहित्य निर्मितीचा कल आणि वाढ योग्य आणि नैसर्गिक आहे.

इंदिरा गांधी कृषी विद्यापीठ, छत्तीसगड येथील १९७१ ते २०१० या कालावधीत निष्णात पदवीसाठी विद्यार्थ्यांकडून सादर झालेल्या प्रबंधिकांचा बिब्लिओमेट्रिक्स अभ्यास Garg & Saini (2015) यांनी केला आहे. त्यांना एकूण १७६३ प्रबंधिका अभ्यासासाठी उपलब्ध झाल्या. त्यात पुरुष—लेखकांचे प्रमाण सर्वाधिक (८४.६२%) असून स्त्री—लेखकांचे त्या खालोखाल (१५.३८%) इतके होते. ॲग्रोनॉमी विषयात सर्वाधिक (१४.९७%) प्रबंधिका असून प्लाण्ट ब्रीडींग व जेनेटिक्स (१०.३८%) व एन्झायमोलॉजी या विषयांचा क्रम त्या नंतर निदर्शनास आला.

Kumbar, Gupta & Dhawan (2008) यांनी म्हैसूर विद्यापीठातील १९९६ ते २००६ या कालावधीतील विज्ञान व तंत्रज्ञान या विषयातील साहित्य निर्मितीची वाढ व प्रभाव यांचा बिब्लिओमेट्रिक्स अभ्यास केला आहे. स्कोपस या आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय डेटाबेसमधून त्यांनी माहिती मिळवली आहे. त्यातून त्यांना १५१८ लेख अभ्यासासाठी उपलब्ध झाले. त्यात त्यांना साहित्य निर्मितीच्या वाढीचे प्रमाण २३.९४% इतके आढळून आले. आंतरराष्ट्रीय लेखकांबरोबरचे सहलेखनाचे प्रमाण एकूण लेखांपैकी १४% इतके दिसून आले. त्यात सर्वाधिक (५४.१४%) युएसए बरोबर तर त्या खालोखाल जर्मनी (२३.७४%) व जपान (१०.०४%) यांच्याबरोबर असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

Mishra, Gawade & Solanki (2014) यांनी विक्रम विद्यापीठ, उज्जैन येथील १९७५ ते २००७ या कालावधीतील इंग्रजी विषयात सादर केलेल्या प्रबंधांचा बिब्लिओमेट्रिक्स अभ्यास केला आहे. त्यासाठी त्यांना ५६ प्रबंध उपलब्ध झाले. साहित्य निर्मितीचे स्त्री—पुरुष लेखक प्रमाण अभ्यासले असता त्यांच्या असे लक्षात आले की पुरुष—लेखकाचे प्रमाण हे सर्वाधिक (५५%) असून स्त्री—लेखकाचे प्रमाण (४५%) आहे. प्रति—प्रलेख उल्लेखांचे प्रमाण

९८.१६% आहे. तसेच एक—लेखक वापराचे प्रमाण सर्वाधिक (८३.७०%) असून त्या खालोखाल दोन—लेखक (१३.९३%) वापराचे प्रमाण आहे. ग्रंथ वापराचे प्रमाण सर्वाधिक (८०.४७%) आहे. उल्लेखांतील अचूकता बहुतांश लेखकांनी पाळलेली नाही, असे त्यांनी निरिक्षण नोंदवले आहे.

ग्रंथालय आणि माहिती शास्त्र या विषयात संशोधनात्मक लिखाण करणाऱ्या लेखकांचा कल जाणून घेण्याचा प्रयत्न Parameshwar, Goutami & Patil (2016) यांनी केला आहे. त्यासाठी त्यांनी लायब्ररी हेरॉल्ड या नियतकालिकातील २००६ ते २०१५ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या १० खंड व ३८ अंकांतील २२४ लेखांचा वापर केला आहे. एक—लेखक प्रकारातील वापर हा सर्वाधिक (४३.३०%) असून त्या खालोखाल दोन—लेखक प्रकाराचा (४०.६३%) क्रम लागतो. दिल्ली विद्यापीठातील प्रकाशनांचा प्रथम क्रमांक (८.४८%) लागतो, असेही त्यांनी नमूद केले आहे.

एक—लेखक हा लेखनाचा/ प्रकाशनाचा प्रकार सर्वाधिक (४८.७२%) आढळतो, असे मत Singh & Bebi (2014) यांनी मांडले आहे. त्यांनी लायब्ररी हेरॉल्ड या नियतकालिकातील २००३ ते २०१२ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखांचा बिब्लिओमेट्रिक्स अभ्यास केला आहे. त्यांना त्यात शैक्षणिक ग्रंथालये व आयसीटी या दोन उपविषयांत सर्वाधिक (१८.३०%) लेख आढळले. त्या खालोखाल माहिती साक्षरता (१३.७०%) व उपभोक्ता अभ्यास (९.८०%) यांचा क्रम लागतो.

Singh & Chander (2016) यांनी आपल्या बिब्लिओमेट्रिक्स अभ्यासामध्ये इंडियन जर्नल ऑफ ट्रॅडिशनल नॉलेज या नियतकालिकातील २००९ ते २०१४ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या ६७१ लेखांचा वापर केला आहे. ६

खंड आणि २४ अंक त्यासाठी त्यांना उपलब्ध झाले. बहु–लेखक प्रकाराचा सर्वाधिक (४४%) वापर झालेला त्यांना आढळून आला. एक–लेखक वापराचे प्रमाण सर्वात कमी (८%) होते. सर्वाधिक लेख (८४.०५%) भारतातील असून उर्वरित (१५.९५%) लेख हे विदेशी असल्याचे त्यांना दिसून आले. नियतकालिकांचा वापर सर्वाधिक (५२%), तर त्या खालोखाल ग्रंथांचा वापर (२७.२०%) झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

उल्लेखांची प्रति–प्रबंध सरासरी संख्या व संशोधकांचा साहित्य निर्मितीतील कल जाणून घेणे, ही उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून Suma & Sudhier (2013) यांनी बिब्लिओमेट्रिकस अभ्यास केला आहे. त्यासाठी त्यांनी Council of Scientific and Industrial Research – National Institute for Interdisciplinary Science and Technology (CSIR-NIIST), Thiruvananthapuram या संस्थेची निवड केली आहे. त्यांना त्यासाठी २००१ ते २०१० या कालावधीतील एकूण १३७ प्रबंध अभ्यासासाठी उपलब्ध झाले. त्यांच्या असे लक्षात आले की प्रति–प्रबंध सरासरी उल्लेख संख्या ही सर्वाधिक १५१–२५० (२०.४४%) या दरम्यानची असून त्या खालोखाल २५१–३०० (१७.५२%) व १०१–१५० (१६.०६%) या दरम्यानची आहे. रसायन शास्त्राकडे संशोधकांचा सर्वाधिक (७८.१०%) कल असल्याचे त्यांना आढळून आले.

संशोधन प्रबंधांतील सर्वाधिक उल्लेख (५०.४०%) हे विदेशी असतात, भारतातील हे प्रमाण कमी (३.७०%) असल्याचा निष्कर्ष Vaidya (2017) यांनी काढला आहे. अलीगड मुस्लिम विद्यापीठ येथे भौतिक शास्त्र या विषयात २०१० ते २०१३ या कालावधीत सादर झालेल्या पीएच डी प्रबंध व एम फिल प्रबंधिकांचा त्यांनी बिब्लिओमेट्रिक्स अभ्यास केला आहे. त्यासाठी

त्यांना २२ प्रबंध/प्रबंधिकांतील १६२६ उल्लेख अभ्यासासाठी उपलब्ध झाले. संशोधक आपल्या संशोधनासाठी नियतकालिकांचा वापर सर्वाधिक (८१.८०%) तर त्या खालोखाल ग्रंथ (९.३४%), अहवाल (३.२०%) व परिषद वृत्तांत (१.५०%) यांचा क्रम लागतो. येथे ब्रॅडफर्डचा नियम लागू होतो. फिजिक्स रिव्ह्यू (अमेरिका) हे मुख्य नियतकालिक यादीतील प्रथम क्रमांकाचे नियतकालिक आहे.

Vijaykumar & Nagarajan (2009) यांनी आयआयटी या संस्थेद्वारे १९९४ ते २००४ या कालावधीत प्रकाशित झालेल्या लेखांचा बिब्लिओमेट्रिक्स अभ्यास केला आहे. त्यासाठी त्यांना एकूण १४८७९ इतके लेख प्राप्त झाले. त्यांच्या निरीक्षणानुसार आयआयटी, खडकपूर सर्वाधिक (२१.३२%) लेख प्रसिद्ध करते. त्या खालोखाल आयआयटी, मुंबई (२०.३८%), आयआयटी, कानपूर (१८.१०%) यांचा क्रमांक लागतो. रसायन शास्त्र या विषयात सर्वाधिक (२७.०५%) तर भौतिक शास्त्र (१९.२०%),मटेरियल सायन्स (१०%) या विषयांत त्या खालोखाल लेख प्रसिद्ध झाले आहेत. आयआयटीच्या सर्व केंद्रांवर संशोधकांना संशोधनासाठी अधिक पायाभूत सुविधा देण्यात याव्यात, तसेच आवश्यक सर्व माहिती वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात यावी, असे मत त्यांनी मांडले आहे.

### २.३.३ सायंटोमेट्रिक्स अभ्यास

Aswathy & Gopikuttan (2013) यांनी केरळमधील तीन विद्यापीठांतील प्राध्यापकांच्या साहित्य निर्मितीचा सायंटोमेट्रिक्स अभ्यास केला आहे. त्यासाठी केरळ विद्यापीठ, महात्मा गांधी विद्यापीठ आणि कालिकत विद्यापीठ येथील २००५ ते २००९ या कालावधीतील एकूण २३३५ लेख त्यांना उपलब्ध झाले. त्यात केरळ विद्यापीठाचे योगदान सर्वाधिक (४१.३७%) असून त्या खालोखाल कालिकत विद्यापीठाचे (३१.४३%) व महात्मा गांधी विद्यापीठाचे

(२७.२०%) यांचे आहे. केरळ विद्यापीठातील साहित्य निर्मितीची वाढ योग्य असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

क्लायमेट चेंज या विषयावर Husain & Mushtaq (2015) यांनी सायंटोमेट्रिक्स अभ्यास केला आहे. त्यासाठी त्यांना २००९ ते २०१३ या कालावधीतील १७२६६ प्रकाशित लेख उपलब्ध झाले. सर्वाधिक लेख (२७. ७३%) हे २०१३ मध्ये प्रकाशित झाले असून सर्वात कमी लेख (१२.९६%) हे २००९ मध्ये प्रकाशित झाले. यावरून या विषयातील साहित्य वाढ लक्षात येते, असे त्यांनी नमूद केले आहे. मुख्य नियतकालिक यादीतील क्लायमेट चेंज व ग्लोबल चेंज बायोलॉजी ही दोन नियतकालिके सर्वोच्च स्थानावर असल्याचे मत त्यांनी मांडले आहे.

Kumar et. al. (2008) यांनी भौतिकशास्त्र या विषयातील प्रेरणा : जर्नल ऑफ फिजिक्स या नियतकालिकाच्या आधारे सायंटोमेट्रिक्स अभ्यास केला आहे. त्यासाठी त्यांना १९८२ ते २००६ या कालावधीतील एकूण ३९७६ लेख उपलब्ध झाले. प्रस्तुत नियतकालिकातील साहित्य वाढीचे प्रमाण योग्य आहे, इम्पॅक्ट फॅक्टर उच्च आहे व दर्जात्मक लेखनाचा स्तरही उंचावल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

Mahewswaran, Kumar & Sridharan (2009) यांनी स्ट्रक्चरल इंजिनियरींग या विषयात स्ट्रक्चरल इंजिनियरींग रिसर्च सेंटर या संस्थेच्या २००२ ते २००६ या कालावधीतील प्रकाशित लेखांचा क्षेत्रनिहाय सायंटोमेट्रिक्स अभ्यास केला आहे. त्यासाठी त्यांना ६३९ इतके लेख उपलब्ध झाले. यातील नियतकालिकातील प्रकाशित लेखांचे प्रमाण २१९ (३४.२१%) इतके आहे. भारतातील लेख ३६७ (५७.४३%) इतके असून विदेशी लेख २७२ (४२.५७%) इतके आहेत, असे त्यांना आढळून आले.

Rajneesh (2013) यांनी संगणक शास्त्र या विषयात असोशिएशन फॉर कॉम्प्युटिंग मशिनरी या संस्थेद्वारे १९५४ ते २००८ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या साहित्य निर्मितीच्या वाढीचा सायंटोमेट्रिक्स अभ्यास केला आहे. त्यासाठी त्यांना ३६ नियतकालिके उपलब्ध झाली. त्यांच्या असे लक्षात आले की सर्वाधिक लेख (८२%) हे बहु–लेखक प्रकारात प्रसिद्ध झाले असून एक–लेखक प्रकाराचा वापर (२८%) त्या खालोखाल झाला आहे. आशय विश्लेषणात असे आढळून आले की Algorithm हा शब्द सार्वाधिक वेळा वापरलेला असून त्या खालोखाल System, Network, Mode, Analysis या शब्दांचा वापर झाला आहे.

**२.३.४ वेबोमेट्रिक्स अभ्यास**

हिमाचल प्रदेशातील खाजगी विद्यापीठातील वेबसाईटस्चा Kumar (2016) यांनी वेबोमेट्रिक्स अभ्यास केला आहे. त्यासाठी त्यांना १७ विद्यापीठे उपलब्ध झाली. त्यांना असे आढळून आले की वेब पेज काऊंट हा करियर पॉईट विद्यापीठाचा सर्वाधिक (१३ कोटीहून जास्त) असून ते प्रथम क्रंकावर आहे. तर महर्षी मार्कंडेश्वर विद्यापीठाचा वेब पेज काऊंट सर्वात कमी (४०००च्या आत) असून ते शेवटच्या क्रमांकावर आहे. हायपर लिंकची संख्या अभिलाषी विद्यापीठाची सर्वाधिक (१०४) असून एपीजी सिमला विद्यापीठ आणि अरधी विद्यापीठ यांची सर्वात कमी (शून्य) आहे.

Shabna & Vasudevan (2010) यांनी लायब्ररी असोसिएशन्स ऑफ इंडिया यांच्या वेब साईट्सचा वेबोमेट्रिक्स अभ्यास केला आहे. वेब पेज कंटेंट, वेब लिंक स्ट्रक्चर, वेब युएज व वेब टेक्नॉलॉजी या विषय क्षेत्रांशी निगडीत ग्रंथालय आणि माहिती शास्त्र या विषयात हा अभ्यास करण्यात आला आहे. त्यासाठी लायब्ररी असोसिएशन्स ऑफ इंडियाच्या ९ वेबसाईट्स त्यांना

उपलब्ध झाल्या. सर्व वेब साईट्स वार्ता आणि कार्यक्रमाची अद्ययावत माहिती देतात. सभासदत्वाचीही पुरेशी माहिती दिलेली असते. काही वेब साईट्स माहिती पुरवताना दिनांक आणि वेळ देत नाहीत, असे मत त्यांनी नोंदवले आहे.

## २.४ सारांश

वरील वाचनसाहित्याच्या आढाव्याचे निरीक्षण केल्यास काही ठळक बाबी लक्षात येतात. त्या अशा—

(१) वरील सर्व उपलब्ध साहित्य इंग्रजी भाषेत आहे.

(२) ग्रंथालय आणि माहिती शास्त्र,वैद्यकशास्त्र, विज्ञान, रसायनशास्त्र, मानसशास्त्र, कॉमर्स, अर्थशास्त्र, प्राणीशास्त्र, समाजशास्त्र, सामाजिक शास्त्र, इंग्रजी, भौतिकशास्त्र, सिव्हिल इंजिनियरींग, विज्ञान व तंत्रज्ञान, क्लायमेट चेंज, स्ट्रक्चरल इंजिनियरींग, संगणकशास्त्र अशा विविध विषयांचा अभ्यास करण्यात आला आहे.

(३) नियतकालिकांचा जास्त वापर होतो. त्या त्या विषयांमध्ये साहित्य वाढ होण्यासाठी मुख्यत्वे नियतकालिकांची मदत होते व याची यादी उपलब्ध आहे.

(४) स्त्री—पुरुष लेखकांचे प्रमाण नोंदवलेले आढळते.

(५) नवीन काळाला अनुसरून अंकीय उल्लेखांचा जास्त वापर होतो का, याचे निरीक्षण करण्यात आलेले आहे.

वरील सर्व अभ्यासातून असे निदर्शनास येते की बऱ्याच विद्यापीठातून ठरावीक कालावधीत दाखल केलेल्या संशोधन प्रबंधाचा अभ्यास उल्लेख विश्लेषणासाठी केला आहे. तसेच विषयातील प्रमुख नियतकालिकांच्या उल्लेखाचा अभ्यास केला आहे. विविध विषय विविध प्रकाशनांच्या प्रकारांचा वापर व उल्लेख निर्देशनांचा अभ्यास केला असता असे दिसून येते की अभ्यासक हे प्रबंध लिहिताना मुख्य करून नियतकालिके, ग्रंथ यांचा उल्लेख जास्त प्रमाणात करतात.

तसेच असेही लक्षात येते की उल्लेख विश्लेषणाचे कोणत्याही स्वरूपाचे काम मराठी भाषेत जास्त झाले नाही. भाषा विषयात, एखादा अपवाद वगळता, उल्लेखनीय काम झालेले नाही. भाषा विषयात मुख्य नियतकालिकांची यादी उपलब्ध नाही. स्त्री—लेखक आणि पुरुष—लेखक यांच्या कामाची नोंद नाही. तसेच, अभ्यासक मुद्रित उल्लेख किंवा अंकीय उल्लेख असा कोणता पकार वापरतात याची नोंद नाही.

प्रस्तुत संशोधनात अभ्यासकाने या सर्व त्रुटी दूर केल्या आहेत. इतर विषय व भाषा यातील संशोधनाची पोकळी (gap) भरून काढली आहे. भाषेचा अभ्यास हे मानवी समाजजीवनाचे व सुस्कृतीचे अविभाज्य अंग आहे हे जाणून त्याची यथोचित नोंद घेण्यात आलेली आहे. त्यामुळे हे संशोधन जिज्ञासू वाचकांना व भावी अभ्यासकांना दिशादर्शक ठरणारे आहे. म्हणूनच ते महत्त्वाचे आहे.

## संदर्भ


01. कुंभार, राजेंद्र (२०१३), ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन, पुणे : युनिव्हर्सल, पृ.२७२

02. बर्वे, बी. एन. (२०१०), मानसशास्त्रातील संशोधन पद्धती, नागपूर : विद्या, पृ.२२४

03. Ashraf, Tariq and Jindal, Suresh (2012), Pattern of Research and Citations: A Study of University of Delhi, *Library Herald*, 50(22), pp. 6-15

04. Aswathy, S. and Gopikuttan, A. (2013), Productivity Pattern of Universities in Kerala: A Scientometric Analysis, *Annals of Library and Information Studies*, Vol. 60, 176-185

05. Bajad, Rajabhau V. and Deshmukh, Prashant P. (2014), A Bibliographic Study of Ph.D. Theses awarded in the faculty of Civil Engineering and Technology, Sant Gadge Baba Amaravati University during 1994-94 to 2009-10. Conference Proceedings on *Emerging Trends, Advancements and Challenges of Academic and Public Libraries*, Medhe, Ravindra et.al. (Eds.), Dhule: Atharva, pp. 223-226

06. Bhat, Veena R. and Sampathkumar, b.T. (2008), Use of web based sources in scholarly journals in the field of Library and Information Science: A Citation Analysis, *Annals of Library and Information Studies*, Vol.55, pp. 145-152

07. Chikate, R.V. and Patil, S.K. (2008), Citation Analysis of theses in LIS submitted to University of Pune: A Pilot Study, *Library Philosophy and Practice*, 1-16

08. Choudhary, Praabhat Kumar and Sinha, Arun Kumar (2010), A Bibliometric Study of S & T Publications from two places of Academic Repute during 1998 -2009, *ILA Bulletin*, 46(3-4), pp. 20-26

09. Dash, Jitendra N. and Parida, Banan (2013), Diffusion of medical journals analysed through citations, *Annals of Library and Information Studies*, vol. 60, pp. 242-248

10. Deshmukh, Prashant P. (1998), Citation Analysis of Ph. D. Theses submitted to Punjabrao Krushi vidyapeeth during 1990-94, *Ph.D. thesis submitted to Amaravati University, Amaravati*

11. Deshmukh, Prashant P. (2011), Citations in Annals of Library and Information Studies during 1997-2010: A Study, *Annals of Library and Information Studies*, Vol. 58, pp. 355-361

12. Garg, K. C. and Kumar, S. ( 2010), An analysis of the Citation Pattern of Indian Science Journals indexed by SCIE, *Annals of Library and Information Studies*, Vol. 57, 365-372

13. Garg, K.C. and Sudhier, K.G. Pillai (2013), Doctoral Dissertations of CSIR-national Instiue of Interdisciplinary Science and Technology (NIIST), Thiruvananthapurm: A Study, *Annals of Library and Information Studies*, Vol. 60, pp. 71-77

14. Gohain, Anjan and Saikia, Mukesh (2014), Citation Analysis of Ph.D. Theses submitted to the department of Chemical Sciences, Tezpur University, Assam, *Library Philosophy and Practice (e-journal)*, paper 1066, avaible at http://digitalcommons.unl.edu/libphilprac/1066 accessed on 9/9/2015

15. Gupta, Jyoti and Khare, V.P. (2013), Citation Analysis of Doctoral Theses submitted to Bundelkhand

University (Jhansi) and Dr. Hari Singh Gour University (Sagar) in the discipline of Library and Information Science: A Comparative Study, *Library Herald*, 51(4), pp. 377-385

16. Haque, Enamul(2012), The Journal of Poultry Science: An analysis of citation pattern, *The Eastern Librarian*, 23(1), pp. 64-73

17. Harinarayana, N.S., Chikkamanju and Vasantha, Raju N. 2011), A Study of Citation Accuracy in Psychology theses submitted to the University of Mysore, *Annals of Library and Information Studies*, Vol. 58, 326-334

18. Husain, Shabahat and Mushtaq, Muzamil (2015),Scientometric Assessment of Climate Change Data, *Library Herald*, 53(4), pp. 379-388

19. Jan, Rosy (2009), Citation Analysis of Library Trends, *Webology*, 06(1), pp. 1-9

20. Jayprakash and Kannappanavar, B.U. (20130, Citation Analysis of Doctoral Dissertations in Commerce submitted to Goa University, Goa: A Bibliometric Study, *International Journal of Digital Library Services*, 05(2), pp. 160-177

21. Kalbande, Dattatreya Tryaambakrao and Sonawane, Shashank S. (2012), Citation Analysis of Ph.D. Theses on Economics submitted to Dr. Babasaheb Ambedkar

Matathwada University, *Electronic International Interdisciplinary Research Journal*, 01(2), pp. 17-35

22. Krishnaswami, O.R. & Ranganatham, M. (2005), Methodology of Research in Social Science, Ed.2, Mumbai : Himalaya, p. 446

23. Kumar, Anil, Prakasan, E.R., Kalyane, V.L. and Kumar, Vijay(2008), Prerana: Journal of Physics: A Scientometric Analysis, *Annals of Library and Information Studies*, Vol.55, pp. 52-61

24. Kumar, Jatinder (2016), Webometric Analysis of Web-domains of Private Universities of Himachal Pradesh, *Library Herald*, 54(4), pp. 459-474

25. Kumar, K. and Reddy, T. Raghunatha (2013), Citation Analysis of Dissertations, *International Journal of Information Management Science*, 2/1, 33-44

26. Kumbar, Mallinath, Gupta, B.M. and Dhawan, S.M. (2008), Growth and Impact of Research Output of University of Mysore during 1996-2006: A Case Study, *Annals of Library and Information Studies*, Vol.55, pp. 185-195

27. Kuri, Ramesh and Hejje, Venugopal (2014), Citation Analysis of Pearl: A Journal of Library and Information Science, *Asian Journal of Multidisciplinary Studies*, Vol. 02, Issue 9, pp. 1-6

28. Lokhanda, Rahul S.(2007), Citation Analysis of Doctoral Dissertations submitted to University of Pune in the subject Library and Information Science, *ILA Bulletin*, 43(2), pp. 12-18

29. Madasamy, R. and Alwarammal (2009), Doctoral degrees in Library and Information Science in India during 2003-2008: A Study, *Annals of Library and Information Studies*, Vol.56, pp. 262-266

30. Maheswaran, S., Stishkumar, R.D. and Sridharan, K.R. (2009), Scientometric Analysis of area-wise publications in the field of Structural Engineering: A Case Study of SERC, India, *Annals of Library and Information Studies*, Vol.56, pp. 202-208

31. Mishra, Devendra Kumar, Gawade, Manisha and Solanki, Madhu Singh (2014), Bibliometric Study of Ph.D. Theses in English, *Global Journal of Academic Librarianship*, 01(1), pp. 19-36

32. Olatokun, Wole Michael and Makinde, Olayinka (2009), Citation Analysis of Dissertations submitted to the department of Animal Science, University of Ibadan, Nigeria, *Annals of Library and Information Studies*, Vol. 56, pp. 117-128

33. Parameshwar, Goutami and Patil, D.B. (2016), Publication Trends in Library and Information Science: A

Bibliometric Analysis of Library Herald, *Library Herald*, 54(3), pp. 315-330

34. Phugnar, Prashant L. (2012), A Citation Analysis of Doctoral Dissertations in Library and Information Science accepted by the Universities in Western India, *A Ph.D. thesis submitted to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune*

35. Rajgoli, Iqbalahmad U. (2011), Conference Proceedings as a source of information in LIS research in India: A study based on citations, *Annals of Library and Information Studies*, Vol.58, 346-354

36. Rajneesh (2013), A Scientometric Study of Computer Science with special eference to Literature published by Association for Computing Machinery (ACM), *Library Herald*, 51(3), pp. 238-250

37. Ramesh, L.S.R.C.V and Nagaraju, A.V.S.S. (2000), Citation Analysis of the Indian Journal of Information, Library and Society, *Indian Journal of Infomation, Library and Society*, Vol. 03, Issue 3-4, pp. 171-179

38. Sahu, A.K., Goswami, N.G. and Choudhary, B.K. (2011), Research publications of National Metallurgical laboratory during the year 2001-2010: A study on Citation Pattern, *Annals of Library and Information Studies*, Vol. 58, 151-160

39. Shabna, T. P. and Vasudevan, T. M. (2010), Webometric Analysis of websites of Library Associations in India, *ILA Bulletin*, 46(1-2), pp. 23-27

40. Sing, K. P. and Bebi (2013) , Citation Analysis of Ph. D. theses in Sociology submitted to University of Delhi during 1995-2010, *DESIDOC Journal of Library and Information Technology*, 33/6, 489-493

41. Sing, K. P. and Bebi (2014) , Applicarion of Bradford's law on journal citations : A study of Ph. D. theses in Social Sciences of Universities of Delhi, *Annals of Library and Information Studies*, Vol. 61, pp.112-120

42. Singh, K.P. and Bebi (2014), library Herald: A Bibliometric Study (2003-2012), *Library Herald*, 52(1), pp. 19-27

43. Singh. K.P. and Chander, Harish (2016), Publication Output of Indian Journal of Traditional Knowledge: A Bibliometric Analysis, *Library Herald*, 54(3), pp.277-289

44. Soler-Monreal, Carmen and Gil-Salom, Luz (2011), A Cross-Language Study on Citation Practice in Ph.D. Theses, *Internation Journal of English Studies*, pp. 53-75

45. Sudhier, K.G. Pillai (2007), Journal Citations in Physics Doctoral Dissertations of Indian Institute of Science, *Annals of Library and Information Studies*, Vol.54, pp. 177-184

*46.* Suma, S. and Sudhir, K.G. Pillai (2013), Doctoral dissertations of CSIR- national Institute for Interdisciplinary Science and Technology (NIIST), Thiruvananthapuram: A study, *Annals of Library and Information Studies*, Vol.60, 71-77

47. Thoidingjam, Purnimadevi (1994), Citation Analysis of the Ph.D. Theses in Social Sciences accepted by Gouhati University during 1970-1980, *A Ph.D. thesis submitted to Maniur University, Imphal*

48. Vaidya, Priya (2017), Bibliometrics of Cited References appended to Ph.D. and M.Phil. Dissertations submitted to Aligarh Muslim University in the discipline of Physics during 2010-2013, *Library Herald*, 55(4), pp. 503-514

49. Vijaykumar, K. and Nagarajan, M. (2009), Bibliometric Analysis of research output of Indian Institutes of Technology, *ILA Bulletin*, 45(3-4), pp. 21-26

50. Wilson, Ellen K. (2012), Citation analysis of Undergraduate Honors Theses, *The Southeastern Librarian*, 60/1, 39-50

51. Zafrunnisha, N. and Pullareddy, V. (2009), Authorship Pattern and Degree of Collaboration in Psychology, *Annals of Library and Information Studies*, vol. 56, pp. 255-261

52. Zavery, Parul (2013), Citation Pattern in Ph.D.Theses in library and Information Science at S.N.D.T. women's University, Mumbai during 1996-2012, *Library Herald*, 51(4), pp. 386-392

○○○

## प्रकरण तीन

# उल्लेख
# आणि
# उल्लेख विश्लेषण

# प्रकरण तीन

# उल्लेख आणि उल्लेख विश्लेषण

## ३.१ प्रस्तावना

संशोधन अहवाल लिहिताना संशोधक विशिष्ट विषयातील वेगवेगळे संदर्भ ग्रंथ हाताळत असतो. संशोधनासाठी लागणारी माहिती प्राथमिक स्त्रोताबरोबरच दुय्यम स्त्रोताद्वारे संकलित करीत असतो. हा स्त्रोत कुठून उपलब्ध झाला त्याची माहिती देत असतो. यालाच उल्लेख म्हणतात (कायंदे—पाटील,२००९). विशिष्ट विषयातील उल्लेखांचा अभ्यास केला जातो. व निष्कर्षांद्वारे त्या विषयातील साहित्य निर्मितीचा प्रवाह, मुख्य नियतकालिकांची यादी इत्यादी गोष्टी कळून येतात. याचा ग्रंथालयात, तसेच अभ्यासकांना चांगला उपयोग होतो.

## ३.२ उल्लेख म्हणजे काय?

संशोधक आपले विचार मांडताना आधीच्या संशोधकांच्या विधानाचा आधार घेतो व तसे आपल्या लिखाणात नमूद करतो. यालाच उल्लेख असे म्हणतात. एखाद्या लेखात लेखक अन्य लेखकांचाही उल्लेख करतो. कारण त्या लेखामध्ये त्या लेखकाला काही साधर्म्य आढळते. म्हणून या लेखापूर्वी त्या विषयावर कोणी किती माहिती मिळवली याचा आढावा तो घेत असतो.

उल्लेख हे प्रकाशनात वेगवेगळ्या कारणांसाठी केले जातात. उदा.

१) ज्याच्या त्याच्या कामाचे श्रेय ज्याला त्याला देणे.

२) आपल्या विधानाला आधार देणे.

३) मांडलेल्या मुद्याचा मूळ तपशील पुरवणे.

४) अधिक माहितीसाठी संदर्भ पुरवणे.

५) इतर अभ्यासकांना माहिती मिळण्यास मदत होणे.

उल्लेखाची परंपरा जुनी आहे. विशेषत: कायदा आणि विधी विभागात याचा फार वापर केला जातो. न्यायालयात बाजू मांडताना वकिलांना किंवा निवाडा करताना न्यायाधिशांना याचा फार उपयोग होतो. त्यासाठी ते अशा घटनांचा पूर्वीचा उल्लेख अभ्यासतात. समान घटनांच्या बाबतीत याआधी काय निर्णय घेतले गेले आहेत हे या उल्लेखांच्या आधारे पाहता येते. यादृष्टीने उल्लेखांना फार महत्त्व आहे. तसेच सर्व ज्ञानाच्या शाखेत उल्लेखांचा वापर केला जातो.

लेखक प्रलेखातून आपले विचार मांडत असतो. त्या विचारांच्या समर्थनार्थ तो पूर्वसूरींच्या विधानाचा आधार घेत असतो. तो आधार नेमका कुठला, कुठून प्राप्त झाला याचा तो पुरावा देत असतो. हा पुरावा म्हणजेच उल्लेख होय. विशिष्ट विषयाशी संबंधित आधी इतर लेखकांनी मांडलेल्या विचारांचा पुरावा देणे म्हणजेच उल्लेख होय.

Garfield (1979) यांनी उल्लेखांबाबत असे नमूद केले आहे की, “Anyone conducting a literature search, can find from one to dozens of additional papers on a subject just by knowing one that has been cited.”

या उल्लेखांनाच तळटीपा (footnotes), उल्लेखित प्रलेख (cited document) किंवा संदर्भ (reference) असेही म्हणतात.

### ३.२.१ उल्लेखांचे प्रयोजन

उल्लेख किंवा तळटीपा यांच्या प्रयोजनाची काही कारणे अशी आहेत. (मालशे, २००७)

(१) दुसऱ्याचे मत स्वत:चे म्हणून मांडणे गैर आहे. त्यामुळे वाङ्मय चौर्याचा आरोप होऊ शकतो. उल्लेख दिल्यास हा आरोप टळतो.

(२) ऋणनिर्देश करण्याची पूर्वसूरींनी घालून दिलेली परंपरा पुढे चालवायची असते.

(३) स्वत:शी प्रामाणिक राहणे.

(४) प्रलेखातील विधानांची अधिकृतता आणि साधनांची विश्वसनीयता यांची पारख वाचकाला करता येणे.

(५) भावी अभ्यासकाला मार्गदर्शन व्हावे. व मूळ लेख पाहता यावा.

(६) आपल्या प्रतिपाद्य विषयाशी कमी संबंधित असलेला, पण अन्य दृष्टीने उपयुक्त असा संदर्भ नोंदवून ठेवल्यास इतर अभ्यासकांच्या विचारांना चालना मिळते.

(७) एखाद्या साधनाचा शोध घेऊनही ते न मिळाल्यास त्या साधनासाठी आपण जेथवर माग काढत गेलो त्याचा उल्लेख केला जातो. भावी अभ्यासकाला ते उपलब्ध होण्याची शक्यता असते.

(८) विवेचनाच्या ओघात अडथळा आणणारे अवांतर शेरे तळटीपेत नोंदवल्याने लेखनाचा मुद्देसूदपणा ढळत नाही.

(९) तांत्रिक माहिती किंवा दुर्मिळ हस्तलिखितांची माहिती उल्लेखाद्वारे द्यावी.

(१०) ग्रंथांतर्गत प्रतिसंदर्भ देण्यासाठी उल्लेख करावा.

(११) दोन किंवा तीन कलमांत मेळ घालण्यासाठी उल्लेख देतात.

(१२) प्रलेखातील एखाद्या शब्दाचा अर्थ किंवा व्याख्या यासाठी उल्लेख करावेत.

(१३) संशोधनाचा किंवा विकासाचा प्रवाह (Trend) कळावा.

(१४) घटना, तिथी इत्यादींचा पुरावा असावा.

### ३.२.२ उल्लेखांचे प्रस्तुतीकरण

उल्लेखांचे अनेक प्रकारे प्रस्तुीकरण करता येते. ते खालीलप्रमाणे—

१. प्रत्यक्ष अवतरण उद्धृत करणे.

२. एखादी आकृती, कोष्टक किंवा तक्ता जसाच्या तसा देणे.

३. लेखकाचा मतितार्थ आपल्या शब्दांत देणे.

४. एखाद्या आकृतीवरून स्वत:ची वेगळी आकृती तयार करून देणे.

५. एखाद्या मताचा स्वत: अनुवाद करणे.

६. सर्वसामान्य वाचकाला माहीत नसेल असा पुरावा देणे.

## ३.३ उल्लेख विश्लेषण म्हणजे काय?

उल्लेख विश्लेषण हे प्रलेखांचा अभ्यास करणारे एक शास्त्र आहे. याद्वारे प्रलेखातील नातेसंबंध दर्शवले जातात. ग्रंथमितीय संशोधनातील उल्लेख विश्लेषण हे महत्त्वाचे क्षेत्र आहे. ते लेखक आणि त्याचे साहित्य प्रस्थापित करण्यासाठी विविध पद्धतींचा वापर करते. ग्रंथमितीचे ते एक तंत्र आहे. महत्त्वाचे संशोधन साधन आहे. ते प्रलेखांच्या उपयुक्ततेचे मापन करते. उल्लेख प्रलेख आणि उल्लेखित प्रल्लेख यांचा संबंध दर्शवण्यासाठी उल्लेख विश्लेषणाचा उपयोग केला जातो. ग्रंथपाल, प्राध्यापक, माहिती शास्त्रज्ञ, संशोधक यांना याची फार मदत होते. माहिती पद्धती संरचनाकार याच्या मदतीने उत्पादन व सेवा यांची आखणी करू शकतात. प्रलेख निवड, वाचनसाहित्य खरेदी यासाठी ग्रंथपालांना ही पद्धती फार उपयोगी पडते. (Kalbande & Sonawane, 2012)

विविध विषय क्षेत्रातील मुख्य प्रलेख कोणते ते ओळखण्यासाठी वापरण्यात येणारी सर्वात जास्त उपयुक्त पद्धत म्हणजे उल्लेख विश्लेषण होय. वाचकांची माहितीची गरज व मागणी जाणणारी प्रभावी व अप्रत्यक्ष पद्धती म्हणजे उल्लेख विश्लेषण होय. किती वेळा कोणते उल्लेख हे संदर्भ, ग्रंथसूची, निर्देश साधने यांच्यात उल्लेखलेले आहेत याचे उल्लेख विश्लेषण मापन करते.आणि त्या उल्लेखांच्या प्रगटीकरणाच्या वारंवारितेची तुलना करते. (Haque, 2012)

वाचकांच्या ग्रंथविषयक मागण्या पुऱ्या करणे, त्यासाठी जे वारंवार वापरले जाते व वाचक नेहमीच पसंती देतात असे संबंधित वाचनसाहित्य उपार्जित करणे, हे गंथपालांचे ध्येय असते. हे तेव्हाच शक्य होते जेव्हा संशोधक कोणत्या विशिष्ट विषयाशी संबंधित असतात अथवा कोणते उल्लेखित प्रलेख ते अभ्यासतात, याची ग्रंथपालांना माहिती असते. उल्लेख विश्लेषणामुळे उपयुक्त वाचनसाहित्य निवडण्यास ग्रंथपालांना मदत होते. (Kuri & Hejje, 2014)

विद्वत् नियतकालिकातील तळटीपा किंवा संदर्भ ग्रंथसूची यातून मिळालेल्या तथ्यांचे विश्लेषण म्हणजे उल्लेख विश्लेषण होय. ही एक सशक्त व प्रसिद्ध अशी पद्धती आहे. याद्वारे शास्त्रज्ञ, प्रकल्प, नियतकालिके, विषयक्षेत्र व राष्ट्र यांचा प्रभाव अभ्यासता येतो. ही पद्धती विविध देशांतील शिक्षण, संशोधन, विविध संस्था या क्षेत्रात चढत्या क्रमाने वापरली जात आहे. त्यामुळे संशोधनात्मक धोरण ठरवणे, विद्वत् नेटवर्क प्रत्यक्षात उतरवणे व शास्त्रीय प्रगती साधणे शक्य होते.

एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील उपलब्ध साहित्यातील इत्थंभूत माहिती उल्लेख विश्लेषण पुरवते. त्यामुळे त्या विशिष्ट क्षेत्रातील साहित्याची वाढ, लेखक व अभ्यासकांची संशोधनात्मक लेखनाची उत्पादकता यांचे मापन करता येते.

थोडक्यात म्हणजे, प्रलेखातील उल्लेखांचा सांख्यिकीय अभ्यास म्हणजे उल्लेख विश्लेषण. हे नवे तंत्र आहे. कोणत्याही विषयातील साहित्याची वाढ आणि विकास कसा झाला आहे ते याद्वारे जाणून घेता येते. ग्रंथ निवड व ग्रंथबातल धोरण राबवण्यासाठी ग्रंथालय व्यवस्थापनाला याचा खूपच फायदा होतो.

### ३.३.१ ऐतिहासिक आढावा

आधुनिक उल्लेख विश्लेषणाची संकल्पना १९व्या शतकात उदयास आली. कायदा व्यावसायिकांसाठी 'शेफर्ड निर्देश' हा १८७३ मध्ये अस्तित्वात आला. मागील खटल्यांतील घटनांचा उल्लेख करणे, ही तर न्यायालयीन दैनंदिन बाब. नवीन खटल्यातील मुद्यांना बळकटी देण्यासाठी त्याचा उपयोग होतो. युजिन गारफिल्ड यांनी या उल्लेखांचे महत्त्व ओळखले. त्यांनी विज्ञान शाखेसाठी अशा प्रकारच्या निर्देशाची आवश्यकता स्पष्टपणे मांडली. त्यांच्या अथक परिश्रमातून इ.स. १९६१ मध्ये विज्ञान विभागासाठी 'सायन्स सायटेशन इंडेक्स (SCI)' व इ.स. १९७३ मध्ये सामाजिक शास्त्र विभागासाठी 'सोशल सायन्स सायटेशन इंडेक्स (SSCI)' यांची निर्मिती झाली. उल्लेखांच्या किंवा संदर्भांच्या मोजणीची मूळ कल्पना मात्र 'ग्रॉस आणि ग्रॉस' यांची. त्यांनी विशिष्ट विषयातील मुख्य नियतकालिक यादी तयार करण्याची संकल्पना इ.स. १९२७ मध्ये एका विज्ञान पत्रिकेत मांडली होती.

### ३.३.२ उल्लेख विश्लेषणाची उपयुक्तता

उल्लेख विश्लेषण हे अनेक कारणांनी उपयुक्त ठरत असते. Ramesh & Nagraju (2000) यांनी त्यापैकी काही कारणे खालीलप्रमाणे नमूद केली आहेत.

(१) उल्लेख विश्लेषण हे मूळ प्रलेख किंवा मुख्य नियतकालिक ओळखण्यासाठी उपयुक्त ठरते.

(२) साहित्य वापराचे योग्य मापन उल्लेख विश्लेषण करते. तसेच संशोधन नियतकालिकांतील नातेसंबंध स्पष्ट करते.

(३) समान संदर्भ किंवा उल्लेख असलेले प्रलेख एकत्रित आणते.

(४) संशोधनात्मक लेखनातील साहित्य वाढीच्या अभ्यासाला उल्लेख विश्लेषण फार उपयुक्त ठरते.

(५) विशिष्ट क्षेत्रात संशोधनात्मक लेखन करणारे सर्व संशोधक किंवा सहलेखक यांची माहिती उल्लेख विश्लेषणामुळे मिळते.

(६) उल्लेख विश्लेषण ही पद्धती वापरणे तुलनेने स्वस्त आहे.

(७) विद्यापीठ ग्रंथालय वातावरणात उल्लेख विश्लेषण पद्धती ही जास्त अभ्यासली गेलेली व लवचीक अशी पद्धती आहे.

### ३.३.३ उल्लेख विश्लेषणाची गरज

उल्लेख विश्लेषणाची गरज ही खालील कारणांसाठी आहे.

(१) नियतकालिकांच्या वर्गणीत झालेली वाढ, अंदाजपत्रकातील तुटपुंजी आर्थिक तरतूद, उपलब्ध वाचनसाहित्य ठेवण्यासाठी असलेली अपुरी जागा अशा कारणांसाठी उल्लेख विश्लेषण करण्याची गरज निर्माण होते. पैशाचा आणि जागेचा जास्तीत जास्त वापर, वाचकांच्या आजच्या व भावी वाचनविषयक गरजा भागवण्यासाठी तयार कराव्या लागणाऱ्या 'ग्रंथ उपार्जन धोरणा'साठी उल्लेख विश्लेषणाची ग्रंथपालांना गरज भासते.

(२) एखाद्या भौगोलिक ठिकाणच्या विशिष्ट शास्त्रीय संशोधन क्षेत्रासाठी उल्लेख विश्लेषण गरजेचे असते. उल्लेख विश्लेषण हे विशिष्ट विषयातील मुख्य नियतकालिके जाणून घेण्यासाठी एक सर्वमान्य असे साधन आहे.

(३) प्रलेखांतील संदर्भाची सूची बनवण्याचे उल्लेख विश्लेषण हे एक तंत्र आहे. याद्वारे नियतकालिकांत उललेख केलेल्या संदर्भांची वारंवारिता मोजता येते.

(४) क्रमवारीने दिलेल्या नियतकालिकांची यादी ही माहिती शास्त्रज्ञ व ग्रंथपाल यांच्याकडून जास्त प्रमाणात वापरली जाते. त्यातून कोणती नियतकालिके ही जास्त उपयुक्त आहेत, कोणत्या नियतकालिकांत विशिष्ट विषयातील किंवा त्या विषयाच्या विशिष्ट पैलूसंबंधित किती लेख उपलब्ध आहेत, वाचकांच्या गरजा भागवण्यासाठी कोणत्या नियतकालिकांची नियमित वर्गणी भरली पाहिजे याचे निर्णय ग्रंथपालांना घेता येतात.

### ३.३.४ उल्लेख विश्लेषणाची 'सोपी मोजणी पद्धती'

सोपी मोजणी पद्धती ही उल्लेख विश्लेषणाची सर्वसामान्य व अतिशय सोपी पद्धती आहे. एखाद्या प्रलेखाने, प्रलेखांच्या संचाने किंवा लेखकाने, लेखकांच्या संचाने विशिष्ट उल्लेख प्रलेखातून किती उल्लेख प्राप्त केले आहे याच्या मोजणीसाठी ही पद्धती वापरली जाते. या पद्धतीतील अभ्यासाचे पुढील प्रकारचे निकष आहेत. हे सर्व किंवा यातील काही निवडक निकष घेऊन ही पद्धती वापरली जाते.

(१) लेखक प्रकार (एक—लेखक, दोन—लेखक, तीन—लेखक, तीनपेक्षा जास्त लेखक, विना—लेखक, स्व—लेखक इ.)

(२) प्रलेख प्रकार (ग्रंथ, नियतकालिक, प्रबंध/प्रबंधिका, परिषद वृत्तांत, अहवाल, कोश इ.)

(३) भाषा प्रकार (मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराती, जर्मन, फ्रेंच, संस्कृत इ.)

(४) मुख्य नियतकालिकांची क्रमवारी

(५) स्व—उल्लेख अभ्यास

(६) विषयाची विखरण

(७) प्रलेखाचे अवमूल्यन व हाफ लाईफ

प्रस्तुत संशोधनात उल्लेख विश्लेषणाची वरीलपैकी काही पैलू निवडून हीच पद्धती वापरली आहे.

### ३.३.५ उल्लेख विश्लेषणाचा हेतू

उल्लेख अथवा संदर्भ यांचे प्रलेख, लेखक, संस्था, विषय अशा विविध प्रकारांनी मूल्यमापन करून सादरीकरण करणे हा उल्लेख विश्लेषणाचा खरा हेतू आहे. (Zaveri, 2013)

## ३.४ उल्लेख विश्लेषणाचे पैलू

उल्लेख विश्लेषणाचे खालीलप्रमाणे विविध पैलू आहेत.

### ३.४.१ उपयुक्तता मापन

उल्लेख विश्लेषण हे प्रलेखांच्या उपयुक्तता मापनासाठी मौलिक आहे. ग्रंथालय आणि माहिती शास्त्रात व इतर शास्त्रात याला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. याद्वारे प्रलेखांचा प्रभाव, महत्त्व, संशोधनाचा दर्जा, संशोधनीय कार्याचे मूल्यमापन यांचा अभ्यास करता येतो. नियतकालिकांच्या निवडीसाठी अतिशय आवश्यक असणारा इम्पॅक्ट फॅक्टर मोजता येतो. तसेच संशोधकांना त्यांच्या लेखांच्या प्रसिद्धीसाठी दर्जेदार नियतकालिकांचा शोध घेता येतो.

### ३.४.२ वाचनसाहित्य विकास

उल्लेख विश्लेषण हे वाचनसाहित्य विकासासाठी एक उपयुक्त साधन आहे. आजच्या माहितीच्या विस्फोटाच्या युगात त्याचा चांगला उपयोग होऊ शकतो (Phugnar, 2012). उल्लेख विश्लेषणाचा वापर वाचनसाहित्य विकासासाठी शैक्षणिक ग्रंथालयांतून जास्त प्रमाणात केला जातो (Olatokun & Makinde, 2009). वाचनसाहित्य विकास हा गुणवत्ता आधारित व वाचकांना उपयुक्त असा होतो.

### ३.४.३ उपयुक्त साधन

वैज्ञानिक संशोधनाचा कल जाणून घेण्यासाठी उल्लेख विश्लेषण हे हल्लीच्या काळात एक अत्यंत उपयुक्त साधन समजले जाते. यात ग्रंथसूचीय संदर्भ व त्यांची गणती यांचा वापर केला जातो. त्यावरून कोणते लेखन हे विशिष्ट विषयाशी साधर्म्य दर्शवणारे आहे व वाचनास योग्य आहे, याचा अंदाज घेता येतो (Thoidingjam, 1994). यामुळे साहित्य प्रवाह कसा बदलत आहे याविषयी कल्पना येते.

### ३.४.४ मापन मार्ग

लेखक, लेख अथवा प्रकाशन यांच्यातील सापेक्ष महत्त्व व प्रभाव यांचे मापन करण्याचा एक मार्ग म्हणजेच उल्लेख विश्लेषण होय. यात लेखकाने इतर साहित्याचा किती उल्लेख केला आहे याचा विचार केला जातो.

### ३.४.५ मुख्य नियतकालिके निवड

विशिष्ट विषयातील मुख्य अथवा महत्त्वाची नियतकालिके कोणती हेही उल्लेख विश्लेषणाद्वारे जाणून घेता येते. व त्याप्रमाणे त्यांची ग्रंथालयात खरेदीसाठी निवड करता येते. यामुळे कमी खर्चात चांगली दर्जेदार नियतकालिके ग्रंथालयात समाविष्ट केली जातात.

### ३.४.६ माहिती स्त्रोताचा दर्जा

विशिष्ट विषयातील मुख्य संदर्भ समजून घेण्यासाठी उल्लेख विश्लेषण हे सर्वात जास्त उपयुक्त असे साधन आहे. जे संदर्भ लेख, लेखक, संस्था अथवा इतर शास्त्रीय कार्याद्वारे प्राप्त झालेले असतात त्या संदर्भांचे याद्वारे एखादी व्यक्ती  मूल्यमापन आणि सादरीकरण करू शकते. त्यामुळे माहिती स्त्रोताचा दर्जा ओळखण्यास मदत होते. ( Gohain & Saikia,, 2014)

### ३.४.७ नातेसंबंध शोध

उल्लेख विश्लेषण ही ग्रंथमितीची एक पद्धती आहे. विषय जाणून घेण्यासाठी हे एक उपयुक्त साधन आहे. याद्वारे प्रलेखांच्या उपयुक्ततेचं मापन केले जाते आणि विषयांतर्गत प्रलेखांचे नातेसंबंध शोधले जातात. तसेच लेख आणि लेखक यांचे संबंधही जुळवले जातात (Jan, 2009). संशोधन साहित्यात उपलब्ध होणाऱ्या उल्लेख अथवा ग्रंथसूचीय संदर्भांचे उल्लेख विश्लेषण हे एक विश्लेषण आहे. दुसरे संशोधनीय लेख अथवा लेखक यांच्यात संबंध प्रस्थपित करणाऱ्या दुव्यांचा यात अभ्यास केला जातो. एखाद्या

विषयातील नातेसंबंध समजून घेण्यासाठी या विश्लेषणाचा उपयोग होतो. (Gohain & Saikia, 2014)

### ३.४.८ विद्वत् क्षेत्रातील लेखांची प्राप्ती

उल्लेख विश्लेषण ही माहिती शास्त्राची एक शाखा आहे. त्यामुळे ज्याला इतरांकडून संदर्भ मिळालेला असतो अशा विद्वत् क्षेत्रातील लेखांची याद्वारे प्राप्ती केली जाते. यातूनच शास्त्रीय संप्रेषणातील बऱ्याच गोष्टी उघड केल्या जातात (Olatokun &Makinde, 2009).

## ३.५ उल्लेख विश्लेषणाचे उपयोजन

उल्लेख विश्लेषणाचे उपयोजन हे खालीलप्रमाणे केले जाते.

(१) विशिष्ट विषयातील समान नातेसंबंधाच्या नियतकालिकांच्या निवडीसाठी उल्लेख विश्लेषणाचा उपयोग केला जातो.

(२) जास्त उल्लेखित नियतकालिके किंवा ग्रंथांच्या यादीचा विचार वाचनसाहित्य रद्दबातल ठरवताना ग्रंथालयात केला जातो. त्यासाठी उल्लेख विश्लेषण उपयोगी पडते.

(३) वर्षनिहाय प्रकाशन खंडाच्या सूचीसाठी उल्लेखांची माहिती उपयुक्त ठरते.

(४) विशेष प्रलेखाची महती नोंदवता येते. तसेच उल्लेख निर्देश हा संबंधित प्रलेखाची त्वरित ओळख पटावी, यासाठी मार्गदर्शन करतो.

(५) संशोधनात्मक लेखनातील शास्त्रीय प्रभाव व उत्पादकता यांच्या मूल्यमापन व सादरीकरणासाठी उल्लेख विश्लेषणाचा उपयोग होतो.

(६) विशिष्ट विषय क्षेत्रातील उल्लेख प्रकाराच्या जाणकारीसाठी उल्लेख विश्लेषणाची मदत होते.

## ३.६ उल्लेख विश्लेषणाच्या मर्यादा

इतर तंत्रांप्रमाणे उल्लेख विश्लेषण तंत्रातील देखील काही उणीवा स्पष्ट झाल्या आहेत. त्या उल्लेख विश्लेषणाच्या मर्यादा अधोरेखित करतात. त्यातील काही उणीवा इथे नमूद करण्यात आल्या आहेत.

(१) उल्लेख विश्लेषण हे, एखादा विशिष्ट माहिती स्त्रोत उल्लेखासाठी का वापरला गेलाय किंवा का वापरला गेला नाही, याची कोणतीच माहिती पुरवू शकत नाही. तसेच एखादा माहिती स्त्रोत उल्लेख करण्याइतका महत्त्वाचा आहे का, याचेही उत्तर उल्लेख विश्लेषण देऊ शकत नाही.

(२) उल्लेख विश्लेषणासाठी निवडलेले उल्लेख हे प्रमाणित असतातच असे नाही

(३) एकत्रित लेखकांच्या बाबतीत फक्त पहिल्याच लेखकाच्या नावाने उल्लेखाची नोंद होते. त्यामुळे इतर लेखकांचे मूल्यमापन होत नाही.

(४) स्व—उल्लेख कित्येकदा विचारात घेतला जात नाही

असे असले तरी उल्लेख विश्लेषण ही इतर पद्धतींपेक्षा जास्त विश्वसनीय व जास्त वापरली जाणारी पद्धती आहे.

## ३.७ उल्लेख विश्लेषणाशी संबंधित संज्ञा

उल्लेख विश्लेषणाच्या अभ्यासाच्या प्राधान्यानुसार त्याच्याशी संबंधित इतरही काही संज्ञा आहेत.

### ३.७.१ ग्रंथमिती (Bibliometrics)

ग्रंथालयांमध्ये संख्यात्मक तंत्रज्ञान 'सांख्यिकीय ग्रंथसूची' म्हणून ओळखला जाते. पिचर्ड यांनी इ. स. १९६९ मध्ये या संज्ञेचा सर्वप्रथम वापर केला. तशी ही संज्ञा इ. स. १९२४ पासूनच वापरात होती (कोण्णूर आणि इतर, २००८). 'ग्रंथालये आणि माहिती केंद्रात माहितीच्या प्रक्रिया आणि

माहितीची हाताळणी या संबंधात प्रलेख, ग्रंथालय सेवक बर्ग व उपयोजक यांची वैशिष्ट्ये आणि वर्तनाचे संख्यात्मक पृथक्करण म्हणजे ग्रंथमिती होय.

### ३.७.२ ग्रंथालयमिती (Librametry)

ही पद्धती डॉ. रंगनाथन यांनी इ. स. १९४८ मध्ये विकसित केली. ग्रंथपालांनी ग्रंथालयमिती पद्धती विकसित करायला पाहिजे असे त्यांचे मत होते. ग्रंथालयमिती ही ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाचे संख्यात्मक पृथक्करण करते. प्रलेखांचा वापर, ग्रंथालय सेवक वर्ग व गंथालय उपयोजक यांच्याशी संबंधित प्रक्रियांच्या सांख्यिकी विभाजनाचा यात अभ्यास केला जातो. त्यामुळे ग्रंथालयाच्या रचनात्मक भागाबद्दल सिद्धांत तयार करता येतात.

### ३.७.३ विज्ञानमिती (Scientometrics)

विज्ञानमिती हे विज्ञानाच्या मोजणीचे व विश्लेषणाचे शास्त्र आहे. यात विज्ञानाच्या विकासाचा आणि त्याच्या प्रक्रियांचा शोध घेण्यासाठी सांख्यिकी आणि गणिती पद्धतीच्या वापरावर भर देण्यात आला आहे. विज्ञानाचे मापन आणि पृथक्करण करण्याचे शास्त्र म्हणजे विज्ञानमिती होय. विज्ञानमितीमध्ये वैज्ञानिक प्रकाशनांचे ग्रंथमतीच्या साहाय्याने मापन केले जाते (कोण्णूर आणि इतर, २००८). विज्ञानमिती हे विज्ञानाच्या मोजणीचे आणि विश्लेषणाचे शास्त्र आहे. प्रत्यक्षपणे विज्ञानाचे विश्लेषण आणि मोजणीही विज्ञानाधारित माहितीशी संबंधित असते. सध्याची प्रगत विज्ञानमिती ही मुख्यत्वे जे. डे. सोला प्राइझ आणि युजिन गारफिल्ड या दोघांच्या संशोधनावर आधारलेली पद्धती आहे. या संशोधनाचा परिपाक म्हणजे त्यानंतर गारफिल्डने त्यासाठी इन्स्टिट्यूट फॉर सायंटिफिक इन्फर्मेशन (ISI) या संस्थेची स्थापना केली. विज्ञानमितीचा संबंध विज्ञानाच्या सांख्यिकी व वैशिष्ट्यपूर्ण विश्लेषणाशी आहे. विज्ञानाचा विकासाचा आणि त्याच्या प्रक्रियांचा शोध घेण्यासाठी सांख्यिकी आणि गणिती पद्धतींच्या वापरावर भर देण्यात आला आहे (फडके, २०१२).

### ३.७.४ वेबोमेट्रिक्स (Webometrics)

वर्ल्ड वाईड वेब हा सध्याच्या युगातील परवलीचा शब्द आहे. यालाच मराठीत माहितीचे महाजाल असा समर्पक शब्द आहे. खरोखरच यावर माहितीचा महाप्रचंड साठा उपलब्ध असतो. विविध प्रकारच्या वेब साईट्समधून तो विखुरलेला असतो. अशा विशिष्ट विषयावरील वेब साईट्सचा पद्धतशीरपणे केलेला अभ्यास म्हणजे वेबोमेट्रिक्स होय. या शब्दाचा सर्वप्रथम वापर अलमिंड आणि इंगवरसन (Almind and Ingwersen) यांनी केला (Kumar, 2016). इंटरनेट हे तर माहितीजालाचे माहितीजाल आहे. त्यात सर्व विषयांवरील माहिती उपलब्ध होते. जागतिक संपर्क आणि असंख्य वाचक यामुळे इंटरनेट हे एक मोठे इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयच बनून गेले आहे. त्यातील असंख्य वेबसाईट्सचा साठा हा माहितीचा प्रचंड स्त्रोत आहे. याचा सांख्यिकीय अभ्यास हा वेबोमेट्रिक्सचा एक भाग आहे. संगणकाच्या वाढत्या प्रभावामुळे इ. स. १९९० नंतर वेबोमेट्रिक्सच्या अभ्यासाला विशेष चालना मिळाली (Shabna & Vasudevan, 2010). थोडक्यात सांगायचे झाले तर वेबोमेट्रिक्स हा माहिती स्त्रोताची संरचना व वापर यांचा केलेला सांख्यिकी अभ्यास आहे. शैक्षणिक क्षेत्रात तर वेबवर आधारित तंत्रज्ञानाचा जास्त वापर होतो. शैक्षणिक संस्थांच्या वेब साईटवर विविध विषयावरील माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात, विशेष करून खाजगी विद्यापीठांमध्ये वेबोमेट्रिक्सच्या वापराचे प्रमाण हळूहळू वाढत आहे (Kumar, 2016)

### ३.७.५ आशय विश्लेषण

ही संख्यात्मक विश्लेषणाची एक पद्धती आहे. यात दिलेल्या मजकुरात पुन्हापुन्हा आढळणाऱ्या शब्द, शब्दसमूह, संकल्पना यांच्या वारंवारितेचे पद्धतशीरपणे विश्लेषण केले जाते. पुस्तकातील/ लेखातील विशिष्ट मजकूर, शब्द, संदर्भयोग्य घटक, व्यक्तीनामे, अभिनय, छटा, पात्रे, संकल्पना इत्यादी

सर्व प्रकारच्या माहितीचे विश्लेषण केले जाते. कोणत्याही लिखित अथवा मौखिक अभिव्यक्तीद्वारे प्राप्त झालेल्या तथ्यांच्या आशयाचे वस्तुनिष्ठ व परिणामकारक वर्णन करण्यासाठी वापरण्यात येणारे संशोधन तंत्र म्हणजे आशय विश्लेषण होय. भौतिक घटनांच्या तुलनेत सामाजिक घटना या अधिक जटिल, परिवर्तनशील व अमूर्त असतात. त्यामुळे सामाजिक घटनांच्या संदर्भात निष्कर्ष काढणे व नियमांचे प्रतिपादन करणे, तुलनेने कठीण काम असते. परंतु आशय विश्लेषणाच्या साहाय्याने परिणामकारक व वस्तुनिष्ठ विश्लेषण करणे, शक्य होते. म्हणून सामाजिक संशोधनात आशय विश्लेषणाला फार महत्त्व आहे.

## ३.८ सारांश

विशिष्ट विषयाचा अभ्यास करताना अभ्यासक त्या विषयावर इतरांनी केलेल्या अभ्यासाची नोंद करत असतो. या नोंदीलाच उल्लेख म्हणतात. या उल्लेखांचा सांख्यिकीय अभ्यास म्हणजे उल्लेख विश्लेषण होय. उल्लेख विश्लेषणामुळे विशिष्ट विषयावर कोणी कोणी, काय काय अभ्यास केला आहे ते कळते. त्या अभ्यासाचे निष्कर्ष अभ्यासता येतात. त्यामुळे साहित्य निर्मितीचा प्रवाह कळतो. उल्लेख विश्लेषणाच्या अभ्यासाच्या प्राधान्यानुसार त्याच्याशी संबंधित इतरही काही संज्ञा आहेत. उदा. बिब्लिओमेट्रिक्स, सायंटोमेट्रिक्स, वेबोमेट्रिक्स इत्यादी. उल्लेख विश्लेषणाचा गंथालयात, तसेच विशिष्ट विषयाचा अभ्यास करणाऱ्यांना चांगला उपयोग होतो.

## संदर्भ


01. कायंदे—पाटील, गंगाधर (२००९), संशोधन पद्धती, आ. ५, नाशिक :चैतन्य, पृ. ५१०

02. कोण्णूर, एम. बी., कोण्णूर, सुजाता आणि माणगांवकर, उष:प्रभा (संपा.) (२००८), ग्रंथालय व माहितीशास्त्रकोश, पुणे : डायमंड, पृ. ४१०

03. फडके, द. ना. (२०१२), ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, आ. ५, पुणे : युनिव्हर्सल, पृ ४९२

04. मालशे, स. गं. (२००७), शोधनिबंधाची लेखनपद्धती, आ.३, पुणे : सुविचार, पृ. ६७

05. Garfield, Ugine (1979), Citation Indexing: It's theory and application in Science, Technology and Humanities, Philadelphia: ISI

06. Gohain, Anjan and Saikia, Mukesh (2014), Citation Analysis of Ph.D. Theses submitted to the department of Chemical Sciences, Tezpur University, Assam, *Library Philosophy and Practice (e-journal)*, paper1066, avaible at

07. http://digitalcommons.unl.edu/libphilprac/1066

08. Haque, Enamul (2012), The Journal of Poultry Science: An analysis of citation pattern, *The Eastern Librarian*, 23(1), pp. 64-73Jan, Rosy (2009), Citation Analysis of Library Trends, *Webology*, 06(1), pp. 1-9

09. Kalbande, Dattatreya Tryaambakrao and Sonawane, Shashank S. (2012), Citation Analysis of Ph.D. Theses on

Economics submitted to Dr. Babasaheb Ambedkar Matathwada University, *Electronic International Interdisciplinary Research Journal*, 01(2), pp. 17-35

10. Kumar, Jatinder (2016), Webometric Analysis of Web-domains of Private Universities of Himachal Pradesh, *Library Herald*, 54(4), pp. 459-474

11. Kuri, Ramesh and Hejje, Venugopal (2014), Citation Analysis of Pearl: A Journal of Library and Information Science, *Asian Journal of Multidisciplinary Studies,* Vol. 02, Issue 9, pp. 1-6

12. Olatokun, Wole Michael and Makinde, Olayinka (2009), Citation Analysis of Dissertations submitted to the department of Animal Science, University of Ibadan, Nigeria, *Annals of Library and Information Studies*, Vol. 56, pp. 117-128

13. Phugnar, Prashant L. (2012), A Citation Analysis of Doctoral Dissertations in Library and Information Science accepted by the Universities in Western India, *A Ph.D. thesis submitted to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune*

14. Ramesh, L.S.R.C.V and Nagaraju, A.V.S.S. (2000), Citation Analysis of the Indian Journal of Information, Library and Society, *Indian Journal of Infomation, Library and Society,* Vol. 03, Issue 3-4, pp. 171-179

15. Shabna, T. P. and Vasudevan, T. M. (2010), Webometric Analysis of websites of Library Associations in India, *ILA Bulletin*, 46(1-2), pp. 23-27

16. Thoidingjam, Purnimadevi (1994), Citation Analysis of the Ph.D. Theses in Social Sciences accepted by Gouhati University during 1970-1980, *A Ph.D. thesis submitted to Maniur University, Imphal*

17. Zavery, Parul (2013), Citation Pattern in Ph.D.Theses in library and Information Science at S.N.D.T. women's University, Mumbai during 1996-2012, *Library Herald*, 51(4), pp. 386-392

○○○

## प्रकरण चार

# तथ्य संकलन,

# विश्लेषण

# आणि

# सादरीकरण

## प्रकरण ४

# तथ्य संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण

### ४.१ प्रस्तावना

संशोधनासाठी तथ्य संकलन करावे लागते. त्याआधारे निवडलेल्या विषयावर अभ्यास करता येतो. नुसते तथ्य संकलन करून भागत नाही. तर त्याचे विश्लेषण करावे लागते. विश्लेषण म्हणजे मिळालेल्या वर्णनात्मक माहितीचे रूपांतर संख्यात्मक माहितीत करणे. त्यामुळे त्यावर प्रक्रिया करणे सोपे जाते. अशी प्रक्रिया केलेली माहिती आरेखात्मक स्वरूपात सादर करतात. त्यामुळे तिचे आकलन होण्यास मदत होते. तसेच निष्कर्ष काढणे सोपे जाते. संशोधनात तथ्यांचे संकलन केल्यानंतर त्याचे विश्लेषण व सादरीकरण करणे आवश्यक असते. जोपर्यंत विश्लेषण व सादरीकरण केले जात नाही तोपर्यंत मिळालेली माहिती अर्थहीन असते. विश्लेषण व सादरीकरणानंतर या माहितीला एक अर्थ प्राप्त होतो. ही संशोधनातील एक महत्त्वाची पायरी आहे.

### ४.१.१ तथ्यांचे विश्लेषण आणि सादरीकरणाची आवश्यकता

तथ्यांचे विश्लेषण व सादरीकरण केल्याशिवाय त्या अध्ययनातून कोणताच अर्थ काढणे शक्य होणार नाही. यासाठीच तथ्यांचे विश्लेषण व सादरीकरण आवश्यक असते.

या शिवाय, तथ्यांचे विश्लेषण व सादरीकरणाची आवश्यकता पुढील कारणांसाठी असते. (आगलावे, २०००)

(१) जुन्या संकल्पना व सिद्धांतांचे पुनर्निरीक्षण करणे आणि नवीन नियम, संकल्पना व सिद्धांत शोधून काढणे.

(२) कोणताही विषय, घटना किंवा समस्येचे कार्यकारण संबंध स्पष्ट करण्यासाठी विश्लेषण व सादरीकरण आवश्यक आहे.

(३) जोपर्यंत माहितीचे विश्लेषण व सादरीकरण केले जात नाही तोपर्यंत संशोधन विषयासंबंधी कोणत्याही सिद्धांताचे किंवा नियमाचे प्रतिपादन करता येत नाही.

(४) विश्लेषण व सादरीकरणामुळे संशोधनाचा विषय अथवा घटना याबाबतचे वस्तुनिष्ठ ज्ञान प्राप्त होते.

(५) विश्लेषण व सादरीकरणामुळे माहितीचे सांख्यिकीय रूपात रूपांतर करता येते. त्याच्यावर मापन, मोजणी, टक्केवारी अशा संख्यात्मक तंत्राद्वारे प्रक्रिया करता येतात. त्यामुळे निष्कर्ष काढण्यास मदत होते.

संकलित केलेल्या उल्लेख निर्देशांचे विश्लेषण व सादरीकरण खाली दिले आहे.

### ४.१.२ भाषानिहाय प्रबंध संख्या


**निरीक्षण :** या संशोधन अभ्यासासाठी मुंबई विद्यापीठातील इंग्रजी, हिंदी व मराठी या विषयातील प्रबंधांचे अवलोकन केले आहे. प्रस्तुत संशोधनासाठी इंग्रजी (५२ प्रबंध), हिंदी (१०५ प्रबंध) व मराठी (४८ प्रबंध) असे एकूण २०५ प्रबंध प्राप्त झाले. तक्ता क्र. ४.१ पहा.

तक्ता क्र. ४.१ : भाषानिहाय प्रबंध संख्या

| क्रमांक | भाषा | प्रबंध संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | ५२ | २५% |
| २ | हिंदी | १०५ | ५१% |
| ३ | मराठी | ४८ | २४% |
| | एकूण | २०५ | १००% |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

आलेख क्र. ४.१ : भाषानिहाय प्रबंध संख्या




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.१)

### ४.१.३ वर्ष—कालखंडनिहाय प्रबंध संख्या

**निरीक्षण :** सदर अभ्यासासाठी १९८० ते २०१२ हा कालखंड निवडला आहे. यामध्ये १९८० ते २०००, २००१ ते २०१२ व वर्ष दिलेले नाही या तीन खंडात फक्त हिंदी या विषयात जास्त संशोधन २००१ ते २०१२ मध्ये झाले.


परंतु इंग्रजी व मराठीमध्ये संशेधनात फारसा फरक पडला नाही. (तक्ता क्र. ४. २ पहा.)

तक्ता क्र. ४.२: वर्ष—कालखंडनिहाय प्रबंध संख्या

| **भाषा** | **१९८० ते २०००** | **२००१ ते २०१२** | **वर्ष दिलेले नाही** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| इंग्रजी | २४ | २७ | १ | ५२ |
| हिंदी | ३३ | ७१ | १ | १०५ |
| मराठी | २४ | २३ | १ | ४८ |
| एकूण | ८१ | १२१ | ३ | २०५ |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

आलेख क्र. ४.२ : वर्ष — कालखंडनिहाय प्रबंध संख्या




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.२)

### ४.१.४ प्रबंध—पृष्ठे : सरासरी


**निरीक्षण :** प्रस्तुत संशोधनासाठी भाषानिहाय एकूण किती पृष्ठे उपलब्ध झाली, तसेच, त्यांची सरासरी किती संख्या आहे, याचा इथे विचार केलेला आहे. शिवाय, एकत्रित प्रबंधांची प्रति प्रलेख सरासरी किती पृष्ठसंख्या आहे त्याचा इथे शोध घेतला आहे. तक्ता क्र. ४.३ पहा.

तक्ता क्र. ४.३ : प्रबंध—पृष्ठे : सरासरी

| क्रमांक | भाषा | प्रबंध संख्या | पृष्ठ संख्या | सरासरी |
|---|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | ५२ | ६३५ | १२ |
| २ | हिंदी | १०५ | ६४५ | ६ |
| ३ | मराठी | ४८ | ३०४ | ६ |
| | एकूण | २०५ | १५८४ | ८ |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

आलेख क्र. ४.३ : प्रबंध—पृष्ठे : सरासरी




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.३)

वरील २०५ प्रबंधांतील ६७७२ इंग्रजी, ९९९१ हिंदी व ४४६३ मराठी अशा एकूण २१२२६ उल्लेखांचे तथ्य संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण पुढे दिलेले आहे. तसेच त्यांचे एकत्रित तथ्य संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण त्यानंतर दिले आहे.

## ४.२ तथ्य संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण : इंग्रजी भाषा

प्रस्तुत संशोधनासाठी इंग्रजी विभागात ५२ प्रबंध प्राप्त झाले. त्यातून ६७७२ उल्लेख प्राप्त झालेल्या माहितीच सविस्तर सादरीकरण प्रस्तुत केले आहे.

### ४.२.१ लेखक—प्रकार : इंग्रजी

प्राप्त संकलनानुसार लेखकाच्या योगदानाबाबतची माहिती तक्ता क्र. ४.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मिळाली.


तक्ता क्र. ४.४ : लेखक—प्रकार : इंग्रजी

| एक लेखक | दोन लेखक | तीन लेखक | तीनहून जास्त लेखक | अनामिक लेखक | स्व—लेखक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ५८१७ | ५३५ | ५६ | ४२ | ३२२ | ० | ६७७२ |
| ८५.८९ % | ७.९० % | ०.८२ % | ०.६२ % | ४.७७ % | ० | १०० % |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण** : यावरून असे दिसते की प्रस्तुत संशोधनासाठी उपलब्ध झालेल्या प्रबंधात संदर्भाच्या दृष्टीने एक लेखकाचा जास्त वापर ५८१७ (८५.८९%) करण्यात आला आहे. त्या खालोखाल दोन लेखक — ५३५ (७.९०%), तीन लेखक — ५६ (०.८२%), तीनपेक्षा जास्त लेखक — ४२ (०.६२%) यांचा संदर्भ देण्यात आला आहे. अनामिक लेखकांच्या संदर्भाची संख्यादेखील लक्षणीय — ३२२ (४.७७%) आहे. स्व—लेखकांच्या संदर्भांची संख्या मात्र शून्य आहे.

आलेख क्र. ४.४ : लेखक—प्रकार : इंग्रजी




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.४)

### ४.२.२ भौगोलिक स्थान संदर्भ : इंग्रजी

प्राप्त संकलनानुसार भौगोलिक स्थान संदर्भांच्या योगदानाबाबतची माहिती . तक्ता क्र. ४.५ मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.५ : भौगोलिक स्थान संदर्भ : इंग्रजी


| **भारतीय** | **परदेशी** | **निश्चित स्थान नाही** | **एकूण** |
|---|---|---|---|
| ९९४ | ४१०३ | १६७५ | ६७७२ |
| १४.६७ % | ६०.५८ % | २४.७५ % | १००% |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण :** या निकषाद्वारे संशोधकांनी आपापल्या संशोधनासाठी कोणत्या विविध ठिकाणी प्रकाशित उल्लेखांचा वापर केला आहे ते अभ्यासले आहे. त्यासाठी भारतीय व विदेशी असे दोन पर्याय उपलब्ध झाले. काही संदर्भांना प्रकाशन स्थळ नव्हते. त्यांची वेगळी नोंद घेण्यात आली आहे.

प्राप्त संकलनावरून असे दिसते की संशोधकांनी आपल्या संशोधनात सर्वाधिक विदेशी — ४१०३ (६०.५८%) उल्लेखांचा वापर केला आहे. तसेच भारतीय उल्लेखांचा वापर — ९९४ (१४.६७%) त्याखालोखाल करण्यात आला आहे. स्थळ नमूद नसलेल्या संदर्भांची संख्या — १६७५ (२४.७५%) इतकी लक्षणीय आहे.

आलेख क्र. ४.५ : भौगोलिक स्थान संदर्भ : इंग्रजी




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.५)

### ४.२.३ माध्यम पद्धतीचा वापर : इंग्रजी

प्राप्त संकलनानुसार माध्यम पद्धतीच्या वापराबाबतची माहिती तक्ता क्र. ४. ६ मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.६ : माध्यम पद्धतीचा वापर : इंग्रजी


| मुद्रित—उल्लेख | इंटरनेट उल्लेख | एकूण |
|---|---|---|
| ६५९२ | १८० | ६७७२ |
| ९७.३४% | २.६६% | १०० % |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण :** या निकषाद्वारे संशोधकांनी मुद्रित उल्लेख किती वापरले आहेत व इंटरनेटवरील किती उल्लेख वापरले आहेत याचा शोध घेण्यात आला आहे.

प्राप्त संकलनानुसार संशोधकांनी सर्वाधिक उल्लेख हे मुद्रित स्वरुपातील — ६५९२ (९७.३४%) वापरले असून सर्वात कमी उल्लेख हे इंटरनेट स्वरुपातील — १८० (२.६६%) इतके वापरले आहेत.

आलेख क्र. ४.६ : माध्यम पद्धतीचा वापर : इंग्रजी




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.६)

**४.२.४ प्रलेख—प्रकार : इंग्रजी**

प्राप्त संकलनानुसार प्रलेख—प्रकारातील उल्लेखांची माहिती तक्ता क्र. ४.७ मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.७ : प्रलेख—प्रकार : इंग्रजी


| ग्रंथ | नियत कालिक | प्रबंध | परिषद वृत्तांत | अहवाल | अप्रकाशित | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५०७० | १३९८ | ०१ | ०५ | १० | ०७ | २८१ | ६७७२ |
| ७४. ८६% | २०.६४ % | ०. ०१% | ०.०७% | ०.१४% | ०.१०% | ४. १८% | १००% |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण :** या निकषाद्वारे संशोधकांनी कोणत्या प्रकारचे वाचनसाहित्य वापरले आहे याचा शोध घेण्यात आला आहे.

प्राप्त संकलनानुसार संशोधकांनी सर्वाधिक वाचनसाहित्य ग्रंथ — ५०७० (७४.८६%) या प्रकारातील वापरले आहे. त्याखालोखाल नियतकालिक — १३९८ (२०.६४%), अहवाल — १० (०.१४%), अप्रकाशित — (०.१०%), परिषद वृत्तांत — ०५ (०.०७%) असून सर्वात कमी प्रबंध — ०१ (०.०१%) या प्रकारातील वापरले आहे. इतर उल्लेखांची संख्या — २८१ (४.१८%) इतकी आहे.

आलेख क्र. ४.७ : प्रलेख प्रकार : इंग्रजी




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.७)

### ४.२.५ प्रकाशन वर्ष संदर्भ : इंग्रजी

प्राप्त संकलनानुसार प्रकाशन वर्ष संदर्भांच्या योगदानाबाबतची माहिती तक्ता क्र. ४.८ मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.८ : प्रकाशन वर्ष संदर्भ : इंग्रजी


| १९०० व त्या पूर्वी | १९०१ ते १९२० | १९२१ ते १९४० | १९४१ ते १९६० | १९६१ ते १९८० | १९८१ ते २००० | २००१ व त्या नंतर | वर्ष दिलेले नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९६ | ८९ | १७६ | ४४३ | १८९१ | ३३६३ | ४६५ | २४९ | ६७७२ |
| १. ४१% | १. ३१% | २. ५९% | ६. ५४% | २७. ९२% | ४९. ६६% | ६. ८६% | ३. ७१% | १००% |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण :** या निकषाद्वारे संशोधकांनी वापरलेल्या संदर्भांचे वर्ष कोणते आहे याचा शोध घेण्यात आला आहे.

प्राप्त संकलनानुसार संशोधकांनी सर्वाधिक संदर्भ इ.स. १९८१ ते २००० – ३३६३ (४९.६६%) या कालखंडातील दिलेले आहेत. त्या खालोखाल इ.स. १९६१ ते १९८० – १८९१ (२७.९२%), इ.स. २००१ व त्यानंतर – ४६५ (६.८६%), इ.स. १९२१ ते १९४० – १७६ (२.५९%) व इ.स. १९०० व त्यापूर्वी ९६ (१.४१%)यांचा क्रम लागतो. वर्ष दिलेले नाही या निकषाचे – २४९ (३.७१%) इतके उल्लेख आहेत. सर्वात कमी संदर्भ इ. स. १९०१ ते १९२० – ८९ (१.३१%) या कालखंडातील वापरले आहेत

आलेख क्र. ४.८ : प्रकाशन वर्ष संदर्भ : इंग्रजी




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.८)

## ४.३ तथ्य संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण : हिंदी भाषा

प्रस्तुत संशोधनासाठी हिंदी विषयात १०५ प्रबंध प्राप्त झाले. त्यातून प्राप्त झालेल्या ९९९१ उल्लेखांचे तथ्य संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण केले आहे.

### ४.३.१ लेखक—प्रकार : हिंदी

प्राप्त संकलनानुसार लेखक—प्रकाराच्या योगदानाबाबतची माहिती तक्ता क्र. ४.९ मध्ये नमूद केली आहे.


तक्ता क्र. ४.९ : लेखक—प्रकार : हिंदी

| एक लेखक | दोन लेखक | तीन लेखक | तीनहून जास्त लेखक | अनामिक लेखक | स्व—लेखक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ८४६२ | २०४ | १७ | १ | १३०७ | ० | ९९९१ |
| ८४.६९% | २.०४% | ०.१७% | ०.०१% | १३.०९% | ० | १००% |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण :** यावरून असे दिसते की प्रस्तुत संशोधनासाठी उपलब्ध झालेल्या प्रबंधात संदर्भाच्या दृष्टीने एक—लेखकाचा जास्त वापर ८४६२ (८४.६९%) करण्यात आला आहे. त्या खालोखाल दोन लेखक — २०४ (२.०४%), तीन लेखक — १७ (०.१७%), तीनपेक्षा जास्त लेखक — १ (०.०१%) यांचा संदर्भ देण्यात आला आहे. अनामिक लेखकांच्या संदर्भाची संख्यादेखील लक्षणीय — १३०७ (१३.०९%) आहे. स्व—लेखकांच्या संदर्भांची संख्या मात्र शून्य आहे.

आलेख क्र. ४.९ : लेखक—प्रकार : हिंदी




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.९)

### ४.३.२ भौगोलिक स्थान संदर्भ : हिंदी

प्राप्त संकलनानुसार भौगोलिक स्थान संदर्भांच्या योगदानाबाबतची माहिती तक्ता क्र. ४.१० मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.१० : भौगोलिक स्थान संदर्भ : हिंदी

| **भारतीय** | **विदेशी** | **निश्चित स्थान नाही** | **एकूण** |
|---|---|---|---|
| ४६०७ | १४७ | ५२३७ | ९९९१ |
| ४६.११% | १.४७% | ५२.४२% | १०० % |


(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण :** या निकषाद्वारे संशोधकांनी आपापल्या संशोधनासाठी कोणत्या विविध ठिकाणी प्रकाशित उल्लेखांचा वापर केला आहे ते अभ्यासले आहे.

त्यासाठी भारतीय व विदेशी असे दोन पर्याय उपलब्ध झाले. काही संदर्भांना प्रकाशन स्थळ नव्हते. त्यांची वेगळी नोंद घेण्यात आली आहे.

प्राप्त संकलनावरून असे दिसते की संशोधकांनी आपल्या संशोधनात सर्वाधिक निश्चित स्थान नाही – ५२३७ (५२.४२%)उल्लेखांचा वापर केला आहे. तसेच भारतीय उल्लेखांचा वापर – ४६०७ (४६.११%) त्याखालोखाल करण्यात आला आहे. विदेशी संदर्भांची संख्या – १४७ (१.४७%) इतकी आहे.

आलेख क्र ४.१० : भौगोलिक स्थान संदर्भ : हिंदी




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.१०)

### ४.३.३ माध्यम पद्धतीचा वापर : हिंदी

प्राप्त संकलनानुसार माध्यम पद्धतीच्या वापराबाबतची माहिती तक्ता क्र. ४.११ मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.११ : माध्यम पद्धतीचा वापर : हिंदी.


| मुद्रित—उल्लेख | इंटरनेट उल्लेख | एकूण |
|---|---|---|
| ९९९० | ०१ | ९९९१ |
| ९९.९८% | ०.०२% | १०० टक्के |

(स्त्रोत :तथ्य संकलन)

**निरीक्षण :** या निकषाद्वारे संशोधकांनी मुद्रित उल्लेख किती वापरले आहेत व इंटरनेट वरील किती उल्लेख वापरले आहेत याचा शोध घेण्यात आला आहे.

प्राप्त संकलनानुसार संशोधकांनी सर्वाधिक उल्लेख हे मुद्रित स्वरुपातील — ९९९० (९९.९८%) वापरले असून सर्वात कमी उल्लेख हे इंटरनेट स्वरुपातील — ०१ (०.०२%) इतके वापरले आहेत.

आलेख क्र. ४.११ : माध्यम पद्धतीचा वापर : हिंदी




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.११)

### ४.३.४ प्रलेख—प्रकार : हिंदी

प्राप्त संकलनानुसार प्रलेख—प्रकारातील उल्लेखाची माहिती तक्ता क्र. ४.१२ मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.१२ : प्रलेख—प्रकार : हिंदी


| ग्रंथ | नियतकालिक | प्रबंध | परिषद वृत्तांत | अहवाल | अप्रकाशित | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८२४२ | ११०५ | ७८ | ०९ | ६७ | ० | ४९० | ९९९१ |
| ८२.५१% | ११.०५% | ०.७८% | ०.०९% | ०.६७% | ० | ४.९०% | १०० टक्के |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण :** या निकषाद्वारे संशोधकांनी कोणत्या प्रकारचे वाचनसाहित्य वापरले आहे याचा शोध घेण्यात आला आहे.

प्राप्त संकलनानुसार संशोधकांनी सर्वाधिक वाचनसाहित्य ग्रंथ — ८२४२ (८२.५१%) या प्रकारातील वापरले आहेत. त्या खालोखाल नियतकालिक— ११०५ (११.०५%), इतर— ४९० (४.९०%), प्रबंध— ७८(०.७८%), अहवाल— ६७ (०.६७%) या वाचनसाहित्य प्रकाराचा वापर झालेला आहे. सर्वात कमी संदर्भ परिषद वृत्तांत — ०९ (०.०९%) या प्रकारातील वापरले आहे. अप्रकाशित वाचनसाहित्याचा आजिबात वापर झालेला नाही.

आलेख क्र. ४.१२ : प्रलेख–प्रकार : हिंदी




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.१२)

### ४.३.५ प्रकाशन वर्ष संदर्भ : हिंदी

प्राप्त संकलनानुसार प्रकाशन वर्ष संदर्भांच्या योगदानाबाबतची माहिती तक्ता क्र. ४.१३ मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.१३ : प्रकाशन वर्ष संदर्भ : हिंदी


| १९०० व त्या पूर्वी | १९०१ ते १९२० | १९२१ ते १९४० | १९४१ ते १९६० | १९६१ ते १९८० | १९८१ ते २००० | २००१ व त्या नंतर | वर्ष दिलेले नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | २० | ५४ | ३६५ | १२७९ | १९१२ | ८१० | ५५३२ | ९९९१ |
| ०.१९% | ०.२०% | ०.५४% | ३.६५% | १२.८०% | १९.१३% | ८.१०% | ५५.३९% | १०० % |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण :** या निकषाद्वारे संशोधकांनी वापरलेल्या संदर्भांचे वर्ष कोणते आहे याचा शोध घेण्यात आला आहे.

प्राप्त संकलनानुसार संशोधकांनी सर्वाधिक संदर्भ प्रकाशन वर्ष न दिलेले — ५५३२ (५५.३९%) या कालखंडातील आहेत. त्या खालोखाल इ.स. १९८१ ते २०००— १९१२ (१९.१३%), इ.स. १९६१ ते १९८०— १२७९ (१२.८०%), इ.स. २००१ व त्या नंतर— ८१० (८.१०%), इ.स. १९४१ ते १९६०— ३६५ (३.६५%), इ.स. १९२१ ते १०४०— ५४ (०.५४%) व इ. स. १९०१ ते १९२०— २० (०.२०%) या कालखंडातील संदर्भांचा वापर करण्यात आलेला आहे. सर्वात कमी संदर्भ इ.स. १९०० व त्यापूर्वी— १९ (०.१९%) या कालांडातील वापरले आहेत.

आलेख क्र. ४.१३ : प्रकाशन वर्ष संदर्भ : हिंदी




(स्रोत : तक्ता क्र. ४.१३)

## ४.४ तथ्य संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण : मराठी भाषा

प्रस्तुत संशोधनासाठी मराठी विषयात ४८ प्रबंध प्राप्त झाले. त्यातून प्राप्त झालेल्या माहितीचे सादरीकरण पुढे केले आहे.

### ४.४.१ लेखक—प्रकार : मराठी

प्राप्त संकलनानुसार लेखकाच्या योगदानाबाबतची माहिती तक्ता क्र. ४.१४ मध्ये नमूद केली आहे.


तक्ता क्र. ४.१४ : लेखक—प्रकार : मराठी

| **एक लेखक** | **दोन लेखक** | **तीन लेखक** | **तीनहून जास्त लेखक** | **अनामिक लेखक** | **स्व—लेखक** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| ३६०९ | १२५ | १७ | १७ | ६९३ | २ | ४४६३ |
| ८०.८६% | २.८२% | ०.३८% | ०.३८% | १५.५२% | ०.०४% | १००% |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण :** यावरून असे दिसते की प्रस्तुत संशोधनासाठी उपलब्ध झालेल्या प्रबंधात संदर्भाच्या दृष्टीने एक—लेखकाचा जास्त वापर ३६०९ (८०.८६%) करण्यात आला आहे. त्या खालोखाल अनामिक लेखक — ६९३ (१५.५२%), दोन—लेखक — १२५ (२.८२%), तीन व तीनपेक्षा जास्त लेखक — १७ (०.३८%) प्रत्येकी यांचा संदर्भ देण्यात आला आहे. स्व—लेखकांच्या संदर्भांची संख्या मात्र नगण्य ०२ (०.०४%) आहे.

आलेख क्र. ४.१४ : लेखक—प्रकार : मराठी




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.१४)

### ४.४.२ भौगोलिक स्थान संदर्भ : मराठी

प्राप्त संकलनानुसार भौगोलिक स्थान संदर्भांच्या योगदानाबाबतची माहिती तक्ता क्र. ४.१५ मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.१५ : भौगोलिक स्थान संदर्भ : मराठी

| **भारतीय** | **विदेशी** | **निश्चित स्थान नाही** | **एकूण** |
|---|---|---|---|
| २७६० | ९३ | १६१० | ४४६३ |
| ६१.८५% | २.०८% | ३६.०७% | १००% |


(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण** : या निकषाद्वारे संशोधकांनी आपापल्या संशोधनासाठी कोणत्या विविध ठिकाणी प्रकाशित उल्लेखांचा वापर केला आहे ते अभ्यासले आहे.

त्यासाठी भारतीय व विदेशी असे दोन पर्याय उपलब्ध झाले. काही संदर्भांना प्रकाशन स्थळ नव्हते. त्यांची वेगळी नोंद घेण्यात आली आहे.

प्राप्त संकलनावरून असे दिसते की संशोधकांनी आपल्या संशोधनात सर्वाधिक भारतीय – २७६०(६१.८५%) उल्लेखांचा वापर केला आहे. तसेच निश्चित स्थान नाही या पर्यायाचा त्या खालोखाल – १६१०(३६.०७%) वापर करण्यात आला आहे. विदेशी संदर्भांची संख्या – ९३ (२.०८%) इतकी नगण्य आहे.

आलेख क्र. ४.१५ : भौगोलिक स्थान संदर्भ : मराठी




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.१५)

### ४.४.३ माध्यम पद्धतीचा वापर : मराठी

प्राप्त संकलनानुसार माध्यम पद्धतीच्या वापराबाबतची माहिती तक्ता क्र. ४. १६ मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.१६ : माध्यम पद्धतीचा वापर : मराठी


| मुद्रित—उल्लेख | अंकीय उल्लेख | एकूण |
|---|---|---|
| ४४५४ | ९ | ४४६३ |
| ९९.७९% | ०.२१% | १००% |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण :** या निकषाद्वारे संशोधकांनी मुद्रित उल्लेख किती वापरले आहेत व अंकीय उल्लेख किती वापरले आहेत याचा शोध घेण्यात आला आहे.

प्राप्त संकलनानुसार संशोधकांनी सर्वाधिक उल्लेख हे मुद्रित स्वरुपातील — ४४५४ (९९.७९%) वापरले असून सर्वात कमी उल्लेख हे अंकीय स्वरूपातील — ०९(०.२१%) इतके वापरले आहेत.

आलेख क्र. ४.१६ : माध्यम पद्धतीचा वापर : मराठी




(स्त्रोत : तक्ता क्र.४.१६)

### ४.४.४ प्रलेख—प्रकार : मराठी

प्राप्त संकलनानुसार प्रलेख—प्रकारातील उल्लेखाची माहिती तक्ता क्र. ४.१७ मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.१७ : प्रलेख—प्रकार : मराठी


| **ग्रंथ** | **नियतकालिक** | **प्रबंध** | **परिषद वृत्तांत** | **अहवाल** | **अप्रकाशित** | **इतर** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३६०९ | ६६४ | ६८ | ० | ० | ० | १२२ | ४४६३ |
| ८०.८६% | १४.८९% | १.५२% | ० | ० | ० | २.७३% | १००% |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण :** या निकषाद्वारे संशोधकांनी कोणत्या प्रकारचे वाचनसाहित्य वापरले आहे याचा शोध घेण्यात आला आहे.

प्राप्त संकलनानुसार संशोधकांनी सर्वाधिक वाचनसाहित्य ग्रंथ — ३६०९(८०.८६%) या प्रकारातील वापरले असून त्या खालोखाल नियतकालिक ६६४ (१४.८९%), इतर १२२ (२.७३%) व प्रबंध — ६८ (१.५२%) यांचा क्रमांक लागतो. परिषद वृत्तांत, अहवाल व अप्रकाशित यांचे स्थान ०% प्रत्येकी इतके नगण्य आहे.

आलेख क्र. ४.१७ : प्रलेख—प्रकार : मराठी




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.१७)

### ४.४.५ प्रकाशन वर्ष संदर्भ : मराठी

प्राप्त संकलनानुसार प्रकाशन वर्ष संदर्भांच्या योगदानाबाबतची माहिती तक्ता क्र. ४.१८ मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.१८ : प्रकाशन वर्ष संदर्भ : मराठी


| **१९०० व त्या पूर्वी** | **१९०१ ते १९२०** | **१९२१ ते १९४०** | **१९४१ ते १९६०** | **१९६१ ते १९८०** | **१९८१ ते २०००** | **२००१ व त्या नंतर** | **वर्ष दिलेले नाही** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५८ | ५७ | १५६ | ३९७ | ११८५ | १४८९ | २२५ | ८९६ | ४४६३ |
| १.२९% | १.२७% | ३.४९% | ८.८९% | २६.५५% | ३३.३६% | ५.०८% | २०.०७% | १००% |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण :** या निकषाद्वारे संशोधकांनी वापरलेल्या संदर्भांचे वर्ष कोणते आहे याचा शोध घेण्यात आला आहे.

प्राप्त संकलनानुसार संशोधकांनी सर्वाधिक संदर्भ इ.स. १९८१ ते २००० — १४८९(३३.३६%) या कालखंडातील दिलेले असून त्या खालोखाल इ.स. १९६१ ते १९८० — ११८५ (२६.५५%), वर्ष न दिलेले — ८९६ (२०.०७%), इ.स. १९४१ ते १९६० — ३९७ (८.८९%), इ.स. २००१ व त्या नंतर — २२५ (५.०८%), इ.स. १९२१ ते १९४० — १५६ (३.४९%) व इ.स.१९०० व त्या पूर्वी — ५८(१.२९%) या कालखंडातील दिलेले आहेत. सर्वात कमी संदर्भ इ.स. १९०१ ते १९२० — ५७ (१.२७%) या कालखंडातील वापरले आहेत

आलेख क्र. ४.१८ : प्रकाशन वर्ष संदर्भ : मराठी




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.१८)

## ४.५ तथ्य संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण : एकत्रित

प्रस्तुत संशोधनासाठी इंगंजी, हिंदी व मराठी या तिन्ही भाषा मिळून एकत्रित २०५ प्रबंध प्राप्त झाले. त्यातून प्राप्त झालेल्या माहितीचे सादरीकरण पुढे केले आहे.

### ४.५.१ लेखक—प्रकार : एकत्रित

प्राप्त संकलनानुसार लेखकाच्या योगदानाबाबतची माहिती तक्ता क्र. ४. १९ मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.१९ : लेखक प्रकार : एकत्रित


| **एक लेखक** | **दोन लेखक** | **तीन लेखक** | **तीनहून जास्त लेखक** | **अनामिक लेखक** | **स्व—लेखक** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| १७८८८ | ८६४ | ९० | ६४ | २३१८ | ०२ | २१२२६ |
| ८४. २६१% | ४. ०७०% | ०. ४२०% | ०. ३००% | १०. ९४०% | ०.००९% | १००% |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण :** यावरून असे दिसते की प्रस्तुत संशोधनासाठी उपलब्ध झालेल्या प्रबंधात संदर्भाच्या दृष्टीने एक—लेखकाचा जास्त वापर १७८८८ (८४.२६१%) करण्यात आला आहे. त्या खालोखाल अनामिक लेखक — २३१८ (१०. ९४०%), दोन—लेखक — ८६४ (४.०७०%), तीन व तीनपेक्षा जास्त

लेखक – ६४ (०.३००%) यांचा संदर्भ देण्यात आला आहे. स्व–लेखकांच्या संदर्भांची संख्या मात्र नगण्य ०२ (०.००९%) आहे.

आलेख क्र. ४.१९ : लेखक–प्रकार : एकत्रित




(स्त्रोत : तक्ता क्र.४.१९)

### ४.५.२ भौगोलिक स्थान संदर्भ : एकत्रित

प्राप्त संकलनानुसार स्थान संदर्भांच्या योगदानाबाबतची माहिती तक्ता क्र. ४.२० मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.२० : भौगोलिक स्थान संदर्भ : एकत्रित


| **भारतीय** | **विदेशी** | **निश्चित स्थान नाही** | **एकूण** |
|---|---|---|---|
| ८३६१ | ४३४३ | ८५२२ | २१२२६ |
| ३९.३९% | २०.४६% | ४०.१५% | १००% |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण :** या निकषाद्वारे संशोधकांनी आपापल्या संशोधनासाठी कोणत्या विविध ठिकाणी प्रकाशित उल्लेखांचा वापर केला आहे, ते अभ्यासले आहे. त्यासाठी भारतीय व विदेशी असे दोन पर्याय उपलब्ध झाले. काही संदर्भांना प्रकाशन स्थळ नव्हते. त्यांची वेगळी नोंद घेण्यात आली आहे.

प्राप्त संकलनावरून असे दिसते की संशोधकांनी आपल्या संशोधनात, ज्यांचे प्रकाशन स्थान नमूद केलेले नाही अशा उल्लेखांचा सर्वाधिक ८५२२ (४०.१५%) उल्लेखांचा वापर केला आहे. त्या खालोखाल भारतातील प्रकाशित संदर्भांचा उल्लेख ८३६१— (३९.३९%) केलेला आहे. विदेशी संदर्भांची संख्या — ४३४३ (२०.४६%) इतकी आहे.

आलेख क्र. ४.२० : भौगोलिक स्थान संदर्भ : एकत्रित




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.२०)

### ४.५.३ माध्यम पद्धतीचा वापर : एकत्रित

प्राप्त संकलनानुसार माध्यम पद्धतीच्या वापराबाबतची माहिती तक्ता क्र. ४.२१ मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.२१ : माध्यम पद्धतीचा वापर : एकत्रित


| मुद्रित—उल्लेख | अंकीय उल्लेख | एकूण |
|---|---|---|
| २१०३६ | १९० | २१२२६ |
| ९९.१०% | ०.९०% | १००% |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण :** या निकषाद्वारे संशोधकांनी मुद्रित उल्लेख किती वापरले आहेत व अंकीय उल्लेख किती वापरले आहेत याचा शोध घेण्यात आला आहे.

प्राप्त संकलनानुसार संशोधकांनी सर्वाधिक उल्लेख हे मुद्रित स्वरुपातील (मुद्रित उल्लेख) — २१०३६(९९.१०%) वापरले असून सर्वात कमी उल्लेख हे अंकीय उल्लेख — १९०(०.९०%) इतके वापरले आहेत.

आलेख क्र. ४.२१ : माध्यम पद्धतीचा वापर : एकत्रित




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.२१)

### ४.५.४ प्रलेख—प्रकार : एकत्रित

प्राप्त संकलनानुसार प्रलेख प्रकाराच्या वापराची माहिती तक्ता क्र. ४.२२ मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.२२ : प्रलेख—प्रकार : एकत्रित


| ग्रंथ | नियत कालिक | प्रबंध | परिषद वृत्तांत | अहवाल | अप्रकाशित | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १६९२१ | ३१६७ | १४७ | १४ | ७७ | १५ | ८८५ | २१२२६ |
| ७९. ७१% | १४.९२% | ०. ६९% | ०. ०६% | ०. ३६% | ०.०७% | ४. १९% | १००% |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण :** या निकषाद्वारे संशोधकांनी कोणत्या प्रकारचे वाचनसाहित्य वापरले आहे  याचा शोध घेण्यात आला आहे.

प्राप्त संकलनानुसार संशोधकांनी सर्वाधिक वाचनसाहित्य ग्रंथ — १६९२१ (७९.७१%) या प्रकारातील वापरले असून त्या खालोखाल नियतकालिक ३१६७ (१४.९२%), इतर ८८५ (४.१९%) व प्रबंध — १४७ (०.६९%) यांचा क्रमांक लागतो. अहवाल ७७ (०.३६%), अप्रकाशित १५ (०.०७%) व परिषद वृत्तांत १४ (०.०६%) यांचे स्थान  त्या नंतर आहे.

आलेख क्र. ४.२२ : प्रलेख—प्रकार : एकत्रित




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.२२)

### ४.५.५ प्रकाशन वर्ष संदर्भ : एकत्रित

प्राप्त संकलनानुसार प्रकाशन वर्ष संदर्भांच्या योगदानाबाबतची माहिती तक्ता क्र.४.२३ मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. ४.२३ : प्रकाशन वर्ष संदर्भ : एकत्रित


| १९०० व त्या पूर्वी | १९०१ ते १९२० | १९२१ ते १९४० | १९४१ ते १९६० | १९६१ ते १९८० | १९८१ ते २००० | २००१ व त्या नंतर | वर्ष दिलेले नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७३ | १६६ | ३८६ | १२०५ | ४३५५ | ६७६४ | १५०० | ६६७७ | २१२२६ |
| ०.८१ | ०.७८ | १.८१ | ५.६७ | २०.५१ | ३१.८६ | ७.०६ | ३१.५० | १००% |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

**निरीक्षण** : या निकषाद्वारे संशोधकांनी वापरलेल्या संदर्भांचे वर्ष कोणते आहे याचा शोध घेण्यात आला आहे.

प्राप्त संकलनानुसार संशोधकांनी सर्वाधिक संदर्भ इ.स. १९८१ ते २००० – ६७६४ (३१.८६%) या कालखंडातील दिलेले असून त्या खालोखाल वर्ष न दिलेल्या – ६६७७ (३१.५०%), पर्यायाचा क्रमांक लागतो. त्यानंतर इ.स. १९६१ ते १९८० – ४३५५ (२०.५१%), इ.स. २००१ व त्या नंतर – १५०० (७.०६%), इ.स. १९४१ – १९६० – १२०५ (५.६७%), इ.स. १९२१ ते १९४० – ३८६ (१.८१%), इ.स.१९०० व त्या पूर्वी – १७३(१.२९%) व इ.स. १९०१ – १९२० – १६६ (०.७८) या कालखंडातील संदर्भांचा वापर केलेला आहे.

आलेख क्र. ४.२३ : प्रकाशन वर्ष संदर्भ : एकत्रित




(स्त्रोत : तक्ता क्र. ४.२३)

## ४.६ सारांश

संशोधनासाठी तथ्य संकलन आवश्यक असते. त्या तथ्यांचे विश्लेषण व सादरीकरण केले जाते. त्यामुळे संकलित तथ्यांना एक निश्चित असा अर्थ प्राप्त होतो. प्रस्तुत संशोधनासाठी इंग्रजी भाषा, हिंदी भाषा व मराठी भाषा या भाषांतील प्रबंधांच्या उल्लेखांचे संकलन केले आहे. त्यांचे भाषानिहाय व एकत्रित असे विश्लेषण व सादरीकरण केले आहे. अर्थ अधिक स्पष्ट व्हावा यासाठी आलेखांचा वापर करण्यात आला आहे.

## संदर्भ

01. आगलावे, प्रदीप (२०००), संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर : विद्या, पृ. ५०४

०००

प्रकरण पाच

# निरीक्षण,

# निष्कर्ष

# आणि

# शिफारसी

# प्रकरण पाच

# निरीक्षण, निष्कर्ष आणि शिफारसी

## ५.१ प्रस्तावना

प्रस्तुत संशोधनासाठी भाषा विभागातील माहितीचे संकलन केल्यावर तिचे विश्लेषण व सादरीकरण करण्यात आले. ते प्रकरण क्रमांक चार मध्ये पाहिले आहे. येथे त्यावरून निरीक्षण, निष्कर्ष व शिफारसी सादर केल्या आहेत.

## ५.२ निरीक्षण

(१) प्रस्तुत संशोधनासाठी उपलब्ध झालेल्या प्रबंधांचे निरीक्षण केले असता असे आढळले की इंग्रजी विषयातील १९९४ ते २०११ या १८ वर्षांतील ६० पैकी ५२ प्रबंध अभ्यासासाठी उपलब्ध झाले. हे प्रमाण ८६% इतके आहे. हिंदी विषयातील १९८० ते २०१३ या ३४ वर्षांतील ११४ पैकी १०५ प्रबंध अभ्यासासाठी उपलब्ध झाले. हे प्रमाण ९२% इतके आहे. मराठी विषयातील १९९२ ते २०१२ या २१ वर्षांतील ५३ पैकी ४८ प्रबंध अभ्यासासाठी उपलब्ध झाले. हे प्रमाण ९०% इतके आहे. म्हणजेच १९८० ते २०१३ या ३४ वर्षांतील एकूण २२७ प्रबंधंपैकी २०५ प्रबंध अभ्यासासाठी उपलब्ध झाले. हे प्रमाण ९०% इतके आहे व ते संशोधनासाठी समाधानकारक आहे. (संदर्भ : तक्ता क्र. १.१ : संशोधन लक्ष्य आणि प्रबंध निवड)

(२) प्रस्तुत संशोधनासाठी उपलब्ध झालेल्यां प्रबंधांची पृष्ठसंख्या न्याहाळली असता ती इंग्रजी— ६३५, हिंदी— ६४५ व मराठी— ३०४ अशी आढळली.

एकत्रित ही संख्या एकूण १५८४ भरते. म्हणजे प्रति प्रबंध सरासरी ८ पृष्ठे उल्लेखांसाठी वापरल्याचे लक्षात येते. (संदर्भ : तक्ता क्र. ४.३ : प्रबंध पृष्ठे सरासरी)

(३) प्रस्तुत संशोधनासाठी उपलब्ध झालेल्या प्रबंधांतील उल्लेखांची संख्या ही इंग्रजी— ६७७२, हिंदी— ९९९१ व मराठी— ४४६३ इतकी असल्याचे आढळून आले. एकत्रित ही संख्या २१२२६ इतकी होते. म्हणजे प्रति प्रबंध ही संख्या सरासरी १०३ इतकी आहे. (संदर्भ : तक्ता क्र. ४.३: प्रबंध—पृष्ठे सरासरी)

(४) पुरुष—लेखकांपेक्षा स्त्री—लेखकांचे प्रमाण जरी कमी आहे. तरी स्त्री—लेखिका संशोधनात्मक लिखाण करण्यात पुरुष—लेखकांपेक्षा फार मागे आहेत, असे दिसत नाहीत. (संदर्भ : तक्ता क्र. १.२ : स्त्री—पुरुष लेखन प्रमाण)

(५) उपलब्ध प्रबंधांचे विसावे शतक व एकविसावे शतक असे सरळसरळ दोन भाग पडलेले आहेत. पण एकविसाव्या शतकाची जी महत्त्वाची ओळख —संगणक— तिचा वापर संशोधनासाठी केलेला दिसत नाही. एकविसाव्या शतकातील प्रबंधांमध्ये तरी हे प्रमाण उल्लेखनीय असायला हवे होते. पण तसे काही आढळले नाही. म्हणजेच, संगणकाचा वापर जास्त होत नाही. (तक्ता क्र. ४.२१ : माध्यम पद्धतीचा वापर : एकत्रित)

(६) एकविसाव्या शतकात माहितीचा विस्फोट झाला आहे. माहिती वेगवेगळ्या प्रकारच्या प्रलेखांतून विखुरलेली आहे. त्यामुळे माहिती प्राप्तीचे इतर प्रकार, जसे की परिषद वृत्तांत, अप्रकाशित संशोधनात्मक लेख, पत्रव्यवहार इत्यादी, यांचा वापर झालेला दिसून येत नाही. अजूनही अभ्यासक माहितीसाठी ग्रंथांवरच अवलंबून असल्याचे निरीक्षण करता आढळून आले. (तक्ता क्र. ४. २२ : प्रलेख—प्रकार : एकत्रित)

## ५.३ निष्कर्ष

संकलित तथ्यांच्या विश्लेषणावरून पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

### ५.३.१ प्रकाशित वाचनसाहित्यावरून निष्कर्ष

१) कोणत्याही संशोधन कार्यात, लेखनात अभ्यासक साहित्याचा आढावा घेतात. संशोधन समस्येच्या संदर्भात पूर्वीच्या संशोधकांनी, अभ्यासकांनी काय संकल्पना मांडल्या याचे अनुमान येते व संशोधनातील द्विरुक्ती टळते.

२) उपयुक्त व लेखातील काही भाग संशोधकांनी वापरल्यात त्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

३) उल्लेखाचा अभ्यास केल्यास विषयातील प्रवाह व साहित्याचा दर्जा कळण्यास मदत होते.

४) सर्वसाधारण प्राथमिक माहिती स्त्रोताचा वापर, जसे नियतकालिकांमधील लेख, यांचा अभ्यासक जास्त वापर करतात. त्या खालोखाल ग्रंथाचा वापर जास्त दिसून येतो.

५) संदर्भ उल्लेखांचे फायदे अभ्यासकास, तसेच भावी अभ्यासकास पण होतात. विषयाचे आकलन होणारे साहित्य आवश्यक आहे.

६) उल्लेखांच्या अभ्यासाचे फायदे ग्रंथपालास ग्रंथ उपार्जन, अनुदानाचे योग्य प्रमाणात विभागणी व योग्य वापर, गुणात्मक उपार्जन साहित्य करणे इ. साठी होतो.

### ५.३.२ इंग्रजी भाषा निष्कर्ष

१) ५२ प्रबंधांत ६७७२ उल्लेख मिळाले. यात ८५.८९% लेखक हे मुख्य एक लेखक आहेत. त्यानंतद दोन लेखक ७.९०% आहेत. परंतु तीन व त्यापेक्षा अधिक साधारण ०. ८२% व ०.६२% आहेत. विशेष म्हणजे

अनामिक लेखकांचे उल्लेख ४.७७% आहेत. स्व—लेखक उल्लेख आढळले नाहीत.

२) इंग्रजी भाषेतील उल्लेखांचा भौगोलिक दृष्ट्या अभ्यास केल्यास असे आढळून आले की भारतीय साहित्याचा वापर फक्त १.६७% आहे. तर विदेशी साहित्याचा वापर ६०.५८% आहे. याचा अर्थ इंग्रजी भाषेच्या संशोधनात विदेशी भाषांच्या साहित्याचा जास्त उपयोग होतो. व ते दर्जेदार असावे.

३) इंग्रजी भाषेतून संशोधन करताना संशोधक अनेक माध्यमातून प्रकाशित होणाऱ्या साहित्याचा वापर करतो. परंतु असे आढळून आले की साधारण ९७. ३४% मुद्रित ग्रंथांचा उपयोग अभ्यासक करतात. तर २.६६% इतकाच इंटरनेटच्या माध्यमातून मिळालेल्या साहित्याचा वापर करतात. यावरून असे लक्षात येते की अभ्यासक माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) वापरण्यात अकुशल आहेत.

४) इंग्रजी भाषेचे संशोधक / अभ्यासक सर्वसाधारण ग्रंथांचा वापर जास्त करतात (७४.८६%). तर नियतकालिकांचा उपयोग २०.६४% करतात. इतर साहित्य प्रकारांचा उपयोग खूपच असमाधानकारक दिसून येतो.

५) अभ्यासक साहित्याचा संदर्भ देताना काही वेळा अपुरा देतात. जसे, प्रकाशन वर्ष ३.७१% (तक्ता क्र. ४.८), प्रकाशन स्थळ २४.७५% (तक्ता क्र. ४.५) किंवा जेथून संदर्भ घेतला ते स्त्रोत, पान नंबर इत्यादी. यामुळे पुढील संशोधकाला मूळ लेख पाहण्यास अडचण येते.

६) अभ्यासकांच्या १९८० ते २०१२ या अभ्यासात असे दिसून येते की अभ्यासकांनी / संशोधकांनी ४९.६६% लेखांचा / साहित्याचा वापर हा १९८० ते २००० मधील साहित्याचा वापर जास्त केला. त्या खालोखाल २७. ९२% १९६१ ते १९८०, ६.८६% २००१ नंतरची, ६.५४% १९४१ ते

१९६० या कालखंडातील आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की संशोधक त्याच्या अभ्यासाच्या पूर्वी प्रकाशित झालेले लेख तास्त वापरतो. परंतु अभ्यासात प्रचलित साहित्य (Current Literature) फक्त ६.८६% इतकाच वापर करतो. २७.४२% साहित्य हे १९६१ ते १९८१ मधील आहे की जे खूप उपयुक्त ठरते. त काही साहित्य १९०१ ते १९४० पर्यंत ४—५% जे खूपच अभिजात (Classical) आहे, त्याचा वापर केला आहे.

### ५.३.३ हिंदी भाषा निष्कर्ष

१) हिंदी भाषेत १०५ प्रबंधांतून ९९९१ साहित्य उल्लेख नमूद केले गेले.

२) हिंदी भाषेच्या संशोधनात संशोधक एक लेखक साहित्याचा सर्वात जास्त समावेश दिसतो (८४.६९%). त्या खालोखाल दोन लेखक (२.०४%), परंतु अनामिक लेखक १३.०९% आहेत. कदाचित भाषा साहित्यात अनामिक लेखक संकल्पना दिसून येत असावी. तीनहून अधिक लेखकांनी लिहिलेले लेख नगण्य आहेत.

३) हिंदी भाषेतील उल्लेखांचा भौगोलिक दृष्ट्या अभ्यास केल्यास असे आढळून आले की भारतीय साहित्याचा वापर ४६.११% आहे. तर विदेशी साहित्याचा वापर १.४७% आहे. याचा अर्थ हिंदी भाषेच्या संशोधनात विदेशी भाषांच्या साहित्याचा कमी उपयोग होतो. तसेच 'निश्चित स्थान नाही' असे उल्लेख ५२.४२% इतके आहे.

४) हिंदी भाषेतून संशोधन करताना संशोधक अनेक माध्यमातून प्रकाशित होणाऱ्या साहित्याचा वापर करतो. परंतु असे आढळून आले की साधारण ९९.९८% मुद्रित ग्रंथांचा उपयोग अभ्यासक करतात. तर ०.०२% इतकाच अंकीय माध्यमातून मिळालेल्या साहित्याचा वापर करतात. यावरून असे लक्षात

येते की अभ्यासक माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) वापरण्यात अकुशल आहेत.

५) हिंदी भाषेचे संशोधक / अभ्यासक सर्वसाधारण ग्रंथांचा वापर जास्त करतात (८२.५१%). तर नियतकालिकांचा उपयोग ११.०५% करतात. इतर साहित्य प्रकारांचा उपयोग खूपच असमाधानकारक दिसून येतो.

६) अभ्यासक साहित्याचा संदर्भ देताना काही वेळा अपुरा देतात. जसे, प्रकाशन वर्ष ५५.३९% (तक्ता क्र. ४.१३), प्रकाशन स्थळ ५२.४२% (तक्ता क्र. ४.१०) किंवा जेथून संदर्भ घेतला ते स्त्रोत, पान नंबर इत्यादी. यामुळे पुढील संशोधकाला मूळ लेख पाहण्यास अडचण येते.

७) अभ्यासकांच्या १९८० ते २०१२ या अभ्यासात असे दिसून येते की अभ्यासकांनी / संशोधकांनी १९.१३% लेखांचा / साहित्याचा वापर हा १९८१ ते २००० मधील साहित्याचा वापर जास्त केला. त्या खालोखाल १२. ८०% १९६१ ते १९८०, ८.१०% २००१ नंतरची, ३.६५% १९४१ ते १९६० या कालखंडातील आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की संशोधक त्याच्या अभ्यासाच्या पूर्वी प्रकाशित झालेले लेख जास्त वापरतो. परंतु अभ्यासात प्रचलित साहित्य (Current Literature) फक्त ८.१०% इतकाच वापर करतो. १२.८०% साहित्य हे १९६१ ते १९८० मधील आहे की जे खूप उपयुक्त ठरते. त काही साहित्य १९०१ ते १९४० पर्यंत ०.७४% जे खूपच अभिजात (Classical) आहे, त्याचा वापर केला आहे.

### ५.३.४ मराठी भाषा निष्कर्ष

१) मराठी भाषेत ४८ प्रबंधांतून ४४६३ साहित्य उल्लेख नमूद केले गेले.

२) मराठी भाषेच्या संशोधनात संशोधक एक लेखक साहित्याचा सर्वांत जास्त समावेश दिसतो (८०.८६%). त्या खालोखाल दोन लेखक (२.८२%), परंतु अनामिक लेखक १५.५२% आहेत. कदाचित भाषा साहित्यात अनामिक लेखक संकल्पना दिसून येत असावी. तीनहून अधिक लेखकांनी लिहिलेले लेख नगण्य आहेत.

३) मराठी भाषेतील उल्लेखांचा भौगोलिक दृष्ट्या अभ्यास केल्यास असे आढळून आले की भारतीय साहित्याचा वापर ६१.८५% आहे. तर विदेशी साहित्याचा वापर २.०८% आहे. याचा अर्थ मराठी भाषेच्या संशोधनात विदेशी भाषांच्या साहित्याचा कमी उपयोग होतो. तसेच 'निश्चित स्थान नाही' असे उल्लेख ३६.०७% इतके आहे.

४) मराठी भाषेतून संशोधन करताना संशोधक अनेक माध्यमातून प्रकाशित होणाऱ्या साहित्याचा वापर करतो. परंतु असे आढळून आले की साधारण ९९.७९% मुद्रित ग्रंथांचा उपयोग अभ्यासक करतात. तर ०.२१% इतकाच इंटरनेटच्या माध्यमातून मिळालेल्या साहित्याचा वापर करतात. यावरून असे लक्षात येते की अभ्यासक माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) वापरण्यात अकुशल आहेत.

५) मराठी भाषेचे संशोधक / अभ्यासक सर्वसाधारण ग्रंथांचा वापर जास्त करतात (८०.८६%). तर नियतकालिकांचा उपयोग १४.८९% करतात. इतर साहित्य प्रकारांचा उपयोग खूपच असमाधानकारक दिसून येतो.

६) अभ्यासक साहित्याचा संदर्भ देताना काही वेळा अपुरा देतात. जसे, प्रकाशन वर्ष २०.०७% (तक्ता क्र. ४.१८), प्रकाशन स्थळ ३६.०७% (तक्ता क्र. ४.१५) किंवा जेथून संदर्भ घेतला ते स्त्रोत, पान नंबर इत्यादी. यामुळे पुढील संशोधकाला मूळ लेख पाहण्यास अडचण येते.

७) अभ्यासकांच्या १९८० ते २०१२ या अभ्यासात असे दिसून येते की अभ्यासकांनी / संशोधकांनी ३३.३६% लेखांचा / साहित्याचा वापर हा १९८१ ते २००० मधील साहित्याचा वापर जास्त केला. त्या खालोखाल २६.५५% १९६१ ते १९८०, ८.८९% १९४१ ते १९६०, ५.०८% २००१ नंतरची या कालखंडातील आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की संशोधक त्याच्या अभ्यासाच्या पूर्वी प्रकाशित झालेले लेख जास्त वापरतो. परंतु अभ्यासात प्रचलित साहित्य (Current Literature) फक्त ५.०८०% इतकाच वापर करतो. २६.५५% साहित्य हे १९६१ ते १९८० मधील आहे की जे खूप उपयुक्त ठरते. त काही साहित्य १९०१ ते १९४० पर्यंत ४—५% जे खूपच अभिजात (Classical) आहे, त्याचा वापर केला आहे.

### ५.३.५ उद्दिष्ट आधारित निष्कर्ष

प्रस्तुत संशोधनासाठी जी उद्दिष्टे निश्चित करण्यात आली होती. त्याला अनुसरून तथ्य संकलन व विश्लेषण करण्यात आले. विश्लेषणाच्या अभ्यासावरून ध्यानात येणारे निकर्ष हे पुढे नोंदवल्याप्रमाणे आहेत.

### उद्दिष्ट क्र. १ : मुंबई विद्यापीठातील भाषा विभागातील प्रबंधांमध्ये उल्लेखासाठी वापरलेला लेखक—प्रकार अभ्यासणे

इंग्रजी भाषेचे अभ्यासक एकेकटेच लिखाण करतात. म्हणजेच संशोधनात्मक लिखाण करण्यामध्ये एक—लेखक प्रकाराचे प्रमाण जास्त आहे. त्या खालोखाल दोन—लेखक एकत्रित लिखाण करतात. याचाच अर्थ असा की संशोधनात्मक लिखाण करताना अभ्यासक परस्पर सहकार्य घेत नाहीत. त्यामुळे लेखनात एकांगीपणा जास्त जाणवतो. शिवाय, लेखकनाम न दिलेल्या उल्लेखांची संख्यासुद्धा काळजी करण्याइतपत लक्षणीय आहे. याचाच अर्थ

असा की लेखन मजकुराकडे पाहण्याची अभ्यासकांची वृत्ती फारशी गंभीर नाही.

हिंदी भाषेचे अभ्यासक एकेकटेच लिखाण करतात. त्या खालोखाल दोन–लेखक एकत्रित लिखाण करतात. याचाच अर्थ असा की संशोधनात्मक लिखाण करताना अभ्यासक परस्पर सहकार्य घेत नाहीत. त्यामुळे लेखनात एकांगीपणा जास्त जाणवतो. शिवाय, लेखकनाम न दिलेल्या उल्लेखांची संख्यासुद्धा काळजी करण्याइतपत लक्षणीय आहे. याचाच अर्थ असा की लेखन मजकुराकडे पाहण्याची अभ्यासकांची वृत्ती फारशी गंभीर नाही.

मराठी भाषेचे अभ्यासक एकेकटेच लिखाण करतात. त्या खालोखाल दोन–लेखक एकत्रित लिखाण करतात. याचाच अर्थ असा की संशोधनात्मक लिखाण करताना अभ्यासक परस्पर सहकार्य घेत नाहीत. त्यामुळे लेखनात एकांगीपणा जास्त जाणवतो. शिवाय, लेखकनाम न दिलेल्या उल्लेखांची संख्यासुद्धा काळजी करण्याइतपत लक्षणीय आहे. याचाच अर्थ असा की लेखन मजकुराकडे पाहण्याची अभ्यासकांची वृत्ती फारशी गंभीर नाही.

उपलब्ध माहितीच्या विश्लेषणावरून असा निष्कर्ष निघतो की भाषा विषयातील संशोधनात्मक लिखाणात संशोधक एक–लेखक असलेल्या प्रलेखांचे जास्त प्रमाणात उल्लेख करतात. म्हणजेच लेखक प्रकारात उल्लेख करताना एक–लेखक प्रकार जास्त वापरला जातो. अशाच प्रकारचा निष्कर्ष Bajad & Deshmukh (2014), Chikate & Patil (2008), Deshmukh (2011), Jayprakash & Kannappanavar (2015), Kalbande & Sonawane (2012), Kumar & Reddy (2013), Mishra , Gawade & Solanki (2014), Parameshwar, Goutami & Patil (2016), Singh & Bebi (2013) आणि Zaveri (2013), यांनी नमूद केलेला आहे.

**उद्दिष्ट क्र. २ : मुंबई विद्यापीठातील भाषा विभागातील प्रबंधांतील उल्लेखांचे भौगोलिक स्थान तपासणे**

इंग्रजी भाषक अभ्यासक संदर्भासाठी विदेशात प्रकाशित होणाऱ्या साहित्यावर जास्त अवलंबून राहतात. याचाच अर्थ असा की भारतात जास्त प्रमाणात साहित्य निर्मिती होत नाही. तसेच उपलब्ध साहित्य वाचकांपर्यंत कमी प्रमाणात पोहचते. शिवाय, भारतातील साहित्य प्रादेशिक भाषांमधूनसुद्धा असल्याने ते इंग्रजीच्या अभ्यासकांपर्यंत पोहचू शकत नाही. ज्यात स्थानांचा उल्लेखच नाही अशांचीही संख्या जास्त आहे. म्हणजेच स्थानांचा उल्लेख करण्याबाबत अभ्यासक फारसे गंभीर नाहीत.

हिंदी भाषक अभ्यासकांनी जास्तीत जास्त भारतातील प्रकाशनांचा वापर केला आहे. याचाच अर्थ असा की हिंदी भाषक अभ्यासकांना केवळ भारततातील प्रकाशनांचीच माहिती आहे. त्यांच्यापर्यंत केवळ भारतातीलच प्रकाशने पोहोचली आहेत. विदेशी प्रकाशनांपर्यंत पोहोचण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. व केला असल्यास तो फारच कमी पडलेला आहे.

मराठी भाषक अभ्यासकांनी जास्तीत जास्त भारतातील प्रकाशनांचा वापर केला आहे. याचाच अर्थ असा की मराठी भाषक अभ्यासकांना केवळ भारततातील प्रकाशनांचीच माहिती आहे. त्यांच्यापर्यंत केवळ भारतातीलच प्रकाशने पोहोचली आहेत. विदेशी प्रकाशनांपर्यंत पोहोचण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. व केला असल्यास तो फारच कमी पडलेला आहे. बऱ्याच अभ्यासकांना स्थान नमूद करण्याचे महत्त्व कळलेले नाही. कारण स्थान नमूद न केलेल्या उल्लेखांचे प्रमाण लक्षणीय आहे.

उपलब्ध माहितीच्या विश्लेषणावरून असे लक्षात येते की संशोधक आपल्या संशोधनात्मक लिखाणामध्ये भौगोलिक स्थान दर्शविण्याच्या बाबतीत फारसे गंभीर नाहीत. त्यामुळे बऱ्याच उल्लेखांचे भौगोलिक स्थान कळत नाही. त्या खालोखाल भारतीय प्रकाशनांचा वापर जास्त केलेला आहे.

**उद्दिष्ट क्र. ३ : मुंबई विद्यापीठातील भाषा विभागातील प्रबंधांमध्ये उल्लेखांसाठी वापरलेली माध्यम पद्धतीचा वापर अभ्यासणे**

जगभर तंत्रज्ञानाचा प्रसार होतो आहे. संगणकावरील माहिती एका क्लिकवर उपलब्ध होत आहे. पण इंग्रजी भाषेचे अभ्यासक जास्तीत जास्त मुद्रित साहित्य वापरतात. अंकीय साहित्याचा अल्प वापर करतात.

एकाचा अपवाद वगळता सर्वच अभ्यासकांनी फक्त मुद्रित साहित्याचा संदर्भासाठी वापर केलेला आढळतो. सध्याच्या संगणकीय युगातसुद्धा त्यांनी मुद्रित संदर्भ साधनांचा आधार घेतलेला दिसतो. याचाच अर्थ असा की हिंदी भाषेचे अभ्यासकांना संगणक क्षमता व संगणक वापराचे पुरेसे ज्ञान नाही. विदेशातील साहित्याशी त्यांचा पुरेसा संपर्क नाही.

एकाचा अपवाद वगळता मराठी भाषेचे सर्वच अभ्यासकांनी फक्त मुद्रित साहित्याचा संदर्भासाठी वापर केलेला आढळतो. सध्याच्या संगणकीय युगातसुद्धा त्यांनी मुद्रित संदर्भ साधनांचा आधार घेतलेला दिसतो. याचाच अर्थ असा की अभ्यासकांना संगणक क्षमता व संगणक वापराचे पुरेसे ज्ञान नाही. विदेशातील साहित्याशी त्यांचा पुरेसा संपर्क नाही.

उपलब्ध माहितीच्या विश्लेषणावरून असा निष्कर्ष निघतो की संशोधकांचा कल अजूनही मुद्रित प्रलेखांच्या अभ्यासाकडे आहे. त्यामुळे जास्तीत जास्त उल्लेख हे मुद्रित स्वरूपातील प्रलेखांमधले आहेत. तसेच अद्याप ई–प्रकाशन प्रगल्भ नाही. मात्र एकविसाव्या शतकातील प्रबंधांमधून अंकीय साहित्याचे प्रमाण वाढत आहे. Bhat & Sampathkumar (2008) यांनी देखील आपल्या अभ्यासात हाच निष्कर्ष नोंदवला आहे.

**उद्दिष्ट क्र. ४ : मुंबई विद्यापीठातील भाषा विभागातील प्रबंधांमध्ये उल्लेखासाठी वापरलेला प्रलेख—प्रकार अभ्यासणे**

माहिती मिळवण्याची अनेक साधने आहेत. त्यातून वेगवेगळ्या प्रकारची व वेगवेगळ्या दर्जाची माहिती मिळत असते. पण इंग्रजी भाषेचे अभ्यासक या साधनांच्या उपयुक्ततेबाबत आणि वापराबाबत अनभिज्ञ दिसतात. केवळ ग्रंथ या प्रकाराकडे त्यांचा जास्त कल आहे. अधिक दर्जेदार साहित्य निर्मितीसाठी त्यांनी हा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे.

माहिती मिळवण्याची अनेक साधने आहेत. त्यातून वेगवेगळ्या प्रकारची व वेगवेगळ्य दर्जाची माहिती मिळत असते. पण हिंदी भाषेचे अभ्यासक या साधनांच्या उपयुक्ततेबाबत आणि वापराबाबत अनभिज्ञ दिसतात. केवळ ग्रंथ या प्रकाराकडे त्यांचा जास्त कल आहे. अधिक दर्जेदार साहित्य निर्मितीसाठी त्यांनी हा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे.

माहिती मिळवण्याची अनेक साधने आहेत. त्यातून वेगवेगळ्या प्रकारची व वेगवेगळ्य दर्जाची माहिती मिळत असते. पण मराठी भाषेचे अभ्यासक या साधनांच्या उपयुक्ततेबाबत आणि वापराबाबत अनभिज्ञ दिसतात. केवळ ग्रंथ या प्रकाराकडे त्यांचा जास्त कल आहे. अधिक दर्जेदार साहित्य निर्मितीसाठी त्यांनी हा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे.

अद्ययावत माहितीसाठी नियतकालिक उपयुक्त ठरते. त्यामुळे संशोधनासाठी नियतकालिकांचा वापर जास्त प्रमाणात व्हायला हवा. असाच निष्कर्ष Ashraf & Jindal (2012), Bajad & Deshmukh (2014), Chikate & Patil (2008), Dash & Parida (2013), Deshmukh (2011), Haque (2012), Jayprakash & Kannappanavar (2015), Kumar & Reddy (2013), Lokhanda (2007), Olatokun & Makinde (2009), Singh & Chander (2016), Sudhier (2007), Vaidya (2017), Wilson (2012) आणि Zaveri (2013) यांनी पण

नोंदवला आहे. पण भाषा विभागातील उपलब्ध महितीच्या विश्लेषणावरून असे लक्षात येते की संशोधक ग्रंथ या प्रलेख प्रकारातील उल्लेख जास्त प्रमाणात करतात. त्यावरून असा निष्कर्ष नोंदवता येतो की संशोधक ग्रंथ हा प्रलेख प्रकार जास्त प्रमाणात वापरतात.

**उद्दिष्ट क्र. ५ : मुंबई विद्यापीठातील भाषा विभागातील प्रबंधांमधील उल्लेखांचा प्रकाशन काळ अभ्यासणे.**

इंग्रजी भाषेच्या अभ्यासकांनी आपल्या संशोधनासाठी वापरलेले संदर्भ साहित्य फार जुनेही नाही आणि फार अलीकडचेही नाही. त्यांनी मध्यम मार्ग स्वीकारला आहे. वास्तविक संशोधनात्मक लिखाणात चालू घडामोडींची माहिती देणारे वाचनसाहित्य वापरणे अपेक्षित असते. एखाद्या विषयात नवीन काय प्रगती झाली हे माहीत करून घेण्यासाठी नुकतेच प्रकाशित झालेले संशोधनात्मक लिखाण अभ्यासणे महत्त्वाचे असते. पण तसे झालेले इथे दिसत नाही.

हिंदी भाषेच्या अभ्यासकांनी आपल्या संशोधनासाठी वापरलेले संदर्भ साहित्य फार जुनेही नाही आणि फार अलीकडचेही नाही. त्यांनी मध्यम मार्ग स्वीकारला आहे. वास्तविक संशोधनात्मक लिखाणात चालू घडामोडींची माहिती देणारे वाचनसाहित्य वापरणे अपेक्षित असते. एखाद्या विषयात नवीन काय प्रगती झाली हे माहीत करून घेण्यासाठी नुकतेच प्रकाशित झालेले संशोधनात्मक लिखाण अभ्यासणे महत्त्वाचे असते. पण तसे झालेले इथे दिसत नाही.

मराठी भाषेच्या अभ्यासकांनी आपल्या संशोधनासाठी वापरलेले संदर्भ साहित्य फार जुनेही नाही आणि फार अलीकडचेही नाही. त्यांनी मध्यम मार्ग स्वीकारला आहे. वास्तविक संशोधनात्मक लिखाणात चालू घडामोडींची माहिती देणारे वाचनसाहित्य वापरणे अपेक्षित असते. एखाद्या विषयात नवीन काय प्रगती झाली हे माहीत करून घेण्यासाठी नुकतेच प्रकाशित झालेले

संशोधनात्मक लिखाण अभ्यासणे महत्त्वाचे असते. पण तसे झालेले इथे दिसत नाही.

उपलब्ध माहितीच्या विश्लेषणातून असे लक्षात येते की भाषा विभागात संशोधकांनी संदर्भ देताना मध्यम मार्ग स्वीकारला आहे. नुकतेच प्रकाशित झालेले साहित्य त्यांनी योग्य प्रमाणात अभ्यासले नाही.

**उद्दिष्ट क्र. ६ : उपलब्ध माहितीच्या विश्लेषणातून प्राप्त झालेल्या नियतकालिकांची क्रमवार यादी तयार करणे**

उपलब्ध माहितीच्या विश्लेषणावरून प्राप्त झालेल्या इंग्रजी विषयातील क्रमवार यादी परिशिष्ट क्र. ०१ (अ) यामध्ये दिलेली आहे. त्यानुसार African American Review (३१ उल्लेख) या नियतकालिकाचे स्थान यादीमध्ये प्रथम क्रमांकावर असून Triveni (०२ उल्लेख) या नियतकालिकाचे स्थान नवव्या क्रमांकावर आहे. यादीत समाविष्ट झालेल्या नियतकालिकांची एकूण संख्या ३६ इतकी आहे.

उपलब्ध माहितीच्या विश्लेषणावरून प्राप्त झालेल्या हिंदी या विषयातील क्रमवार यादी परिशिष्ट क्र. ०१ (आ) यामध्ये दिलेली आहे. त्यानुसार हंस (५३ उल्लेख) या नियतकालिकाचे स्थान यादीमध्ये प्रथम क्रमांकावर असून मनोरमा (०२ उल्लेख) या नियतकालिकाचे स्थान तेराव्या क्रमांकावर आहे. यादीत समाविष्ट झालेल्या नियतकालिकांची एकूण संख्या २१ इतकी आहे.

उपलब्ध माहितीच्या विश्लेषणावरून प्राप्त झालेल्या मराठी या विषयातील क्रमवार यादी परिशिष्ट क्र. ०१ (इ) मध्ये दिलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र टाईम्स (३३ उल्लेख) या नियतकालिकाचे स्थान यादीमध्ये प्रथम क्रमांकावर असून अभिरुची (०२ उल्लेख) या नियतकालिकाचे स्थान सोळाव्या क्रमांकावर आहे. यादीत समाविष्ट झालेल्या नियतकालिकांची एकूण संख्या ३६ इतकी आहे.

**उद्दिष्ट क्र. ७ : सर्वसाधारण संशोधनाचा प्रवाह शोधणे**

उपलब्ध माहितीच्या विश्लेषणावरून भाषांतील संशोधनाचे विविध घटक लक्षात येतात. त्यावरून सर्वसाधारण संशोधनाचा प्रवाह जाणून घेता येतो. हे घटक असे आहेत.

मुंबई विद्यापीठातील इंग्रजी, हिंदी व मराठी या तीन भाषेतून १९८० ते २०१२ पर्यंत २०५ प्रबंधांना मान्यता मिळाली. इंग्रजी ५२, हिंदी १०५ व मराठी ४८ प्रबंध या कालावधीत मान्यता झाले. हिंदी भाषेत जास्त संशोधन झाले (१०५ प्रबंध). तर इंग्रजीमध्ये ५२ प्रबंधांना मान्यता मिळाली. मराठी भाषातून संशोधनाचा कल कमी आढळला (४८ प्रबंध).

साधारणत: २००१ नंतर तिन्ही भाषांतील संशोधनात वाढ झालेली दिसून आली. १९८० ते २००० पर्यंत २० वर्षात ८१ प्रबंधांना मान्यता मिळाली. तर २००१ ते २०१२ पर्यंत १२ वर्षात १२१ प्रबंधांना मान्यता मिळाली.

तिन्ही भाषांतील २०५ प्रबंधांत एकूण उल्लेखांची संख्या २१२२६ आहे. व विषयवार उल्लेख इंग्रजी ६७७२ (५२ प्रबंध), हिदी ९९९१ (१०५ प्रबंध) व मराठी ४४६३ (४८ प्रबंध) आहेत.

सरासरी प्रत्येक भाषेतील प्रबंधातील उल्लेखांची संख्या अंदाजे १०३ आहे. तर इंग्रजीत १३०, हिंदी ९५ व मराठी ९२ आहे.

उल्लेखांचा अभ्यास करता इंग्रजी अभ्यासक जास्त उल्लेखांचा वापर प्रबंध लिहिताना करतात (१३० उल्लेख). तर हिंदी व मराठी यामध्ये अंदाजे १०० उल्लेखांपर्यंत प्रबंधात वापर केला.

संदर्भ उल्लेखांचे महत्त्व हे भाषा विषयात पण आहे हे यावरून दृष्टीगोचर होते.

## ५.४ गृहितक चाचणी

सोमण (२००८) यांच्या मते, संशोधनाला सुरवात करण्यापूर्वी अभ्यासकाला काही गृहितकांचा आधार घ्यावा लागतो. अर्थात ही गृहितके नेहमी बरोबरच असतात असे नाही. त्यांना पडताळून घेण्यासाठी माहिती संकलन करावे लागते. विश्लेषण करावे लागते. त्यावर आधारित निष्कर्ष काढले जातात. त्यावरून ते गृहितक स्वीकृत करायचे की अस्वीकृत, याचा निर्णय करावा लागतो.

प्रस्तुत संशोधनासाठी खालीलप्रमाणे गृहितके निश्चित करण्यात आली आहेत. त्यासाठी माहिती संकलित करण्यात आली असून त्याच्या विश्लेषणानंतर निष्कर्ष काढण्यात आले आहेत. त्यावरून ही गृहितके स्वीकृत करायची की अस्वीकृत, ते पुढे मांडले आहे

**१) भाषा विभागातील संशोधनामध्ये संशोधक नियतकालिकांचा वापर ग्रंथांपेक्षा जास्त प्रमाणात करतात.**

वरील गृहितकाच्या चाचणीसाठी माहिती संकलित केली असता ती खाली दिल्याप्रमाणे उपलब्ध झाली

तक्ता क्र. ५.१ : ग्रंथ—नियतकालिक वापर

| | **इंग्रजी** | **हिंदी** | **मराठी** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| **ग्रंथ** | ५०७० (७८.३८%) | ८२४२ (८८. १७%) | ३६०९ (८४.४६%) | **१६९२१** (८४.२३%) |
| **नियतकालिके** | १३९८ (२१.६२%) | ११०५ (११. ८३%) | ६६४ (१५.५४%) | **३१६७** (१५.७७%) |
| **एकूण** | **६४६८** | **९३४७** | **४२७३** | **२००८८ (१००%)** |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

वरील तक्त्याच्या अवलोकनावरून असे लक्षात येते की इंग्रजी विषयातील ग्रंथ वापराचे प्रमाण ७८.३८% असून नियतकालिक वापरचे प्रमाण २१.६२% इतके आहे. याचाच अर्थ असा की ग्रंथ वापराचे प्रमाण नियतकालिक वापराच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. म्हणजेच इंग्रजी विषयातील संशोधनामध्ये संशोधक ग्रंथांचा वापर नियतकालिकांपेक्षा जास्त प्रमाणात करतात.

हिंदी विषयातील ग्रंथ वापराचे प्रमाण ८८.१७% असून नियतकालिक वापराचे प्रमाण ११.८३% इतके आहे. याचाच अर्थ असा की ग्रंथ वापराचे प्रमाण नियतकालिक वापराच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. म्हणजेच हिंदी

विषयातील संशोधनामध्ये संशोधक ग्रंथांचा वापर नियतकालिकांपेक्षा जास्त प्रमाणात करतात.

मराठी विषयातील ग्रंथ वापराचे प्रमाण ८४.४६% असून नियतकालिक वापराचे प्रमाण १५.५४% इतके आहे. याचाच अर्थ असा की ग्रंथ वापराचे प्रमाण नियतकालिक वापराच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. म्हणजेच मराठी विषयातील संशोधनामध्ये संशोधक ग्रंथांचा वापर नियतकालिकांपेक्षा जास्त प्रमाणात करतात.

भाषा विभागाचा एकत्रित विचार केला असता असे आढळते की भाषा विभागात ग्रंथ वापराचे एकूण प्रमाण ८४.२३% असून नियतकालिक वापराचे एकूण प्रमाण १५.७७% इतके आहे. याचाच अर्थ असा की ग्रंथ वापराचे प्रमाण नियतकालिक वापराच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. म्हणजेच भाषा विभागातील संशोधनामध्ये संशोधक नियतकालिकांचा वापर ग्रंथांपेक्षा जास्त प्रमाणात करतात, हे गृहितक सिद्ध होत नाही. म्हणून ते अस्वीकृत करण्यात येते.

**२) संशोधक आपल्या संशोधनात अंकीय साहित्याचा वापर जास्त प्रमाणात करत नाहीत.**

वरील गृहितकाच्या चाचणीसाठी माहिती संकलित केली असता ती खाली दिल्याप्रमाणे उपलब्ध झाली

तक्ता क्र.५.२ : मुद्रित साहित्य व अंकीय साहित्य वापर

| | इंग्रजी | हिंदी | मराठी | एकूण |
|---|---|---|---|---|
| **मुद्रित साहित्य** | ६५९२ (९७.३४%) | ९९९० (९९.९८%) | ४४५७ (९९.८६%) | **२१०३९** (९९.११%) |
| **अंकीय साहित्य** | १८० (२.६६%) | १ (०.०२%) | ६ (०.१४%) | **१८७** (०.८९%) |
| **एकूण** | **६७७२** | **९९९१** | **४४६३** | **२१२२६** (१००%) |

(स्त्रोत : तथ्य संकलन)

वरील तक्त्याच्या अवलोकनावरून असे लक्षात येते की इंग्रजी विषयातील मुद्रित साहित्याच्या वापराचे प्रमाण ९७.३४% असून अंकीय साहित्याच्या वापराचे प्रमाण २.६६% इतके आहे. याचाच अर्थ असा की मुद्रित साहित्याच्या वापराचे प्रमाण अंकीय साहित्याच्या वापराच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. म्हणजेच इंग्रजी विषयातील संशोधनामध्ये संशोधक मुद्रित साहित्याचा वापर अंकीय साहित्यापेक्षा जास्त प्रमाणात करतात.

हिंदी विषयातील मुद्रित साहित्याच्या वापराचे प्रमाण ९९.९८% असून अंकीय साहित्याच्या वापराचे प्रमाण ०.०२% इतके आहे. याचाच अर्थ असा की मुद्रित साहित्याच्या वापराचे प्रमाण अंकीय साहित्याच्या वापराच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. म्हणजेच हिंदी विषयातील संशोधनामध्ये संशोधक मुद्रित साहित्याचा वापर अंकीय साहित्यापेक्षा जास्त प्रमाणात करतात.

मराठी विषयातील मुद्रित साहित्याच्या वापराचे प्रमाण ९९.८६% असून अंकीय साहित्याच्या वापराचे प्रमाण ०.१४% इतके आहे. याचाच अर्थ असा की मुद्रित साहित्याच्या वापराचे प्रमाण अंकीय साहित्याच्या वापराच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. म्हणजेच मराठी विषयातील संशोधनामध्ये संशोधक मुद्रित साहित्याचा वापर अंकीय साहित्यापेक्षा जास्त प्रमाणात करतात.

भाषा विभागाचा एकत्रित विचार केला असता असे आढळते की भाषा विभागात मुद्रित साहित्याच्या वापराचे एकूण प्रमाण ९९.११% असून अंकीय साहित्याच्या वापराचे एकूण प्रमाण ०.८९% इतके आहे. याचाच अर्थ असा की मुद्रित साहित्याच्या वापराचे प्रमाण अंकीय साहित्याच्या वापराच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. म्हणजेच भाषा विभागातील संशोधनामध्ये संशोधक अंकीय साहित्याचा वापर जास्त प्रमाणात करत नाही, हे गृहितक सिद्ध होते. म्हणून ते स्वीकृत करण्यात येते.

## ५.५ शिफारसी

वरील निरीक्षण व निष्कर्षांवर आधारित काही शिफारसी पुढीलप्रमाणे करण्यात येत आहेत.

### ५.५.१ संशोधकांसाठी शिफारसी

(१) भाषा विभागातील लेखक एकेकटेच लेखन करतात. त्यामुळे ते एकांगी होण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी त्यांनी एकत्रितपणे संशोधनात्मक लेखन करावे. त्यामुळे विशिष्ट गोष्टीचे अनेक पैलू विचारात घेता येतील. तसेच इतरांच्या अनुभवाचा फायदा घेता येईल. लिखाणातील त्रुटी कमी होतील. तसेच, संशोधनात्मक लेखनात जास्त भर घालता येतील.

(२) संशोधक उल्लेख देताना पुरेशा गांभिर्याने देत नाहीत. त्यमुळे विधानाची सत्यासत्यता पडताळून पाहणे त्रासदायक ठरते. यासाठी त्यांनी उल्लेख करताना शास्त्रशुद्ध व प्रमाणित पद्धतीने करायला हवा. अपुरे उल्लेख टाळायला हवेत. त्यासाठी तज्ज्ञाचे मार्गदर्शन घ्यावे. शिवाय उल्लेख करण्याच्या अनेक पद्धती वापरात आहेत. त्यांचे नियम असलेल्या पुस्तिका उपलब्ध आहेत. त्यांचा योग्य पद्धतीने वापर करायला हवा.

(३) नियतकालिकांचा वापर वाढवायला हवा. माहितीच्या या युगात अद्ययावत माहितीसाठी व त्यावर टीका—टिप्पणीसाठी नियतकालिक हे उत्कृष्ट माहिती साधन आहे.

(४) संगणकाचा दिसेदिवस वाढता वापर व उपयुक्तता लक्षात घेऊन संशोधकांनी संगणकाला पुरेसे महत्त्व देणे आवश्यक आहे. इंटरनेटचा वापर, ऑन लाईन डेटाबेस इत्यादींमुळे जागतिक स्तरावर संशोधन पोहोचेल व कमी वेळात नवनवीन साहित्य निर्मिती होत राहील.

### ५.५.२ विद्यापीठासाठी शिफारसी

(१) विद्यापीठात सर्व प्रबंध व्यवस्थित उपलब्ध होतील याची काहीही व्यवस्था नाही. तरी विद्यापीठाने विशेष मोहीम राबवून सर्व प्रबंध अभ्यासकांसाठी व्यवस्थित उपलब्ध होतील याकडे लक्ष द्यावे. विद्यापीठ ग्रंथालय यासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकेल. ग्रंथालयाद्वारे अभ्यासकाला योग्य तो प्रबंध अभ्यसासाठी उपलब्ध करून देता येईल.

(२) काही प्रबंध फारच जुने व जीर्ण झाले आहेत. ते नीटसे हाताळताही येत नाहीत. त्यांच्या जतनासाठी विद्यापीठाने पावले उचलली पाहिजेत. अशा प्रबंधांच्या डिजिटलायझेशनची व्यवस्था करण्यात यावी.

(३) विद्यापीठाच्या वेब साईटवर किंवा स्वतंत्रपणे डेटाबेस तयार करून त्यावर प्रबंध अपलोड करावेत. त्यामुळे अभ्यासकांना घरबसल्या त्या प्रबंधांचा अभ्यास करता येऊ शकेल.

## ५.६ पुढील संशोधनासाठी दिशा

(१) प्रस्तुत संशोधन हे इंग्रजी, हिंदी आणि मराठी विषयातील प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण करण्यासाठी हाती घेतले आहे. याच विषयावर तौलनिक संशोधनही करता येईल.

(२) अन्य भाषा घेऊन त्यावरही उल्लेख विश्लेषण करता येईल.

(३) प्रस्तुत संशोधनासाठी मुंबई विद्यापीठ निवडलेले आहे. असाच अभ्यास अन्य विद्यापीठ निवडूनही करता येऊ शकेल.

## ५.७ सारांश

उल्लेख विश्लेषण हे एक सांख्यिकी तंत्र आहे. याच्या साहाय्याने विशिष्ट विषयातील साहित्य निर्मिती व लेखनाचा कल जाणून घेता येतो. प्रस्तुत संशोधनातील निरीक्षण, निष्कर्ष आणि शिफारसींच्या अभ्यासाने भाषा विषयातील संशोधनाला अद्ययावत राखता येणे सहजशक्य होईल.

## संदर्भ


01. सोमण, मा. शं. (२००८), सामाजिक संशोधनाची तंत्रे, पुणे : पुणे विद्यार्थी गृह

02. Ashraf, Tariq and Jindal, Suresh (2012), Pattern of Research and Citations: A Study of University of Delhi, *Library Herald*, 50(22), pp. 6-15

03. Bajad, Rajabhau V. and Deshmukh, Prashant P. (2014), A Bibliographic Study of Ph.D. Theses awarded in the faculty of Civil Engineering and Technology, Sant Gadge Baba Amaravati University during 1994-94 to 2009-10. Conference Proceedings on *Emerging Trends, Advancements and Challenges of Academic and Public*

*Libraries*, Medhe, Ravindra et.al. (Eds.), Dhule: Atharva, pp. 223-226

04. Bhat, Veena R. and Sampathkumar, b.T. (2008), Use of web based sources in scholarly journals in the field of Library and Information Science: A Citation Analysis, *Annals of Library and Information Studies*, Vol.55, pp. 145-152

05. Chikate, R.V. and Patil, S.K. (2008), Citation Analysis of theses in LIS submitted to University of Pune: A Pilot Study, *Library Philosophy and Practice*, 1-16

06. Dash, Jitendra N. and Parida, Banan (2013), Diffusion of medical journals analysed through citations, *Annals of Library and Information Studies*, vol. 60, pp. 242-248

07. Deshmukh, Prashant P. (2011), Citations in Annals of Library and Information Studies during 1997-2010: A Study, *Annals of Library and Information Studies*, Vol. 58, pp. 355-361

08. Haque, Enamul(2012), The Journal of Poultry Science: An analysis of citation pattern, *The Eastern Librarian*, 23(1), pp. 64-73

09. Jayprakash and Kannappanavar, B.U. (20130, Citation Analysis of Doctoral Dissertations in Commerce submitted to Goa University, Goa: A Bibliometric Study,

*International Journal of Digital Library Services*, 05(2), pp. 160-177

10. Kalbande, Dattatreya Tryaambakrao and Sonawane, Shashank S. (2012), Citation Analysis of Ph.D. Theses on Economics submitted to Dr. Babasaheb Ambedkar Matathwada University, *Electronic International Interdisciplinary Research Journal*, 01(2), pp. 17-35

11. Kumar, K. and Reddy, T. Raghunatha (2013), Citation Analysis of Dissertations, *International Journal of Information Management Science*, 2/1, 33-44

12. Lokhanda, Rahul S.(2007), Citation Analysis of Doctoral Dissertations submitted to University of Pune in the subject Library and Information Science, *ILA Bulletin*, 43(2), pp. 12-18

13. Mishra, Devendra Kumar, Gawade, Manisha and Solanki, Madhu Singh (2014), Bibliometric Study of Ph.D. Theses in English, *Global Journal of Academic Librarianship*, 01(1), pp. 19-36

14. Olatokun, Wole Michael and Makinde, Olayinka (2009), Citation Analysis of Dissertations submitted to the department of Animal Science, University of Ibadan, Nigeria, *Annals of Library and Information Studies*, Vol. 56, pp. 117-128

15. Parameshwar, Goutami and Patil, D.B. (2016), Publication Trends in Library and Information Science: A

Bibliometric Analysis of Library Herald, *Library Herald*, 54(3), pp. 315-330

16. Sing, K. P. and Bebi (2013) , Citation Analysis of Ph. D. theses in Sociology submitted to University of Delhi during 1995-2010, *DESIDOC Journal of Library and Information Technology*, 33/6, 489-493

17. Singh. K.P. and Chander, Harish (2016), Publication Output of Indian Journal of Traditional Knowledge: A Bibliometric Analysis, *Library Herald*, 54(3), pp.277-289

18. Sudhier, K.G. Pillai (2007), Journal Citations in Physics Doctoral Dissertations of Indian Institute of Science, *Annals of Library and Information Studies*, Vol.54, pp. 177-184

19. Vaidya, Priya (2017), Bibliometrics of Cited References appended to Ph.D. and M.Phil. Dissertations submitted to Aligarh Muslim University in the discipline of Physics during 2010-2013, *Library Herald*, 55(4), pp. 503-514

20. Wilson, Ellen K. (2012), Citation analysis of Undergraduate Honors Theses, *The Southeastern Librarian*, 60/1, 39-50

21. Zaveri, Parul (2013), Citation Pattern in Ph.D.Theses in library and Information Science at S.N.D.T. women's University, Mumbai during 1996-2012, *Library Herald*, 51(4), pp. 386-392

○ ○ ○

# परिशिष्टे

## परिशिष्ट क्रमांक ०१ : भाषानिहाय मुख्य नियतकालिकांची यादी

### (अ) मुख्य नियतकालिकांची यादी : इंग्रजी

| अनुक्रमांक | नियतकालिकाचे नाव | उल्लेख संख्या |
|---|---|---|
| 1 | African American Review | 31 |
| 2 | The Advent | 13 |
| 3 | Critical quarterly | 11 |
| 4 | New York Times | 8 |
| 5 | The Literary Criterion | 8 |
| 6 | Times Of India | 8 |
| 7 | Contemporary Literature | 6 |
| 8 | Economic and political weekly-EPW | 6 |
| 9 | Indian literature | 6 |
| 10 | Sri Aurobindo crical | 6 |
| 11 | Annual Review of Applied Linguistics | 5 |
| 12 | Southen Review | 5 |
| 13 | The communicative approach to Language Teaching | 5 |
| 14 | The Thomas Hardy Journal | 5 |
| 15 | American Liturature | 4 |
| 16 | Language Testing | 4 |
| 17 | Linguistics and Style | 4 |
| 18 | Morden Dreama | 4 |
| 19 | The Hindu | 4 |
| 20 | Dreama Review | 3 |
| 21 | English Studies | 3 |
| 22 | English Teaching Journal | 3 |
| 23 | Journal of English Studies | 3 |
| 24 | Landon Magazine | 3 |

| | | |
|---|---|---|
| 25 | Modern Fiction Studies | 3 |
| 26 | Psychological Bulletin | 3 |
| 27 | Review of English Study | 3 |
| 28 | Sri Aurobindo Mandir Annual | 3 |
| 29 | A Review of English literature | 2 |
| 30 | Educational Researchers | 2 |
| 31 | Literature Forum | 2 |
| 32 | Loksatta | 2 |
| 33 | Reading Research Quarterly | 2 |
| 34 | Review of Educational Researcher | 2 |
| 35 | Standards For Educational and Psychological Testing | 2 |
| 36 | Triveni | 2 |

o o o

## (आ) मुख्य नियतकालिकांची यादी : हिंदी

| अनुक्रमांक | नियतकालिकाचे नाव | उल्लेख संख्या |
|---|---|---|
| १ | हंस | ५३ |
| २ | आलोचना | ४७ |
| ३ | आजकल | २३ |
| ४ | नवभारत टाईम्स | २३ |
| ५ | अक्षरा | १६ |
| ६ | धर्मयुग | १५ |
| ७ | राजभाषा भारती | १५ |
| ८ | सारिका | ११ |
| ९ | संचेतना | ९ |
| १० | समकालीन भारतीय साहित्य | ७ |
| ११ | मधुमती | ७ |
| १२ | कल्पना | ६ |
| १३ | सकाळ | ६ |
| १४ | गवेषणा | ५ |
| १५ | संमेलन पत्रिका | ५ |
| १६ | जनसत्ता | ४ |
| १७ | कथ्यरूप | ३ |
| १८ | सरिता | ३ |
| १९ | समीचीन | २ |
| २० | कहानी | २ |
| २१ | मनोरमा | २ |

०००

## (इ) मुख्य नियतकालिकांची यादी : मराठी

| अनुक्रमांक | नियतकालिकाचे नाव | एकूण उल्लेख |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र टाईम्स | ३३ |
| २ | लोकसत्ता | २५ |
| ३ | सकाळ | २४ |
| ४ | अनुष्टुभ | २३ |
| ५ | महाराष्ट्र साहित्य पत्रिका | २२ |
| ६ | युगवाणी | १६ |
| ७ | ललित | १३ |
| ८ | नवभारत | १३ |
| ९ | आलोचना | १२ |
| १० | केसरी | ११ |
| ११ | सत्यकथा | ११ |
| १२ | नवशक्ती | ८ |
| १३ | मनोहर | ८ |
| १४ | हंस | ७ |
| १५ | शिक्षण संक्रमण | ७ |
| १६ | तरुण भारत | ६ |
| १७ | अमृत | ५ |
| १८ | किर्लोस्कर | ५ |
| १९ | विदेही | ५ |
| २० | अस्मितादर्श | ४ |
| २१ | नवाकाळ | ४ |
| २२ | दीपावली | ४ |

| | | |
|---|---|---|
| २३ | मराठा | ४ |
| २४ | ज्योत्स्ना | ३ |
| २५ | विवेक | ३ |
| २६ | वसत | ३ |
| २७ | इतिहास संशोधन मंडळ | ३ |
| २८ | मराठी संशोधन पत्रिका | ३ |
| २९ | तरुण भारत | २ |
| ३० | वसुंधरा | २ |
| ३१ | मौज | २ |
| ३२ | लोकमत | २ |
| ३३ | प्रभात | २ |
| ३४ | सामना | २ |
| ३५ | साधना | २ |
| ३६ | अभिरुची | २ |

०००

## परिशिष्ट क्रमांक ०२ : भाषानिहाय प्रबंधांची यादी

### (अ) भाषानिहाय प्रबंधांची यादी : इंग्रजी

| **SR. NO** | **THESIS NO.** | **NAME OF THE RESEARCHER** | **TITLE** | **GUIDE** | **YEAR** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2716 | Malathy Krishnan | A study of the problems of teaching English to jr. college commerce students in Bombay : A Sociolinguistic approach | -- | 1994 |
| 2 | 2722 | Ali Pourdaryiae Nejad | Charles Dickens as a socialist | Dr. A. N. Tiwari | 1994 |
| 3 | 2729 | G. V. Kulkarni | Sri Aurobindo's Influence on the writings of Vinayak Krishna Gokak | Department of English University of Bombay | 1994 |
| 4 | 2792 | M. M. John | The impact of the Bible on the poetry of Sri Aurobindo | -- | 1994 |
| 5 | 2796 | M. Rose Joseph George | Poe's Mastercraftsmanship : Symbolistic Undercurrents in the Tales | Dr. Shakuntala Bharvani | 1994 |
| 6 | 2846 | Aparna Basu | The Forest in Shakespeare's Plays | -- | 1994 |
| 7 | 2861 | Mohammad Bagher Shabani | Self-Access Learning Materials for Students of English as a Foreign or Second Language | Dr. Nilufer E. Bharucha | 1996 |
| 8 | 2982 | Radha krishnan | The Keatsian Influence on the Poetry of Sri Aurobindo | -- | 1997 |
| 9 | 2983 | Meera | Rustics in Thomas | -- | 1997 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Mahadevan | Hardy's Novels : Their Role and Significance | | |
| 10 | 2986 | C. Meenakumari | Sin and Expiation in the Novels of Graham Greene and Evelyn Waugh | -- | 1995 |
| 11 | 2987 | Sunita Aggarwal | The Modernist Sensibility in the Novels of Iris Murdoch : A Study | Dr. R. J. Bhongle | 1995 |
| 12 | 3008 | Vikarm Sajanlal Choksi | The Problems of the Working Clas in Six British Novels : A Sociological Study | Dr. A. N. Tiwari | 1997 |
| 13 | 3024 | Zita Lobo | Conflict of the self in George Eliot's Fictional Works | Dr. R. J. Bhongle | 1996 |
| 14 | 3028 | Kalpana R. J. | A Critique of Feminism : An Analysis of the Works of Indian Women writers in English | Dr. Dr. Shakuntala Bharvani | 1997 |
| 15 | 3038 | Bijay kumar Samal | A Syllabus Design for English Language Teaching at the First year B. Com Level | Dr. Nilufer E. Bharucha | 1997 |
| 16 | 3046 | Deepika Chaterjee | Sri Aurobindo and T. S. Eliot as Poetic Dramatists | -- | 1997 |
| 17 | 3048 | Ghassan Nawaf j. Al- Homoud | The Melancholy Grace and the Romantic Trace in the Poetry of Thoms Gary | Dr. A. N. Twari | 1999 |
| 18 | 3053 | Renu Teivedi | The Socio-Cultural Conflict in the Novels of D. H. Lawrence : A Study | Dr. R. J. Bhongle | 1999 |
| 19 | 3055 | Mitalee Shome | William Golding and Joseph Conrad : A | -- | 1997 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | Comparative Study | | |
| 20 | 3067 | Tenaz Marshall | Sylvia Plath | Dr. Dr. Shakuntala Bharvani | 1999 |
| 21 | 3121 | Shireen Vakil | The Woman Figure in Seamus Heaney : A Distinctive Presence in Contemporary British Poetry | Dr. Usha Hemmadi | 1999 |
| 22 | 3125 | Rukmini Mardhanan | Un Ravelling the Connundrum and Enkindling of the Soul in the Poetry of Robert Browning | -- | -- |
| 23 | 3173 | Manjil Kaur | The Feminist Sensibility in the Novels of thoms Hardy : An Assessment and Evaluation | -- | 2000 |
| 24 | 3174 | Mohammed Ibrahim Al-Fahmawi | Treatment of Woman on the Novels of Jane Austen | Dr. Vijaya Thakur | 1999 |
| 25 | 3202 | Susmita Dey | Stylistic Analysis as a Means of Imporoving Examination Answers in English Literature at the Undergraduate Level | Dr. Yeasmeen M. Lukmani | 2001 |
| 26 | 3203 | Margar Colaco | The Impact of Question Formats on Student Performance | Dr. Yeasmeen M. Lukmani | 2001 |
| 27 | 3209 | Kirtee Agrawal | Cosmopolitanism and the Immigrant Experience in Contemporary Indian English Fiction | -- | 2001 |
| 28 | 3278 | Shoba Venkatesh Ghosh | Reading Pesistance A Feminist Exploration | Dr. Roshan G. Shahani | 2002 |
| 29 | 3280 | Essa H. R. Al-Dmour | John Keats as a Romantic Poet : A Critical Reassessment | Dr. R. J. Bhongle | 2002 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 30 | 3531 | Jojo George | P.B. Shelley as a Romantic Poet : A Critical Reassessment | Dr. A. N. Twari | 2007 |
